# काल-यंत्र

(Time Machine)



किशोर गो. भागवत

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# कालयंत्र

(कथासंग्रह)

लेखक : किशोर गोरखनाथ भागवत

# कालयंत्र

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# कालयंत्र

लेखक :   किशोर गोरखनाथ भागवत

पत्ता – अ-५, यशश्री, तावरे कॉलोनी, सातारा रोड, पर्वती, पुणे – ४११००९

मोबाईल – ७३५०००९७२२ / ७०२०१३४१५४

इमेल – kgbhagwat@gmail.com

फेसबुक - facebook.com/kbhagwat1

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.  तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

मुखपृष्ठ : बिपीन भागवत

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ७ फ़ेब्रुवारी २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# लेखकाचा परिचय



**नाव** – किशोर गोरखनाथ भागवत

**शिक्षण** – डिप्लोमा (E&TC), बी.इ. (E&TC), एम. टेक (Computer Science), एम.बी.ए. (Telecom Management)

**पत्ता** – अ-५, यशश्री, तावरे कॉलोनी, सातारा रोड, पर्वती, पुणे – ४११००९

**मोबाईल** – ७३५०००९७२२ / ७०२०१३४१५४

**इमेल** – kgbhagwat@gmail.com

**फेसबुक** - facebook.com/kbhagwat1

**नोकरी** – क्रेडीट स्विस या जागतिक बँकेत आयटी विभागामध्ये नोकरीला.

# प्रस्तावना

पुण्यातील वडारवाडी झोपडपट्टीत लहानाचा मोठा झालो. अभ्यासात बरा असल्याने शिक्षण चांगले होत गेले. सगळे शिक्षण “कमवा व शिका” या उक्तीनुसार झाले. वस्ती भागात बालपण गेल्याने त्यांच्यासाठी काहीतरी करायचे हि भावना सतत मनामध्ये होती. त्यामुळे वेळ मिळेल तेवढा वेळ वस्ती भागातील सामाजिक कामासाठी देत गेलो. नोकरी, शिक्षण व सामाजिक काम यामुळे विशेष वेगळे काही करण्याची इच्छा असूनही वेळ मिळत नव्हता. गेल्या काही वर्षात नोकरीच्या व्यापातून थोडा मोकळा वेळ मिळाल्याने मनातील काही सुप्त इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. एअर पिस्तुल शुटींग हा खेळ शिकून राष्ट्रीय पातळीपर्यंत गेलो. इतरही खेळ खेळण्याचा व शिकण्याचा प्रयत्न केला.

लिहिण्याची विशेष आवड नव्हती, परंतु वेगवेगळया कल्पना सतत मनात येत असत. मध्यंतरी एक विज्ञानकथा लेखनाच्या स्पर्धेसंबंधी माहिती कानावर पडली. वेळ होता म्हणून काहीतरी लिहावे असे वाटले म्हणून काही लघुकथा लिहिल्या. मला व माझ्या कुटुंबियांना त्या आवडल्या. मुद्दाम पैसे खर्च करून त्या प्रकाशित करण्यात विशेष रुची नव्हती.  गेल्या महिन्यात इ-साहित्य बद्दल माहिती कळली. तेंव्हा वाटले चला प्रकशित करून पाहू, जर वाचकांना आवडल्या तर लिखाण चालू ठेवता येईल.

स्पर्धेसाठी म्हणून ६ लघुकथा लिहिल्या होत्या. मी स्वतः इंजिनिअर असल्याने व विज्ञानाची विशेष आवड असल्याने विज्ञानकथा लिहिण्यावर जास्त भर होता. या लघुकथा इ-साहित्याच्या माध्यमातून प्रकाशित करायचे ठरवल्यावर माझ्या विज्ञानकथामधील एकाच विषयाला धरून असणाऱ्या ३ लघुकथा एकत्रितपणे एकाच पुस्तकात प्रकाशित करायचे ठरवले.

या पुस्तकातील सर्व कथांमध्ये ‘टाइम मशीन’ (काल-यंत्र) हा एक समान धागा आहे. फक्त विज्ञानकथा व त्याच्या माध्यमातून मोठमोठ्या प्रगतीच्या गाथा सांगण्यापेक्षा, त्याचा माणसाच्या भावविश्वावर व जीवनावर काय परिणाम होईल हे मी या कथांमधून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

माझी बायको अंजली भागवत, मुलगा आदित्य आणि मुलगी स्नेहल यांनी प्रोत्साहन दिले त्यामुळे हे लिखाण केले गेले. आमचे बंधू बिपीन भागवत यांनी कथेला साजेसे मुखपृष्ठ तयार

करून दिले. इ-साहित्य ची प्रकाशन सुविधा उपलब्ध झाली म्हणून या कथा प्रकाशित करीत आहे. त्यामुळे या सर्वांची कृतज्ञता व्यक्त करतो.

आपल्याला माझ्या कथा कशा वाटल्या हे कळवायला विसरू नका. फेसबुक, sms, मेल ज्या माध्यमाने शक्य होईल त्याने आपली प्रतिक्रिया अवश्य कळवा.

किशोर गोरखनाथ भागवत

# Time Machine

# (काल-यंत्र)

# कथानुक्रम

## शेअर बाजार

## दीर्घायू......

## नशीब

# कथा १

# शेअर बाजार

पुण्याजवळ खेड-शिवापूर नावाचे एक गाव होते. तसे गाव छोटे होते. सह्याद्रीच्या डोंगररांगेत वसलेले होते. डोंगररांगामुळे भरपूर पाऊस पडत होता. भरपूर पावसामुळे भरपूर झाडी आणि शेतीला पुरेसे पाणी उपलब्ध होते. त्यामुळे शेती करण्यावर बऱ्याच जणांचा भर होता. पुणे सातारा या मुख्य महामार्गावर असल्याने आणि पुणे शहराला लागूनच असल्याने त्या गावात शहरातील नवीन-नवीन गोष्टी पोहचत होत्या. महामार्गावर असल्याने गावाची प्रगती होत चालली होती. शहराप्रमाणे सर्व गोष्टी मुख्य गावात येत होत्या. परंतु काहीजण शेती गावापासून दूर असल्याने शेतात राहत होते. तिथे मात्र गावपण टिकलं होत. अशाच या गावात रमाकांत नावाचा एक साधा शेतकरी राहत होता. शेत आणि आपले घर यामध्येच त्याचे जीवन फिरत होते. रमाकांतकडे पिढ्यान पिढ्याची अशी चालत आलेली २० एकर जमीन होती. त्याच्या उपजीविकेचे साधन ती जमीनच होती. त्यात कष्ट करून तो शेती करत होता. भरपूर पाणी उपलब्ध होत असल्याने शेती चांगली होत होती आणि त्यामुळे घरात पुरेसा पैसा खेळत राहत असे. मनीषा ही त्याची बायको होती. दोघांचेही लिहिता-वाचता येण्यापुरतेच शिक्षण झाले होते. मनीषादेखील त्याला शेतात मदत करत असे. घरात आणि शेतात एकत्र असल्याने ते एकमेकांबरोबर भरपूर वेळ घालवत होते. या जास्तीत जास्त वेळ एकत्र वावरण्याच्या जीवनपद्धतीमुळे खेड्यातील नवरा-बायकोंची एकमेकात खूप चांगली घडी बसलेली असते. तशीच या दोघांची बसलेली होती. एकमेकांच्या स्वभावाला ते चांगले ओळखत होते. त्यामुळे कोठे कोणी पडते घ्यायचे हे दोघानाही चांगले कळत होते. अशा समजूतदार स्वभावामुळे त्यांचा संसार सुखाने चालला होता.

त्यांच्या लग्नाला जवळ जवळ बारा वर्ष पूर्ण होत आली होती. बारा वर्ष एकमेकांच्या सहवासात कशी भुरकन उडून गेली हे त्यांना कळलेच नव्हते. जीवनात सर्व सुख होते, परंतु त्या दोघांना एकच दु:ख होते. ते म्हणजे त्यांना मुलबाळ नव्हते. शहराच्या जवळ

असल्याने थोड्या आधुनिक विचारसरणीचा प्रभाव जीवनावर पडत होता. परंतु त्यामुळे त्याच्या संसारात कधी वादंग किंवा एकमेकांना दोषारोप देणे आले नव्हते. त्याचाच हा परिणाम होता. परंतु त्यामुळे ते शांत बसले असे मुळीच नाही. त्यांनी जुन्या बुजुर्गांनी, नातेवाईकानी, ओळखी-पाळखीच्यांनी सांगतील ते सर्व उपाय केले होते. सर्व धार्मिक, तांत्रिक-मांत्रिक प्रकार करून झाले होते. त्या जोडीने इतर अत्याधुनिक वैदयकीय उपायही चालू होते. दोघांनी एकमेकांच्या सर्व तपासण्या करून घेतल्या होत्या, वेगवेगळया पर्यायांची शक्यता तपासून घेतली होती. परंतु कशातूनही काही साध्य झाले नव्हते. या सर्व प्रयत्नांना कंटाळून त्यांनी आता नवीन प्रयोग व प्रयत्न करणे थांबवले होते. परंतु यामुळे त्यांच्या जगण्यात आणि सुखात काही फरक पडला नव्हता.

त्या दोघांना एकच चिंता होती कि त्यांच्यानंतर या एवढ्या मोठ्या जमिनीला मालक कोण? त्यांच्यानंतर हे सगळे सांभाळेल असे जवळचे कोणी नातेवाईक त्यांना नव्हते. शिवाय उतार वयात त्यांची काळजी घेईल असेहि कोणी नव्हते. योग्य वयात काय तो निर्णय घेणे गरजेचे होते. त्यामुळे लग्नाला बारा वर्ष होत आली म्हटल्यावर त्यांनी मूल दत्तक घ्यायचा विचार करायला सुरुवात केली. त्याबद्दल त्या दोघांच्या गप्पा व्हायला लागल्या. कुठून घ्यायचं? कस घ्यायचं? याची माहिती काढायला त्यांनी सुरुवात केली. या सर्व माहिती व चर्चेनंतर त्यांचे असे ठरले कि चालू पावसाळा संपला आणि नवीन पिक आले कि एखादे लहान मुल दत्तक घ्यायचे. आता लवकरच घरात लहाल मुल येणार यामुळे ते आनंदित झाले. कधी एकदा पावसाळा संपतो याची ते वाट पाहू लागले.

पावसाळा चालू होता, श्रावण महिना नुकताच सुरु झाला होता. आज श्रावण महिन्याचा पहिला सोमवार होता. सोमवारी मनीषाचा उपवास असायचा. मनीषा अगदी लहान असल्यापासून सोमवारचे उपवास करायची. त्यामागे देवाकडे काही मागणे अथवा इच्छा असे काही नव्हती. लहानपणापासून लागलेली ती एक सवय होती. आणि आता तो उपवास सवयीचा एक भाग बनला होता. त्या दिवशी ती नेहमीप्रमाणे सकाळी सकाळी उठली आणि सवयीप्रमाणे अंघोळीला पाणी ठेवले. तिने दात घासायला हातात ब्रश घेतला तेवढ्यात तिला मळमळ व्हायला लागले. तिने कसेबसे भरभर दात घासले आणि जास्तच अस्वस्थ वाटायला लागल्याने अंथरुणात येऊन बसली. तिला परत अंथरुणात येऊन बसलेले पाहून, अर्धवट झोपेत असलेला रमाकांत एकदम जागा झाला. आतापर्यंत एकदा उठल्यावर ती कधी पुन्हा अंथरुणात आल्याचे त्याला आठवत नव्हते. त्यामुळे काहीतरी गडबड असल्याचे त्याला जाणवले. त्याने तिला विचारले, “काय ग! काय झाले?”

ती म्हणाली, “काही नाही. उठल्यापासून पोटात मळमळ होते आहे.”

“काल रात्री आपण लवकर जेवण केले होत, त्यामुळे कदाचित भूक लागली असेल. तोंड धुवून काही काही तरी खाऊन घे. म्हणजे बरे वाटेल.”

“आज सोमवार आहे आणि तोही श्रावणातील पहिला सोमवार.”

“राहू दे जरा उपवास बाजूला. त्रास होत असेल तर आज नको करू उपवास. देव काही म्हणत नाही उपवास करा म्हणून.”

मनीषाने शांतपणे भिंतीला डोके टेकवत डोळे मिटले आणि म्हणाली, “मी काही देव म्हणाला म्हणून नाही उपवास करत. आजपर्यंत मी कधी सोमवार चुकवला नाही.”

तिचा आग्रह समजून घेत रमाकांत म्हणाला “ ठीक आहे. किमान ग्लासभर दुध तरी घे. मी साबुदाणा आणून देतो. तो भिजायला घाल.”

तिने नकारार्थी मान हलवली आणि म्हणाली, “ तुम्हाला माहित आहे ना मी फक्त दुध व फळावर उपवास करते.”

“ठिक आहे. दुध तरी घे आता.”

थोड बरं वाटल्यावर मनीषा जागेवरून उठली. गोठ्यात जाऊन तिने गाईचे दुध काढले. दुध गरम करून तिने ग्लासभर दुध घेतले. त्यानंतर तिला थोडे बरे वाटायला लागले. त्यामुळे तिलाही वाटले कि भूकेमुळेच मळमळ होत असेल. थोडे बरं वाटायला लागल्यानंतर नेहमीप्रमाणे दिवसभराची कामे करायला तिने सुरुवात केली. दुपार झाल्यावर तिला पुन्हा त्रास व्हायला लागला. भूकेमुळेच होत असेल असे समजून तिने दोन-तीन केळी खाल्ली. परंतु तरीही तिची मळमळ काही केल्या थांबेना. उलट ती वाढतच चालली होती. संध्याकाळपर्यंत कधी दुध पी, कधी केळी खा अस चालू होते.

संध्याकाळी मात्र तिला आता मळमळीबरोबर चक्करहि यायला सुरुवात झाली. तेंव्हा रमाकांत तिला थोडे रागावत म्हणाला, “आता वयोमानानुसार उपवास झेपत नसेल. त्यामुळे एकतर उपवास करणे बंद कर किंवा उपवासाला काहीतरी भरीव खायला सुरुवात कर.” मनीषा मात्र काही केल्या याबाबतीत त्याचे ऐकायला तयार नव्हती. आपल्या निश्चयावर ती ठाम होती. ती म्हणाली, “आता हा उपवास माझ्याबरोबरच थांबेल.”

रमाकांत थोडा चिडूनच म्हणाला, "तुला काय करायचे ते कर. परंतु संध्याकाळच्या वेळी असे वाईट बोलू नकोस."

तिच्या या निश्चयापुढे तो शांत बसला. रात्री उपवास सोडून ते झोपी गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याला जाग आली. आणि पाहतो तर काय मनीषा अजून अंथरुणातच बसलेली होती. तो उठून तिला काय झाले असे विचारणार तेवढ्यात ती पळत मोरीत गेली व उलट्या करू लागली. ती जेंव्हा उलटी झाल्यावर परत येऊन बसली तेंव्हा त्याने विचारले, "काय झाले आता?"

"सकाळपासून उलट्या होत आहेत. उठल्यापासून ही तिसरी उलटी आहे"

तेंव्हा तो घाबरून उठून बसला. त्यांच्या बारा वर्षांच्या संसारात तिला असा त्रास पहिल्यांदाच होत होता. तो तिला म्हणाला, "तू आवरून घे. आपण डॉक्टरकडे जाऊ यात. अजून त्रास वाढायची वाट नको बघायला."

दोघांनी चहानाश्ता केला व ते आवरून दवाखान्यात गेले. त्यांना तशी दवाखान्यात जायची कधी वेळ येत नव्हती. त्यामुळे दवाखान्याची वेळ त्यांना माहिती नव्हती. साहजिकच त्यामुळे ते डॉक्टर येण्यापूर्वी दवाखान्यात पोहचले व त्यांचा पहिलाच नंबर लागला. परंतु आजूबाजूच्या कोणाला मदत पडली तर तो त्यांना दवाखान्यात घेऊन जात होता. त्यामुळे त्याची व डॉक्टरांची चांगलीच ओळख होती. त्यामुळे डॉक्टरांनी आल्या आल्या रमाकांतला व मनीषाला बाहेर बसलेले पाहिल्यावर विचारले, "आज एकदम जोडीने भेटायला आलात. सगळे ठीक आहे ना? चल ये आत." डॉक्टरांनी मनीषाला तपासायला घेतले. तिच्या आजाराच्या सर्व तक्रारी ऐकल्यावर ते गालातल्या गालात हसू लागले. तरी त्यांनी खात्री करून घेण्यासाठी मनीषाला व्यवस्थित तपासले. आणि खात्री झाल्यावर रमाकांतकडे येऊन म्हणाले, "अभिनंदन". रमाकांतला काही कळेना. त्याच्या चेहऱ्यावरील प्रश्नार्थक भाव पाहून डॉक्टरानी त्याला सांगितले, "तू आता बाप होणार आहेस. मनीषा गरोदर राहिली आहे." रमाकांतला त्याच्या कानावर विश्वासच बसेना. लग्नाला बारा वर्ष झाल्यावर, सर्व प्रयत्न करून थकल्यावर, अगदी दत्तक मुल घ्यायचे जवळ जवळ नक्की झाल्यावर हा आनंदाचा क्षण आला होता. त्याला खूप आनंद झाला होता. मनीषाला तपासतानाच ही बातमी डॉक्टरांनी दिली होती. त्यामुळे ती लाजतच दवाखान्यातून बाहेर आली. तिच्या चेहऱ्यावरही आनंद ओसंडून वाहत होता.

घरी येताना तो तिला गमतीने म्हणाला, "तुझा शंभू महादेव पावला बरं... बारा वर्ष तो आपली परीक्षा पाहत होता. तुझे उपवास फळाला आले." तिलाही नकळत तसेच वाटून गेले.

त्यामुळे तिने आकाशाकडे पाहून हात जोडले. आता दोघांचे दिवस जास्तच आनंदात जाऊ लागले होते. दिवस संपता संपत नव्हते. कारण ते आता आतुरतेने घरात बाळ कधी येते याची वाट पाहू लागले होते. पावसाळा संपला, दिवाळी गेली, हिवाळादेखील संपत आला होता. आणि पवित्र अशा महाशिवरात्रीच्या दिवशी त्यांच्या बाळाचा जन्म झाला. बाळ आणि मनीषा दोघांची तब्येत छान होती. बारा वर्ष वाट पाहायला लागली म्हणून त्यांनी बाळाचे नाव “धीरज” असे ठेवले. आता मात्र त्यांचे दिवस धीरजशी खेळण्यात, बागडण्यात, मस्ती करण्यात भरभर जाऊ लागले होते.

धीरज भरभर मोठा होऊ लागला होता. रमाकांतचे शेत हे तसे मुख्य गावापासून चार ते पाच किमी. अंतरावर होते. आणि तो शेतातच घर बांधून राहत होता. साहजिकच त्यामुळे धीरजबरोबर खेळायला त्याच्या बरोबरीचे असे कोणी नव्हते. त्यामुळे स्वतःची वस्तू, खेळणी इतरांबरोबर शेअर करायची अथवा वाटून घ्यायची त्याला माहिती नव्हती. तो खूप वर्षानंतर झालेला व एकुलता एक मुलगा असल्याने दोघही त्याचे खूप लाड करत होते. मागेल ती वस्तू ते त्याला लगेच आणून देत असत. त्यामुळे कुठलीही गोष्ट हवी असल्यास ती मिळेपर्यंत तो आकाशपातळ एक करत असे. हळूहळू त्यामुळे तो हट्टी बनत चालला होता.

धीरज ६ वर्षाचा झाल्यावर रमाकांतने त्याला गावातल्या शाळेतच शिकायला टाकले. तो दररोज सायकलवर त्याला शाळेत सोडायला आणि आणायला जात होता. शाळेत एखाद्या मुलाकडे वेगळी पेन्सिल अथवा रबर पाहिला तरी त्याला तो हवा असत. त्यासाठी दुसऱ्या दिवशी आणून देईपर्यंत देखील त्याला दम निघत नसे. त्यामुळे त्या दोघांच्याही लक्षात येऊ लागले कि धीरजचा स्वभाव हा त्याच्या नावाच्या अगदी उलटा तयार होत होता. धीरज वर्गात तसा हुशार होता. त्याला वर्गातील सांगितलेले सर्व इतरांच्या मानाने लवकर कळत होते. शाळेतील सर्व शिक्षक नेहमी रमाकांतकडे त्याचे कौतुक करत असत. त्यामुळे त्यांचे धीरजच्या हट्टी आणि उतावळया स्वभावाकडे दुर्लक्ष होत गेले होते.

शाळेत तो नेहमी वेगवेगळया स्पर्धांमध्ये सहभाग घेत असे. त्यात त्याला बक्षीसही मिळत असे. रमाकांत त्याला प्रोत्साहन देण्यासाठी त्या-त्या स्पर्धांना उपयुक्त असतील असे गावात असणारे क्लास त्याला लावण्याचा प्रयत्न करत असे. धीरजलादेखील ते सगळे करायला आवडत

असत. परंतु जेंव्हा त्यांच्या लक्षात यायचे कि स्पर्धेच्या पुढच्या टप्प्यात त्याला भरपूर कष्ट केल्याशिवाय यश मिळणार नाही, तेंव्हा त्याचा त्यातील रस कमी व्हायला सुरुवात होत असे. त्यानंतर धीरज लगेच दुसरी गोष्ट शोधायला सुरुवात करत असे ज्यात त्याला सहज यश मिळू शकेल. अशाप्रकारे शरीराला कष्ट द्यायची तयारी नसलेला असा त्याचा स्वभाव होता. अभ्यासात चांगला असल्याने तो पुढच्या वर्गात जात राहिला होता.

धीरजचा हट्टी आणि शरीराला कष्ट न देता सर्व मिळविण्याचा स्वभाव हा आपल्या लाडामुळे तयार झाला आहे असे त्याच्या आई-वडिलांच्या वाटत होते. त्यात बदल कसा करावा हे त्यांना कळत नव्हते. आपल्यापासून लांब ठेवले तर तो सुधारेल या विचाराने त्यांनी आठवीनंतरच्या शिक्षणासाठी त्याला शहरात ठेवायचे ठरवले. जेणेकरून घरापासून लांब राहिल्यावर इतर मुले जगतात कसे, त्यांना जगताना काय अडचणी येतात हे पाहून त्याचा स्वभाव बदलेल असे त्यांना वाटले. त्यामुळे त्याला पुण्याच्या शाळेत घालून वसतिगृहात ठेवायचे ठरवले. या कल्पनेला धीरजने सुरुवातीला खूप विरोध केला. परंतु या वेळेस त्याचे ऐकायचे नाही असे रमाकांत व मनीषाने ठरवले होते. त्यामुळे ते त्याच्या हट्टाला दाद देईनात. हे पाहून धीरजही नरमला व वसतिगृहात राहायला जायला तयार झाला.

मुलाला शहरात ठेवायचा निर्णय घेतला तरी त्याची काळजी त्यांना होतीच. त्यामुळे त्यांनी वसतिगृह असे शोधले कि जिथे त्याच्या ओळखीचा एकजण कामाला होता. ज्यामुळे अप्रत्यक्षपणे का होईना त्यांना मुलावर नजर ठेवता येणार होती. तसे पुणे गावापासून विशेष लांब नसल्यामुळे आठवड्यातून एकदा धीरजकडे चक्कर मारून ते त्याची भेट घेत होते. शहरात राहणाऱ्या इतर मुलांना एखादी गोष्ट मिळायला जेवढा वेळ लागत असे त्याच्यापेक्षा कितीतरी कमी वेळात धीरजला ती वस्तू मिळत होती. त्यामुळे धीरजला असे वाटू लागले कि शहरात राहून नोकरी करणाऱ्यांपेक्षा आपले वडील गावातल्या शेतात काम करून भरपूर पैसा कमवतात. तसेच आपली गावाकडे भरपूर जमीन आहे असे त्याला वाटत होते. त्यामुळे मोठे झाल्यावर गावाकडे जाऊन शेतीच करायची असा निश्चय त्याच्या मनात पक्का व्हायला लागला. त्यामुळे शिक्षण घ्यायचे म्हणून घेणे चालू राहिले. खूप काही जिद्दीने किंवा काही करून दाखवण्यासाठी तो शिक्षण घेत नव्हता. तरीही रमाकांत त्याला वेगवेगळ्या खेळाच्या क्लासेसला टाकत राहिला. त्याला वाटत होते कि एखाद्या खेळात त्याला आवड निर्माण होईल आणि तो त्यात काही तरी विशेष करेल. त्यामुळे धीरजचे बुद्धिबळ, ॲथलेटिक्स, पोहणे, कुस्ती, क्रिकेट असे वेगवेगळे खेळ शिकून झाले. परंतु त्याच्या स्वभावाप्रमाणे तो फक्त सुरुवातीलाच त्यात रुची घेत

होता. अशाप्रकारे दिवस जात होते. अभ्यासात चांगला असल्याने त्याचे दहावी, बारावी आणि पदवीचे शिक्षण पूर्ण झाले.

रमाकांतला शेतीतील कष्ट माहिती होते. त्यामुळे त्याला वाटत होते कि शहरात शिक्षण घेऊन धीरजने शहरात राहून नोकरी करून मोठा होण्याचा प्रयत्न करावा. परंतु धीरजची इच्छा तर गावाकडे परत येऊन शेती करण्याची होती. रमाकांतला माहित होते कि शेतीतील कष्ट त्याला झेपणार नाहीत किंवा त्याच्या स्वभावामुळे तो ते करू शकणार नाही. एकदा का नोकरीचे वय निघून गेले तर नंतर नोकरीदेखील मिळणार नाही. त्यामुळे धीरजने योग्य वयात शिक्षण पूर्ण करून नोकरी करावी असे रमाकांतला वाटत होते. परंतु शिक्षण संपल्यावर गावाकडे परत यायचे असे धीरज म्हणू लागला. त्यामुळे रमाकांत काळजीत पडला. कुठून तरी रमाकांतला कळले कि स्पर्धा परीक्षा दिल्यानंतर सरकारी अधिकारी बनता येते. त्यामुळे धीरजची समजूत घालून त्याने त्याला शहरातच ठेवले आणि स्पर्धा परीक्षेच्या तयारी करण्यासाठीचे क्लासेस त्याला लावले. त्यात दोन वर्ष भुर्रकन निघून गेली. त्यातही धीरजने काही साध्य केले नाही आणि पुन्हा त्याने गावी येण्याचा हट्ट धरला.

आता रमाकांतला धीरजची काळजी वाटू लागली आणि त्या काळजीने तो शांत राहू लागला. मनीषाच्या हे लक्षात आले. एक दिवशी तिने त्याला विचारले, “ काय हो? आठ दिवस झाले पाहते आहे, सारखे कसल्यातरी काळजीत दिसता आहात. काय झाले आहे?”

तेंव्हा रमाकांत म्हणाला, “ काही नाही. धीरजची काळजी वाटते आहे.”

तिने काळजीने विचारले, “ काय झाले आता?”

“तो शेती करायला गावाकडे यायचं अस म्हणतो आहे.”

मुलगा घरी परत येणार याने ती आनंदली आणि म्हणाली, “ चांगले आहे कि मग. शेती काय वाईट आहे का? चांगला शिकलेला आहे. करेल कि शेती चांगल्या नविन पध्दतीने. तुम्ही नका जास्त काळजी करू त्याची.”

तिच्या या उत्तराने रमाकांत विचार करू लागला. इतरांना स्वतःची मुले गावात येऊन राहावे असे वाटते. मात्र त्यांची मुले शहरात मोलमजुरी किंवा बिगारी कामे करून जगतात, परंतु गावाकडे येऊन शेती करायला नाही म्हणतात. आपला मुलगा तर चांगला शिकलेला असून स्वतःहून गावाकडे येऊन शेती करायची म्हणतो आहे. त्याचा कष्ट करायचा स्वभाव नाही, परंतु

शिकलेला असल्याने मनीषा म्हणते तशी आधुनिक पद्धतीने कमी कष्टात शेती करेल. या विचाराने त्याचाही नकार हळूहळू होकारात बदलला.

आता धीरज शहरातून गावाकडे रहायला आला. त्याचे शाळेतील खूप कमी वर्गमित्र आता गावात राहिले होते. तो आल्यांनतर जे कोणी मित्र गावात होते त्यांना भेटायला गावात जायला लागला. पदवीपर्यंत शिक्षण झालेले असल्याने, तसेच वेगवेगळया खेळांचे व कलांचे ज्ञान असल्याने तो वेगवेगळया विषयावर छान गप्पा मारत असे. त्यामुळे त्याचा गावात मित्रपरिवार तयार व्हायला वेळ लागला नाही. हळूहळू मित्र परिवार चांगलाच मोठा होऊ लागला. त्याचे ज्ञान पाहून सगळेजण त्याची सारखी स्तुती करत असत. त्यामुळे त्याला त्यांच्याबरोबर गप्पा मारायला जास्त आवडू लागले. मित्रांबरोबर गप्पा मारायच्या नादाने तो जास्तीत जास्त वेळ गावातच घालवू लागला. आता जेवायला घरी यायला देखील त्याला कंटाळवाणे वाटायला लागले. त्यामुळे घरातून बाहेर पडतानाच आईकडून पैसे घेऊन बाहेर पडायला लागला. जेवण बाहेर करून मित्रांबरोबर दिवस घालवून तो संध्याकाळीच घरी येऊ लागला. मनीषा सारखी त्याला घरी जेवायला यायचा आग्रह करीत असत. गावातून घरी चालत यायचा कंटाळा येतो हे सांगत त्याने घरी जेवायला येण्याच्या बहाण्याने आईकडे गाडी घेऊन देण्याचा हट्ट धरला. सुरुवातीला मनीषाने त्याकडे दुर्लक्ष केले. परंतु धीरजचे गावात थांबणे वाढतच चालले. गाडी घेऊन दिल्यावर मुलगा घरी जेवायला तरी येईल या उद्देशाने तिने रमाकांतला धीरजसाठी नवीन गाडी विकत घायला सांगितले. रमाकांतने देखील लगेच त्याच्या आवडीची दुचाकी घेऊन दिली.

आता गाडी मिळाल्यानंतर तो जेवायला घरी यायला सुरुवात झाली. परंतु जेवणानंतर तो लगेच गावात परत जात होता. परत गेल्यावर रात्री उशिरापर्यंत मित्रांबरोबर थांबायला लागला. आता मित्रांबरोबर लांब लांब फिरायला जायला त्याने सुरुवात केली. त्याच्यासाठी तो घरात सारखी पैशाची मागणी करू लागला. गावाकडे शेती करण्यासाठी आलेला धीरज वर्ष झाले तरी शेतात फिरकायचे नाव काढेना. आता मात्र रमाकांतला खूप काळजी वाटू लागली. मुलगा गावातील रिकामटेकड्या मुलांच्या नादी लागून बिघडेल व कुठल्या तरी व्यसनाच्या आहारी जाईल अशी त्याला भीती वाटू लागली. तसे पाहिले तर रमाकांतचे वय आता साठच्या पुढे गेले होते. मुलाच्या काळजीमुळे तो सारखा तणावाखाली राहू लागला. खाण्यापिण्याकडे दुर्लक्ष होऊ लागले. परंतु शेतात तर राबायला हवं. ते काही तो चुकवू शकत नव्हता. एक दिवशी या ताणामुळे त्याला हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यात त्याचे निधन झाले.

घरातील एकुलता एक मुलगा असल्याने साहजिकच सगळी घराची जबाबदारी धीरजवर येऊन पडली. मनीषाला वाटले आतातरी परिस्थितीचे गांभीर्य समजून तो शेतात लक्ष घालेल. परंतु हळूहळू दुखातून सावरल्यावर धीरजचा गावात जाऊन बसण्याचा दिनक्रम पुन्हा सुरु झाला. आता मात्र मनीषाचा धीर सुटला आणि तिने धीरजशी बोलायचे ठरवले. एक दिवशी धीरज रात्री जेवण करून बसला असताना तिने विषय काढला. त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, “धीरज, काय चालले आहे तुझे?”

“काय झाले?”

“तू शेतात लक्ष घालणार म्हणून गावाकडे आला होतास”

“हो, जातो उद्यापासून शेतात.”

“जर तू शेतात लक्ष घातले नाही तर घर चालवायला पैसा येणार नाही. तुझ्या वडिलांनी सगळे पैसे तुझ्या आवडी-निवडी पुरवण्यात खर्च केलेत. त्यामुळे आता तू शेतीकडे लक्ष घाल नाहीतर दुसरा काहीतरी कामधंदा शोध” असे निर्वाणीच्या शब्दात मनीषाने धीरजला सुनावले.

आता मात्र त्याच्या लक्षात आले कि काही तरी हातपाय हालवायलाच हवेत. नोकरीपेक्षा जास्त पैसा शेतीत मिळतो हे त्याच्या डोक्यात पक्के असल्याने त्याने शेती करायचे ठरवले.

त्याच्या हे लक्षात यायला जास्त वेळ लागला नाही कि शेतीत भरपूर पैसा आहे परंतु राबायला देखील तेवढेच लागते. जनावरांना चरायला नेणे, त्यांना चारापाणी घालणे, अंघोळ घालणे. जमीन नांगरणे, पेरणी करणे, पिकाला पाणी घालणे, तोडणी करणे. एक ना दोन अनेक कामं करायची असतात. ती केल्याशिवाय पैसे हातात येत नाहीत. कष्ट कमी करण्यासाठी काय करता येईल याचा तो विचार करू लागला. ट्रॅक्टर वापरून शेतीतील कामे लवकर व कमी कष्टात करता येतील असे त्याला वाटले. त्याने ट्रॅक्टर विकत घ्यायचे ठरवले. परंतु घरात शिल्लक अशी काही नव्हती. त्याने ट्रॅक्टर विकत घेण्यासाठी कर्ज काढायचे ठरवले. त्याला ट्रॅक्टर घायला लगेच कर्ज मिळाले. मनीषाचा कर्ज काढून काहीही करायला विरोध होता. तिला वाटत होते कि शेती करून काही पैसे बाजूला टाकावेत आणि त्यातून गरज असेल तरच ट्रॅक्टर घ्यावा. परंतु आताच मुलगा शेतीसाठी काहीतरी करायला लागला आहे, त्यामुळे त्याला विरोध करणे चांगले नाही असा विचार करून ती गप्प बसली.

शेतामध्ये ट्रॅक्टरने करायच्या कामाव्यतिरिक्त करायची इतर बरीच कामे असतात. जसे कि तण काढणे, खुरपणी करणे, पिकाला खत घालणे, पाणी घालणे. ही सर्व कामे स्वतः करायची धीरजची तयारी नव्हती. त्यामुळे या सर्व कामासाठी त्याने नोकरमाणसे ठेवली. खरे तर त्यांना रोजंदारी द्यायला देखील घरात काही शिल्लक रक्कम नव्हती. पिक आल्यावर जास्त पैसे देण्याच्या बोलीवर त्याने सर्वांना कामाला ठेवले. पिक आल्यानंतर सर्वांचे पैसे देऊन जेमतेम घरखर्चाला पुरतील एवढेच पैसे शिल्लक राहिले. ट्रॅक्टरच्या कर्जाचे हप्ते भरणे शक्य झाले नाही. दुसऱ्या वर्षीही तेच झाले. बँकेचा कर्जफेडीसाठी सारखा तगादा चालू झाला. असेच तिसरे वर्ष निघून गेले. आता मात्र बँकेने ट्रॅक्टर उचलून घेऊन जाण्याची धमकी दिली. ट्रॅक्टरशिवाय शेती करणे शक्य नाही या विचाराने धीरजने काही शेती विकून कर्ज फेडायचे ठरवले. हे ऐकून मनीषाला धक्का बसला. मागील दोन-तीन पिढ्यांनी कष्ट करून एक-एक एकर करून ही जमीन वाढवली होती. तिच्या नवऱ्याने वाट्याला आलेली २० एकर जमीन आयुष्यभर सांभाळली होती. आता मात्र आपला मुलगा ती कमी करायला निघाला आहे. यामुळे तिला खूप वाईट वाटले. परंतु नंतर तिला वाटले या दोन-अडीच एकराच्या विक्रीने हा प्रकार थांबेल आणि नंतर धीरज पुन्हा जमीन विकत घेऊन वाढवण्याचा प्रयत्न करेल.

त्याच्या पुढच्या वर्षी पाऊस कमी झाला. त्यामुळे विहिरीला असलेल्या पाण्यावर शेती करावी लागणार होती. आहे ते पाणी सर्व शेताला पुरविण्यासाठी धीरजने सर्व शेतीत ठिबक सिंचन करून घ्यायचे ठरवले. त्यासाठी त्याने अजून एक एकर जमीन विकली. आता मात्र मनीषाला खूप काळजी वाटू लागली. तिला वाटले याचे एकदा लग्न लावून द्यावे. कदाचित त्याला घराची जबाबदारी समजेल. येणारी मुलगी त्याला समजावून सांगेल आणि शेती विकण्यापासून वाचू शकेल. मनीषाने आता धीरजसाठी मुलगी पाहायला सुरुवात केली. तिने धीरजसाठी शिकलेली मुलगी पहायचे ठरवले. कारण अशीच मुलगी त्याला चांगले काही सुचवू शकेल असे तिला वाटत होते. परंतु शिकलेल्या मुली शेतकरी घरात लग्न करायला तयार नव्हत्या. अडाणी मुली मनीषाला नको होत्या. त्यामुळे किमान बारावी शिकलेली मुलगी मिळावी असा प्रयत्न ती करत होती. परंतु खूप शोधून झाले तरी हवी तशी मुलगी मिळेना. त्यामुळे मनीषाने ठरवले कि दुसऱ्या जातीतील किंवा अनाथ मुलगी मिळाली तरी चालेल, परंतु शिकलेलीच मुलगी करायची. त्याप्रमाणे मुलगी पाहायला पुन्हा सुरुवात केली.

तिला एका ओळखीच्या बाईकडून कोल्हापुरातील एका मुलीची माहिती मिळाली. त्या मुलीचे नाव भैरवी होते. तीचे शिक्षण बारावीपर्यंत झाले होते. तिचे आई-वडील ती लहान असतानाच गेले होते. तिच्या लांबच्या मामाने तिचे शिक्षण पूर्ण केले होते व तिचा सांभाळ केला

होता. मनीषा लगेच तिला पहायला गेली. शिकलेली आणि दिसायला चांगली असल्याने तिने ती मुलगी धीरजला दाखविण्याचा कार्यक्रम ठरवला. धीरजला देखील पाहता क्षणी भैरवी पसंत पडली. आता धीरजच्या लग्नाची बोलणी सुरु झाली. मनीषाला मुलीकडून काही नको होते. तिला अगदी साध्या पद्धतीने लग्न करून दिले तरी चालणार होते. अगदी गरज पडली तर ती स्वतः लग्नाचा सर्व खर्च करायला तयार होती. परंतु धीरजला मोठ्या धुमधडाक्यात लग्न करायचे होते. त्यासाठी तो खूप हट्टाला पेटला. त्याच्या त्या हट्टाला नाईलाजाने मनीषाने होकार दिला. त्याने पुन्हा लग्नासाठी थोडी जमीन विकली. मनीषाला वाटले लग्नानंतर हे सगळे थांबेल. त्यामुळे तिने त्याला जास्त विरोध केला नाही. जमिनीच्या पैशावर लग्न चांगलेच धूमधडाक्यात पार पडले.

नवीन नवरी भैरवी घरात आली. नवीन नवरा बायकोचा संसार सुरु झाला. तो आनंदाने चालू होता. वेळ मिळेल तसे मनीषा तिला धीरजचा स्वभाव समजून सांगून थोडे खर्चावर नियंत्रण ठेवायला सांगत होती. एकुलती एक व अनाथ सून असल्याने मनीषा तिचे खूप लाड करत होती. त्यामुळे भैरवीला आईची कमतरता भरून निघाल्यासारखे वाटत होते. धीरजला भैरवी आवडल्यामुळे तो तिचे खूपच लाड करत होता. शहरात राहिल्यामुळे धीरजच्या आवडी-निवडी थोड्या वेगळ्या होत्या. त्या करायला व सांभाळायला भैरवीला देखील आवडत होते. लग्नापूर्वी भैरवीला कधी नटायला व सजायला मिळाले नव्हते. ते सर्व नवऱ्यामुळे तिला मिळत असल्याने ती चांगलीच खुश होती. त्यामुळे ती जास्तीत जास्त नवरा म्हणेल तशीच वागत होती. त्याच्या कुठल्याही गोष्टीला ती विरोध करत नव्हती. त्यामुळे धीरजचे नेहमीप्रमाणे उधळपट्टी चालूच होते. मनीषाच्या हळूहळू लक्षात यायला लागले कि भैरवी काही त्याला आवरू शकणार नाही. त्यामुळे ती सारखी काळजीत राहू लागली. मुलगा जमीन विकून घालवणार आणि सगळयांना रस्त्यावर आणणार असे तिला सारखे वाटू लागले. त्यातच तिला क्षयरोग झाला. परत त्यासाठी जास्त पैसा खर्च व्हायला नाव नको किंवा त्या बहाण्याने पुन्हा शेतजमिनीचे विकणे नको म्हणून तिने तिचा आजार दोघांपासून लपवला. वरवरचे औषध उपचार ती करत राहिली. त्या उपचारामुळे तिचा क्षयरोग बरा झाला नाही आणि एक दिवस त्याने तिला खाल्ले. आता धीरज पूर्णपणे पोरका झाला. आता त्याला रागवायला, चुकला तर समजवायला कोणी वडीलधारे उरले नाही.

काही दिवसातच त्या दुखातून सावरून दोघांचा संसार पुढे सुरु झाला. परंतु आईच्या जाण्याने धीरजच्या स्वभावात काही विशेष फरक पडला नाही. उलटपक्षी आता शेती त्याने नोकरचाकरांवर सोडून दिली. गरज पडली कि जागा विक असे त्याचे चालू राहिले. आता मात्र भैरविच्या हे लक्षात यायला लागेल कि तिच्या सासूबाई काय व का सांगत होत्या. तिने

थोड्या गोडीगुलाबीने धीरजला समजवण्याचा प्रयत्न केला. आहे ती शेती टिकवली पाहिजे असे त्याला सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु तीचे हे सांगणे त्याला रुचले नाही. त्यानंतर तो छोट्या छोट्या गोष्टीवरून तिच्याशी भांडणे करायला लागला. या प्रकाराने भैरवी खूप घाबरली. छोट्या छोट्या गोष्टीमुळे संसारात वाद नको म्हणून येथून पुढे हा विषय धीरजकडे काढायचा नाही असे तिने ठरवले. त्याला कुठलीही आडकाठी न घालता त्याच्या म्हणण्याप्रमाणे वागायला तिने सुरुवात केली. हळूहळू त्यांचा संसार पूर्वपदावर आला. जमीन विकल्यावर आपली आई देखील आपल्याला बोलत होती. आणि आता नवीन आलेल्या बायकोही बोलू लागली आहे हे त्याला सुरुवातीला रुचले नाही. पण हळूहळू त्याला या सर्वाचा अर्थ व परिणाम लक्षात यायला लागला. सर्व जमीन जर आपण घालवून बसलो तर जगणार कशावर? हे धीरजच्या लक्षात आले. आता आपल्याला हातपाय हलवून काही तरी करायला हवे आणि पैसे कमवायला हवेत असे त्याला वाटू लागले.

या सगळ्या प्रकारामुळे एक बदल झाला. आता गरज नसलेली उधळपट्टी थांबली होती. काही पैसे शिल्लक पडायला सुरुवात झाली होती. शिल्लक राहिलेले पैसे कसे वाढतील आणि आपली गेलेली जमीन लवकरात लवकर कशी परत घेता येईल याचा धीरज विचार करायला लागला. त्यासाठी तो वेगवेगळ्या मार्गांचा शोध घेऊ लागला. सुरुवातीला त्याने झटपट पैसे वाढविण्याच्या नादात काही फसव्या असणाऱ्या जास्त व्याज देणाऱ्या योजनांमध्ये पैसे गुंतवले. त्या योजनांमुळे जे वाचवलेले पैसे होते ते देखील बुडाले. पुन्हा त्याला काही जमीन विकावी लागली. पैसा काही टिकत नाही याचे गांभीर्य त्याला जाणवू लागले होते. त्यामुळे जोपर्यंत पैसे टिकत नाही व गेलेली जमीन परत मिळवायला सुरुवात होत नाही तोपर्यंत मुलबाळ होऊ द्यायचे नाही असा निर्णय त्या दोघांनी घेतला.

दरम्यानच्या काळात धीरजच्या व्हॉटसअॅप्प वर एक मेसेज आला. तो वॉरेन बफेट व राकेश झुनझुनवाला यांच्या संबंधीत होता. त्यामध्ये काही वर्षापूर्वी या दोघांनी शेअर बाजारात थोडे पैसे गुंतवले आणि आज ते अब्जाधीश झाल्याचे सांगितले होते. त्यामुळे शेअर बाजाराविषयी अधिक माहिती करून घेण्याची धीरजला इच्छा निर्माण झाली. वर्तमानपत्रातील जाहिरातीतून मिळालेल्या माहितीच्या आधारे त्याने शेअर बाजारासंबंधीचा एक क्लास लावला. तो क्लास पुणे शहरामध्ये होता. परंतु शेअरसंबंधी माहिती करून घ्यायच्या तीव्र इच्छेमुळे त्याने जाऊन-येऊन तो क्लास पूर्ण केला. या क्लासमध्ये निफ्टी, बीएसई, शेअर, डेरीव्हेटीव याची पूर्ण माहिती दिली गेली. आता त्याला शेअर बाजारात गुंतवणूक करण्याची इच्छा निर्माण झाली. त्यासाठी त्याने

शेअर बाजारातील देवाण-घेवाण करण्यासाठी लागणारे डीमॅट खाते उघडले. आता तो गावातील इंटरनेट कॅफेत बसून शेअरची खरेदी-विक्री करू लागला.

त्याने जवळ असलेले काही पैसे शेअर बाजारात गुंतवूण काही शेअर खरेदी केले. काही महिन्यानंतर त्या शेअरच्या भावात चांगलीच वाढ झाली. त्याला चांगलाच नफा झाला. त्यामुळे त्याने त्याच्याकडे होते तेवढे सर्व पैसे शेअर बाजारात गुंतवले. त्याने विकत घेतेलेल्या नवीन शेअरचे भावदेखील काही दिवसात चांगले वाढले. त्यामुळे त्याला पुन्हा चांगला नफा झाला. त्याला आता खूप वेगाने पैसे कमवायची इच्छा झाली. शेअर बाजारात ऑप्शन (option) नावाचा एक प्रकार असतो, ज्यात खूप वेगाने पैसे वाढतात. परंतु जर तुमचा अंदाज चुकला तर त्यामध्ये पैसे बुडण्याची तेवढीच शक्यता असते. त्याने विकत घेतेलेले सर्व शेअर विकले. आलेले सर्व पैसे त्याने ऑप्शनमध्ये गुंतवले. इथे मात्र त्याचा अंदाज चुकला आणि त्याचे सर्व पैसे बुडाले. आता तो पुन्हा पहिले होती त्या स्थितीत आला. या सर्व प्रकाराने तो खूप घाबरला. त्याने इथून पुढे पुन्हा ऑप्शनमध्ये कधीही पैसे गुंतवायचा नाही असे ठरवले. त्याच्या हे लक्षात आले कि दोन्ही वेळेस शेअरमध्ये पैसे गुंतवल्यावर त्याला फायदा झाला होता. त्यामुळे त्याने आता फक्त शेअरमध्ये पैसे गुंतवण्याचे ठरवले. परंतु आता त्याच्याकडे पैसे शिल्लक राहिले नव्हते. त्याने थोडी जमीन सावकाराकडे गहाण टाकून पैसे घेतले आणि ते सर्व पैसे शेअर बाजारात गुंतवले.

तो दररोज त्याच्या शेअरची स्थिती तपासत होता. तीन महिन्यानंतर त्याच्या लक्षात आले कि त्याच्या शेअरचे भाव चांगलेच वाढले आहेत. त्याने ते विकायचे ठरवले. परंतु त्याने ज्या कंपनीचे डीमॅट खाते उघडले होते, त्यानी अधिक सुरक्षेसाठी एक आरएसए (RSA) टोकन दिले होते. शेअर खरेदी-विक्री करण्यासाठी त्या टोकनवरील सारखा बदलत राहणाऱ्या नंबरचा उपयोग पासवर्ड म्हणून करायचा असतो. परंतु त्यावेळेस धीरजला ते टोकन काही केल्या सापडेना. काही दिवसानंतर त्याला ते टोकन सापडले. परंतु तोपर्यंत मार्केट चांगलेच पडले होते आणि त्याच्या शेअरचे भाव देखील खाली आले होते. अजून नुकसान नको म्हणून त्याने सगळे शेअर विकून पैसे काढून घेतले. पुन्हा शेअर बाजारात गुंतवणूक करायची नाही असे त्याने ठरवले. ते पैसे त्याने घरात घरखर्चासाठी घरात आणून ठेवले. धीरजला घरात डब्यामध्ये काहीतरी ठेवताना पाहून भैरवीने त्याला विचारले, “काय आहे?”

भैरवीला पैसे दाखवत धीरज म्हणाला, “काही नाही. पैसे ठेवतो आहे.”

“कसले?”

तेंव्हा त्याने तिला सर्व खरे-खरे सांगितले. शेअर बाजार आणि तिथे केलेल्या सर्व व्यवहाराबद्दल त्याने तिला सांगितले. शेअर बाजार सतत वर खाली होत असतो हे तिला ऐकूण माहिती होते. त्यामुळे तिने त्याला समजविण्याचा प्रयत्न केला, “हे बघा! शेअर बाजारात गुंतवणूक करणे खूप धोक्याचे असते. त्यासाठी त्याचा खूप अभ्यास असणे गरजेचे असते. त्यामुळे शक्यतो त्यात पैसे गुंतवू नका.”

त्यालाही तिचे म्हणणे पटले. त्याने शेअर बाजारात पुन्हा पैसे गुंतवायचे नाही असे ठरवले. परंतु पैसा तर मिळवायला पाहिजे. त्यासाठी काय करावे याचा तो सारखा विचार करत होता.

एक दिवस सकाळी उठून न्याहरी करून धीरज घरात बसला होता. काही विशेष काम नसल्याने तो शांत बसून होता. काय करावे हे त्याला सुचत नव्हते. गावात एखादी चक्कर मारून यावे असे त्याला वाटले. परंतु त्याला कोणाकडे काही विशेष काम नव्हते आणि कोणाला भेटायची घाई देखील नव्हती. त्यामुळे तो चालतच गावात जायला निघाला. त्याच्या घरापासून मुख्य गावाचे अंतर तसे चार ते पाच किमी होते. गावाकडे जाणारा रस्ता एका टेकडीच्या कडेने जात होता. रस्त्याजवळील टेकडीच्या त्या भागात बरीच झाडी होती. ते अगदी एक छोटे जंगल असल्यासारखेच होते. धीरज विचाराच्या तंद्रीत त्या रस्त्यावरून चालला होता. त्या रस्तावर तशी काही विशेष रहदारी नसायची. एखादा दुसरा कोणी गेला तरी तो गाडीने किंवा बैलगाडीने जात असे. खूप क्वचितच कोणीतरी चालत जात असत. आज धीरज एकटाच तिथून चालत चालला होता. टेकडीवरील झाडीच्या जवळून जाताना त्याला कोणीतरी आवाज देत आहे असे वाटले. त्यामुळे त्याने निरखून झाडीत पाहिले. परंतु त्याला कोणी दिसले नाही. आठ-दहा झाडे पुढे गेल्यावर तो आवाज मोठा झाल्यासारखा वाटला. परंतु त्याला झाडीमध्ये कोणी दिसेना. अजून आठ-दहा झाडे पुढे गेल्यावर तो आवाज क्षीण होत चालल्याचे त्याला जाणवले. आठ-दहा झाड मागे कोणीतरी नक्की असेल असे त्याला वाटले.

कोणाला तरी मदत हवी असेल म्हणूनच ती व्यक्ती आवाज देत आहे असे त्याला वाटले. गाडीवर जाणाऱ्या कोणालाही हा आवाज जाणे शक्य नाही. आपण त्याला मदत करायला जायला पाहिजे असे धीरजला वाटले. तो आठ-दहा झाडे मागे आला. थोडे झाडीमध्ये जाऊन पाहू लागला. झाडी दाट असल्यामुळे भर दिवसादेखील आतमध्ये अंधार असायचा. झाडीत आल्यावर त्याला दूरवर झाडीत दोन डोळे दिसले आणि कोणीतरी हातवारे करून आवाज देते आहे असे जाणवले. तो लगेच त्या दिशेने भरभर गेला. जवळ जाऊन पाहतो तर त्याला एक विचित्र कपडे

घातलेला माणूस दिसला. त्या माणसाचे शरीर एकदम टाईट कपड्याने पूर्णपणे झाकलेले होते. पायातहि बुटाऐवजी अंगातल्या कपड्यांसारखेच कापड होते. त्याचा चेहरा सुद्धा तलम पारदर्शक कपड्याने झाकलेला होता. त्याच्या डोक्याच्या मागे पाठीवरून दोन छोटे पाईप वर आलेले होते. ते डोक्यापेक्षा थोडे जास्त वर आलेले होते. पायाजवळ त्याच्या कपड्यांना छोटी-छोटी अनेक छिद्र दिसत होती. असे कपडे घातलेला माणूस यापूर्वी धीरजने कधीहि पाहिलेला नव्हता. त्यामुळे धीरज थोडा घाबरला आणि आल्या पावलाने परत फिरू लागला.

“हेल्प, हेल्प, प्लीज हेल्प मी. आय विल नॉट हर्ट यु” (मला मदत करा. मी तुम्हाला त्रास देणार नाही. ) असे तो अनोळखी माणूस ओरडला.

त्याचा माणसासारखा आवाज आणि इंग्रजीतील विनवणी ऐकूण धीरज थांबला. धिरजचे शिक्षण पदवीपर्यंत झाले असल्याने त्याला त्याची इंग्रजीतील विनवणी कळली. किमान त्याला काय म्हणायचे आहे हे तरी समजून घेऊ या, या विचाराने धीरज थांबला. त्याच्या जवळ आल्यावर धीरज सहजपणे त्याला मराठीत म्हणून गेला, “काय झाले? काय पाहिजे?”

त्यावर तो माणूस चक्क मराठीत बोलला, “ मला तुझी थोडी मदत हवी आहे.”

त्याची मराठी ऐकल्यावर चमकून जाऊन धिरजने विचारले, “तुला मराठी येते?”

“हो मला मराठी येते. मला माहिती नव्हते इथे कोणती भाषा बोलली जाते, त्यामुळे सकाळपासून मी येणाऱ्या – जाणाऱ्याना इंग्रजीत बोलावत होतो. तुम्ही मराठी भाषा वापरता हे मला आता कळले जेंव्हा तू मराठीत बोललास.”

“इथे मराठी भाषा बोलतात म्हणजे ? तू कोण आहेस? कुठून आला आहेस?”

“तसे पहिले तर मी इथलाच आहे. मला थोडे बाहेर फिरायचे होते म्हणून मला आता तुम्ही जसे कपडे वापरता तसे कपडे हवे आहेत.”

“परंतु मला पहिले हे सांग. तू कोण आहेस? कुठून आला आहेस? कारण तुझ्यासारखा पोशाख मी कधी पाहिलेला नाही.”

“हे बघ तू मला तू घातलेस तसे कपडे दे. त्या बदल्यात मी तुला पैसे देतो.”

“कपडे, पैसे वगैरे आपण नंतर बघू. पहिले खरं खरं सांग काय भानगड आहे. नाहीतर मी गावातील लोकं गोळा करेन.”

“आता मला तुला सर्व खरे सांगितलेच पाहिजे.”

“म्हणजे?”

“खर म्हणजे मी भविष्यातून या काळात आलो आहे.”

“भविष्यातून? म्हणजे?”

“मी तीनशे वर्ष पुढील काळातून इथे आलो आहे.”

“हे कसे शक्य आहे?” धीरजचा त्याच्यावर विश्वास बसेना.

“बरं, हेच बघ ना. तू म्हणालास ना कि, मी घातलेला पोशाख तू कधी पहिला नाहीस. ते खरे आहे. कारण हा ३०० वर्ष भविष्यातील लोकांचा बाहेर जाताना घालायचा पोशाख आहे. हा फक्त पोशाख नाही तर याच्या आत एअर कंडीशनर देखील आहे.”

धीरजने आश्चर्याने विचारले “कसे काय?”

“३०० वर्षानंतरच्या आमच्या काळात पृथ्वीचे तापमान खूप वाढले आहे. त्यामुळे शरीराचा कुठलाही भाग उघडा ठेवणे केवळ अशक्य आहे. या पोशाखातून बाहेरची गरम हवा आत पोहचत नाही. पायाजवळ असलेल्या छिद्रातून बाहेरील हवा आता घेऊन गार केली जाते व शरीरभर फिरवली जाते. आणि माझ्या पाठीच्या मागे असलेल्या पाईपमधून गरम झालेली हवा बाहेर फेकली जाते.”

“खरंच! छान आहे. बाहेर जाताना हा ड्रेस घालता. तर मग घरात काय? ”

“ सगळयांच्या घरात एअर कंडीशनर असतोच. त्यामुळे घरात साधे कपडे घातले तरी चालतात. बाहेर जाताना मात्र अशा प्रकारचेच कपडे वापरावे लागतात.”

“भविष्यातून कसे शक्य आहे? तु भविष्यातून आला आहेस यावर माझा अजूनही विश्वास बसत नाही.”

“हे बघ मी एक शास्त्रज्ञ आहे. आईनस्टाईन पासून बरेच शास्त्रज्ञ टाइम मशीन तयार करण्यासाठी वेगवेगळ्या थेअरी मांडत आहेत. जेणेकरून भविष्यकाळात किंवा भूतकाळात जाता येईल. अशा प्रकारची मशीन बनवण्यासाठी बरेच शास्त्रज्ञ प्रयत्न करत आहेत. काही वर्षापूर्वी मी स्वतः एक टाइम मशीन तयार केली आहे. त्याचा दुरुपयोग व्हायची भीती वाटते म्हणून मी ही

गोष्ट कोणालाही सांगितलेली नाही. त्या टाइम मशीनचा उपयोग करून सध्या मी एकटाच वेगवेगळया काळात जातो आहे."

"मी देखील टाईम मशीन हा शब्द ऐकला आहे. परंतु ती फक्त एक कल्पना आहे. ती प्रत्यक्षात येणे केवळ अशक्य आहे. माझा यावर अजूनही विश्वास बसत नाहीये. खरं सांग नक्की तू कोण आहेत? आणि कुठून आला आहेस?"

"मी हवे तर तुला ते मशीन दाखवतो. मग तरी माझ्यावर विश्वास ठेवशील का?"

"हो.... कदाचित..."

"पण जर मला तू मदत करणार असशील तरच मी तुला ते मशीन दाखवीन."

"दाखव तर मला तुझे ते टाइम मशीन. जर खरं असेल तर नक्की करेन तुला मदत. पण तू माझे कपडे घालून, इथे फिरून काय करणार आहेस? "

"मी वेगवेगळया काळात जाऊन, त्या-त्या वेळेच्या परिस्थितीचा व राहणीमानाचा अभ्यास करतो आहे. त्यातून आमच्या काळातील प्रश्नांना उत्तरे सापडतात का? हे पाहतो आहे. मी इथे आल्या आल्या माझ्या आहे त्या पोशाखात बाहेर जाण्यासाठी निघालो. तेवढयात मी एकाला रस्त्यातून जाताना पाहिले. माझ्या लक्षात आले कि तुमच्या काळात माणसाचा पोशाख खूपच वेगळा आहे. त्यामुळे मी ताबडतोब परत झाडीत आलो. मी जर माझ्या आहे त्या पोशाखात बाहेर गेलो तर मला काहीही माहिती गोळा करता येणार नाही. उलट मीच लोकांच्या कुतूहलाचा विषय होईन व लोक माझ्या मागे लागतील."

"बरोबर आहे तुझे. खूप विचित्र दिसतो आहे तुझा पोशाख............ बरं... दाखवतोस ना मला तुझी टाइम मशीन?"

"मी दाखवतो. परंतु त्या बदल्यात तू मला तुझ्यासारखे कपडे आणि तीन-चार दिवस पुरतील एवढे पैसे देशील का?"

"पोशाख ठीक होता. आता हे पैसे कशासाठी हवे आहेत?"

"तीन-चार दिवस तुमच्या काळात वावरण्यासाठी मला आताचे चलन म्हणजे पैसे लागेतीलच ना?"

"पण असे कसे मी तुला पैसे देऊ? आता कुठे आपण भेटलो आहोत. तू कोण? कुठला? मला काही माहिती नाही. तू पुन्हा भेटशील याची खात्री नाही."

"काळजी करू नकोस मी त्या बदल्यात तुला काही तरी देईन."

"काही तरी म्हणजे ?"

"आताच्या काळात सर्वात मौल्यवान किंवा महाग धातू कोणता आहे?"

"सगळयात महाग.... सोनं!"

"तर मग मी तुला थोडे सोने देतो. मी माझ्याजवळ आमच्या काळात अस्तित्वात असलेले सर्व धातू ठेवले आहेत. त्यातील काही सोने मी तुला देईन. चालेल ना?"

"सोन्याच्या बदल्यात पैसे........... ठीक आहे... चालेल"

"चल माझ्याबरोबर." असे म्हणून तो माणूस झाडीत चालू लागला. धीरज देखील त्याच्या मागे मागे जाऊ लागला. धीरजचा यावर विश्वासच बसत नव्हता. हे स्वप्न तर नाहीना याची खात्री करण्यासाठी त्याने स्वतःला चिमटा देखील काढून पाहिला. मनातल्या मनात त्याला भीतीदेखील वाटत होती. परंतु सोने मिळणार या लालचेने तो त्याच्या मागे जात राहिला. जंगलाच्या मध्यभागी थोडी मोकळी जागा होती तिथे येऊन तो थांबला. आणि धीरजकडे वळत म्हणाला, "इथे आहे माझे टाइम मशीन."

"इथे तर काहीच दिसत नाही. मला वेडा समजलास का?"

"थांब मी दाखवतो तुला." असे म्हणत तो माणूस त्या मोकळया जागेच्या एका बाजूला असलेल्या जाड बुंध्याच्या झाडाजवळ गेला. त्या झाडाच्या बुंध्याकडे पाठ करून व मोकळया जागेच्या मध्याकडे तोंड करून पाहत त्याने काहीतरी तोंडाने पुटपुटायला सुरुवात केली आणि त्याच वेळेस एका विशिष्ठ पध्दतीने हात फिरवायला सुरुवात केली. जसे आपण मोबाईलचे स्क्रीन लॉक उघडण्यासाठी बोटाने पॅटर्न फिरवतो अगदी तश्याच प्रकारे त्याने हात फिरवला. जसे त्याचे हात फिरवणे थांबले तसे एक भले मोठे यंत्र त्या जागेत प्रकट झाले. आता त्याला खात्री पटली कि हे कसले तरी मशीन आहे आणि कदाचित तो सांगतो त्याप्रमाणे हेच टाइम मशीन असू शकेल.

त्या माणसाने पुढे जाऊन त्या टाइम मशीनचा दरवाजा उघडला. तो काय करतो आहे हे पाहण्यासाठी धीरज उत्सुकतेने त्या टाइम मशिनच्या दरवाज्याजवळ गेला व आत पाहू

लागला. आतमध्ये मध्यभागी एक आरामदायी खुर्ची दिसत होती. त्या खुर्चीसमोर एक छोटे टेबलासारखे काही तरी होते. त्या टेबलाच्या खाली बरेच छोटे कप्पे (drawer) होते. त्याने अंगठ्याच्या ठस्याच्या मदतीने (fingerprint scanning) त्यातील एक कप्पा उघडला. त्यातून त्यात काही तरी शोधण्याचा प्रयत्न केला. कदाचित त्याला हवे ते न मिळाल्याने त्याने अंगठ्याच्या ठस्याच्या दुसरा कप्पा उघडला. त्यामध्ये थोडे शोधल्यानंतर त्याने काहीतरी काढून हातात घेत तो कप्पा पुन्हा बंद केला. तो हातात ती वस्तू घेऊन बाहेर धीरजकडे आला. त्याच्या हातातील गोष्ट धीरजला दाखवत तो म्हणाला, ”मी तुला हे सोने देईल. त्याबदल्यात मला तू तीन-चार दिवस पुरतील एवढे पैसे दे.”

धीरजने ते हातात घेतले आणि जरा निरीक्षण करत जवळून पहिले. ते साधारण १० तोळयाचे सोन्याचे बिस्कीट होते. त्याची आता बाजारातील किंमत साधारणपणे अडीच लाख रुपये नक्कीच होती. त्यामुळे धीरजला खूप आनंद झाला. परंतु त्याने तो चेहऱ्यावर दाखवला नाही. तो त्याला म्हणाला, “ठीक आहे. किती पैसे हवेत तुला?”

“मला आजच्या काळात चार-पाच दिवस राहण्या-खाण्यासाठी व प्रवासासाठी पुरतील एवढे पैसे दे.”

“ठीक आहे. मी तुला एक माझ्यासारखा पोशाख आणि पंचवीस हजार रुपये देतो.”

धीरज त्याला पुरेसे पैसे देतो कि नाही अशी त्याला शंका आल्याने तो धीरजला म्हणाला, “उरलेले पैसे मी तुला परत देईन.”

“पंचवीस हजार रुपये तुला चार दिवस आरामात पुरतील.”

धीरजच्या हातातून बिस्कीट परत घेत तो म्हणाला, “ठीक आहे मग...... तू पैसे आणि कपडे घेऊन ये.”

त्यानंतर त्याने दरवाजा बंद केला आणि पुन्हा त्या बुंध्यापाशी जाऊन तसेच हातवारे केले. यावेळेस ते टाईम मशीन गायब झाले.

त्यावर धीरजने त्याला विचारले, “हे तुम्ही असे काय करता?”

त्यावर तो म्हणाला, “ हा या मशीनला दृश्य-अदृश्य करायचा पासवर्ड आहे. हा माझ्या हाताशिवाय आणि आवाजाशिवाय चालत नाही.”

“आपण एवढा वेळ एकमेकांशी बोलतो आहोत पण आपला परिचय झालाच नाही. तुमचे नाव काय आहे?”

“अरे हो कि. माझे नाव प्रभात आहे. तुझे नाव काय?”

“माझे नाव धीरज रमाकांत दळवी आहे.”

“एवढे मोठे नाव?”

“धीरज माझे स्वत:चे नाव, रमाकांत माझ्या वडिलांचे नाव आणि दळवी हे आमच्या कुटुंबाचे नाव आहे.”

“अरे व्वा, पहिली वेगळी माहिती मिळाली आहे. म्हणजे या काळात नावापासूनच कुटुंब व्यवस्था सुरु होते वाटत. आमच्या काळात तर कुटुंबव्यवस्था पूर्ण संपली आहे.”

“म्हणजे? तुला आई-वडील, बायको, मुल नाहीत”

“आमच्या काळात मुल टेस्ट ट्यूब मध्ये वाढवतात. ते मुल सरकारच्या ताब्यात असतात. सरकार त्याला योग्य सोईसुविधा देऊन मोठे करते. मानवी बुद्धीमतेला भावभावनाच्या जाळ्यात अडकविण्यापेक्षा त्याचा जास्तीत जास्त उपयोग नवनिर्मिती करण्यासाठी व्हावा हाच त्यामागचा उद्देश होता. त्यामुळे कोणालाही त्याचे आई-वडील माहिती नसतात. आम्हाला आमचे कुटुंब, भाषा, जात, धर्म काहीही माहिती नसते. बायको अशी खूप कमी जणांना असते. बऱ्याच जणांना फक्त गर्लफ्रेंडच असते. लोकसंख्या खूप कमी होऊ नये. त्यामुळे प्रत्येकाला किमान एक मुल सरकारला द्यावेच लागते. त्यासाठी सुद्धा नैसर्गिकपेक्षा टेस्ट ट्यूब बेबीला प्राधान्य दिले जाते. सगळे विचित्रच झाले आहे हे आता सगळ्यांना पटायला लागले आहे. परंतु ते सुधारण्यासाठी उपाय सापडायला तयार नाही.”

धीरजला कधी एकदा सोन्याचे बिस्कीट घेतो असे झाले होते. त्यामुळे तो आता त्याचे ते पुराण ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता.”बर जातो आता मी आणि अर्धा तासात परत येतो.” असे म्हणून धीरज जायला निघाला.

आता त्याला घाई झाली होती ती कधी एकदा ते सोन्याचे बिस्कीट ताब्यात घेतो याची. त्यामुळे झपझप पावले टाकत धीरज ताबडतोब घरी आला. तो एकदम आणि असा भरभर

आलेला पाहून भैरवी थोडी चकितच झाली. तिने त्याला विचारले, “काय हो? काय झाले? एवढ्या गडबडीत!”

“काही नाही, थोडं काम आहे म्हणून घरी आलो.” असे म्हणून तो पटकन घरात गेला. शेअर विकून आलेले पैसे डब्यातून काढून मोजत बसला. त्यातून पंचवीस हजार मोजून त्याने बाजूला काढले. ते पाहून तिला वाटले कि तो आता पुन्हा शेअर खरेदी करणार. तिला राहवले न जाऊन ती त्याला म्हणाली, “शेअरमध्ये टाकायला नेता आहात कि काय?आता पुन्हा शेअरच्या नादाला नका लागू. त्याला खुप अभ्यास लागतो. आपल्या सारख्यांना नाही जमणार त्यातून पैसे कमवायला. वाडवडिलांची थोडी राहिलेली जमीन सुद्धा आता विकायची वेळ येणार नाही याची काळजी घ्या.” तो उरलेल्या नोटा मोजण्यात गर्क होता. त्यामुळे तिचे पूर्ण वाक्य ऐकलेच नाही.

“अग काळजी करू नकोस. माझ्या एका मित्राला अर्जंट हवे आहेत. म्हणून त्याला देत आहे. पीकपाणी झाले कि देतो म्हणाला.”

“मग ठीक आहे.” असे म्हणत ती तिथेच उभे राहून तो काय करतो आहे ते पाहत उभी राहिली.

त्यानंतर त्याने कपाटातून त्याचे दोन-तीन चांगले ड्रेस काढले. ते पाहताच तिने विचारले, “आता हे कशासाठी? कुठे बाहेर चालला आहात कि काय?”

“नाही ग. आपल्याकडे बऱ्याच वेळा लाईट नसते ना. त्यामुळे कपड्याला इस्त्री करायची राहते. गावात चाललो आहे तर टाकतो कपडे इस्त्री करायला.” असे म्हणून तो निघाला.

आता त्याला लवकर जाऊन प्रभातला कपडे, पैसे देऊन सोन्याचे बिस्कीट घ्यायची घाई झाली होती. त्यामुळे तो गाडी घेऊन निघाला. टेकडीच्या पायथ्याशी आल्यावर कोणाला दिसणार नाही अशा पद्धतीने त्याने त्याची गाडी झाडीच्या कडेला लावली. इकडे तिकडे पाहून कोणी पाहत नाही ना याची खात्री करून घेतली. आणि जेंव्हा त्याची खात्री पटली तेंव्हा तो झाडीत जायला निघाला. तो सरळ भरभर चालत त्या मोकळया जागेकडे जायला निघाला. त्या मोकळया जागेच्या जवळ आला तर तिथे प्रभात त्याचीच वाट पाहत उभा होता. धीरजने त्याला पिशवीतून एक ड्रेस व पंचवीस हजार रु दिले आणि म्हणाला, “ हे पंचवीस हजार आहेत. मोजून घे. एवढे पैसे तुला नक्की तीन-चार दिवसासाठी पुरतील.”

"मोजायची काही गरज वाटत नाही." असे म्हणत त्याने धीरजला त्याच्याकडील सोन्याचे बिस्कीट दिले. प्रभातने कपडे उलटे-पुलटे करून कसे घालायचे ते पहिले आणि तो टाइम मशीनकडे जायला निघाला. मध्येच थांबत धीरजकडे वळत प्रभात म्हणाला, "हे बघ. तू चार दिवसानंतर जर इथे आलास तर तुला इथे तुझे कपडे आणि त्या कपड्यात उरलेले पैसे ठेवलेले मिळतील."

धीरजला आता मोठ्या किंमतीचे सोन्याचे बिस्कीट मिळाले होते त्यामुळे तो लगेच उत्तरला, "कशाला? तू घेऊन गेलास तरी चालेल."

"तुझ्या पैश्याचा आणि कपड्यांचा मला माझ्या काळात काहीही उपयोग होणार नाही."

"ठीक आहे. अजून काही मदत हवी आहे का तुला माझ्याकडून?" धीरजने त्याला विचारले. कारण आता त्याला साधारणपणे अडीच लाखाचे सोन्याचे बिस्कीट मिळाले होते. त्यामुळे अजून काही मदत हवी असेल तरी ती करायची त्याची तयारी होती.

"येथून मुख्य शहर किती लांब आहे?"

"साधारण वीस किलोमीटर असेल."

"बरेच लांब आहे...... तिथे जायला एखादे वाहन कुठून मिळेल?"

"गावातून मिळेल"

"गाव किती लांब आहे."

"दोन किलोमीटर असेल".

"तेही लांबच आहे. आम्हाला जास्त चालायची सवयच नाही. कुठेही जाताना आम्ही वाहन घेऊनच जातो. त्यामुळे जर तुला शक्य असेल तर मला गावात सोडशील का? जेथून मला पुढे जाण्यासाठी काहीतरी वाहन मिळेल."

"ठीक आहे. तू कपडे बदल. मी तुला गावात सोडतो. तेथून तुला सर्व प्रकारची वाहनं मिळतील."

त्यानंतर प्रभात मशीनजवळ गेला. त्याने मगाशी केले तसे हातवारे केले आणि त्यानंतर मशीन दिसायला लागले. यावेळेस धीरज खूप लक्ष देऊन त्याचे हातवारे पाहत होता. त्याच्या डोक्यात काहीतरी चालू होते. प्रभात टाइम मशीनमध्ये गेला आणि काही वेळानंतर धीरजचे कपडे घालून बाहेर आला. बाहेर येताना त्याच्या हातात मोबाईलसारखे एक छोटे यंत्र होते. बाहेर आल्यांनतर प्रभातने हातवारे करून पुन्हा टाइम मशीन गायब केले. धीरजचे कपडे प्रभातला अगदी व्यवस्थित बसले होते.

धीरजकडे चालत येत तो म्हणाला, “चल, सोड मला गावात आणि हेही सांग कि जवळच्या दुसऱ्या गावात किंवा शहरात जायचे असेल तर कसे जायचे?”

“मी तुला गावात सोडतो. परंतु इथल्या लोकांच्या बोलण्याचा अर्थ आणि संदर्भ कसा कळणार तुला? परत टाइम मशीनजवळ यायला तुला ही जागा सापडेल ना?” असे धीरजने त्याला विचारले. दोघेही गप्पा मारत रस्त्याकडे यायला निघाले होते. आता याच काळाचा पोशाख घातलेला असल्याने प्रभातही निवांत झाला होता. ते गप्पा मारत गाडीकडे निघाले.

“जसे तुझे बोलणे मला कळले तसेच...”

“म्हणजे?”

“माझ्या पोषाखात भाषा अनुवादक (language translator) करण्याचे यंत्र होते. जे आमच्या काळात ज्ञात असणाऱ्या सर्व भाषांचे एकमेकात भाषांतर करून मला कळेल अशा भाषेत मला ऐकवते. शिवाय ते मला ती भाषा बोलायला मदत देखील करते.” तोपर्यंत ते दोघे गाडीजवळ आले. त्यानंतर धीरजने गाडी चालू केली आणि प्रभात त्याच्या मागे बसला.

“परंतु तू तर आता तुझा पोशाख घातला नाही?”

प्रभात त्याच्या हातातील मोबाईल सारखे यंत्र त्याला दाखवत म्हणाला “म्हणूनच हे यंत्र मी घेतले आहे. हे सगळे त्याच प्रकारचे भाषा अनुवादकाचे काम करते. शिवाय नकाशावर मी जात असलेले सर्व मार्ग व्यवस्थित नोट करून ठेवते. सर्व चर्चा, आजूबाजूचे आवाज रेकार्ड करून घेते.”

“चांगल आहे कि. म्हणजे छोटा कॉम्पुटरच आहे हा. खूप प्रगती केलेली दिसते माणसाने भविष्यामध्ये.”

“हो अगदी बरोबर. खूप यांत्रिक प्रगती केली आहे. परंतु बाकी बऱ्याच गोष्टींमध्ये मात्र अधोगती झाली आहे. प्रदूषण, पृथ्वीचे तापमान, नातेसंबंध, मानसिक सुख या गोष्टी खूप बिघडल्या आहेत. त्याचीच उत्तरे शोधण्याचा प्रयत्न मी वेगवेगळया काळात जाऊन करतो आहे.”

तोपर्यंत ते गावात पोहचले. धीरजने गाडी थांबवल्यावर प्रभात गाडीवरून खाली उतरला. धीरजने त्याला रिक्षा दाखवून सांगितले, “याला रिक्षा म्हणतात. छोटे अंतर जाण्यासाठी याचा वापर करतात.” बसकडे बोट दाखवत म्हणाला, “ती जी लाल रंगातील मोठी गाडी दिसते आहे ना तिला बस असे म्हणतात, लांब अंतर जाण्यासाठी हिचा वापर करतात. आता शहरात जायला तुला बसच करावी लागेल.” प्रभात धीरजचे बोलणे ऐकता ऐकता आजूबाजूचे निरीक्षण करत होता.

“मला माहित नाही कि आपण पुन्हा भेटू कि नाही. त्यामुळे मी आताच तुला धन्यवाद देतो. तू मला खूप मदत केली आहेस त्यासाठी मी तुझा खूप खूप आभारी आहे.” असे म्हणत त्याने धीरजचा हात हातात घेऊन दाबला. त्यानंतर धीरजचा हात सोडून त्याला हाताने टाटा करत प्रभात बसकडे निघाला. तो इथलाच असल्याप्रमाणे अगदी सहज बसमध्ये जाऊन बसला.

ती बस निघेपर्यंत धीरज तेथे थांबला होता. ती बस गेल्यानंतर धीरज लॉड्रीमध्ये जातो आणि बरोबर आणलेले जास्तीचे दोन ड्रेस इस्त्रीला टाकतो. तेवढयात त्याला प्रभातने दिलेल्या सोन्याच्या बिस्किटाची खात्री करून घ्यायचे मनात येते. त्यासाठी तो लगेच गावातल्या सोनाराकडे गेला. ते बिस्कीट सोनाराला देत म्हणाला, “ हे खरे आहे का? जरा तपासता का?”

सोनाराने ते घेतले. त्याच्याकडील दगडावर थोडे घासले आणि निरखून पहिले. त्यानंतर धीरजकडे वळत म्हणाला, “अगदी अस्सल शंभर टक्के चोख सोन आहे.”

गावात असे सोन्याचे बिस्कीट सोनाराने कोणाकडे पाहिले नव्हते. त्यामुळे धीरजकडे संशयाने पाहत विचारेले, “कुठे मिळाले?”

“माझे वडील रमाकांत दळवी माहित आहेत ना तुम्हाला?”

“हो, खूप चांगला माणूस होता.”

“त्यांची सामानाची पेटी बघताना मला त्यात मिळाले. त्यांनी कधीतरी आणून ठेवले असणार घरात.”

“काही करायचे आहे का त्याचे?”

“आता तरी काही विचार नाही.” असे म्हणत त्याने ते सोन्याचे बिस्कीट सोनाराकडून घेतले. आता गावात तसे काही विशेष काम नसल्याने तो घरी यायला निघाला. सोने खरे असल्याच्या खात्री झाल्याने तो त्याच्या मनात असलेली छोटी शंका देखील दूर झाली होती.

घरी येताना झाडीच्या जवळ आल्यावर एकदा टाइम मशीनजवळ जाऊन यावे असा विचार त्याच्या मनात आला. त्यामुळे त्याने गाडी झाडाजवळ आडोशाला घेतली आणि कोणी पाहत नाही ना याची खात्री करून तो झाडीत घुसला. दोन वेळा येऊन गेल्याने टाइम मशीन ज्या ठिकाणी होती त्या जागेकडे जायचा रस्ता त्याला चांगलाच माहित झाला होता. झाडीतील टाइम मशीन ठेवलेल्या मोकळया जागेत आल्यावर साहजिकच तिथे टाइम मशीन दिसत नव्हते. त्याला वाटले कि आपण प्रभातसारखे हातवारे करून पाहू यात. म्हणून त्याने दोन तीन वेळा तिथे उभे राहून तसे हातवारे केले. परंतु काही झाले नाही. तेव्हा त्याला वाटले प्रभात म्हणाला त्याप्रमाणे ते फक्त त्याच्या आवाजाने व त्याच्या हाताच्या हातवाऱ्यानीच प्रकट होत असेल. म्हणून तो परतघरी जायला निघाला. दोन-तीन पावले गेला असेल तोच त्याला आठवले कि प्रभात प्रत्येक वेळेस त्या जाड बुंध्याच्या झाडाच्या पायथ्याशी जाऊन थांबत व हातवारे करत होता. मग तो देखील त्या जाड बुंध्याच्या झाडाच्या बुंध्याजवळ गेला व तसेच हातवारे केले. तर काय चमत्कार टाइम मशीन समोर प्रकट झाले. त्याच्या लगेच लक्षात आले कि आपण मशीन पाहण्याचा प्रयत्न करू नये म्हणून प्रभात तोंडाने काही तरी बडबड करून हातवारे करत होता. शिवाय आपल्याला सांगितले कि त्याच्याच आवाजाने आणि त्याच्याच हाताच्या हातवाऱ्यानी मशीन प्रकट होते.

तो ती मशीन प्रकट करू शकतो याचा त्याला खूप आनंद झाला होता. तो हळूच मशिनच्या दाराजवळ गेला आणि ते उघडण्याचा प्रयत्न केला, तर ते दारही लगेच उघडले. आता त्याला आतमध्ये जाऊन मशीन पाहता येणार होते. आता पर्यंत तो फक्त प्रभातला आत जाताना पाहत होता. त्याने हळूच त्यामध्ये प्रवेश केला. आतमध्ये मध्यभागी एक छान आरामदायी खुर्ची होती. त्या खुर्चीच्या समोर एक टीपॉयच्या उंचीचा एक छोटा टेबल होता. त्याच्या खाली बरेच कप्पे दिसत होते. प्रत्येक कप्प्यावर फिंगरप्रिंट स्कॅनर (fingerprint scanner) होता. त्याने पहिले होते कि सोन्याचे बिस्कीट काढण्यासाठी प्रभातने त्यातील एका कप्प्यासमोर अंगठा स्कॅन केला होता. त्यामुळे त्याने ते उघडण्याचे प्रयत्न केला नाही. त्यानंतर तो त्या खुर्चीवर बसला. खुर्चीच्या समोर असलेल्या टेबलवर खूप वेगवेगळया प्रकारची व वेगवेगळया आकाराची खूप बटणे होती. त्या टेबलाच्या मध्यभागी आठ गोल फिरवायची बटन होती त्यावर शून्य ते नऊ

पर्यंतचे आकडे छापलेले होते. प्रत्येक बटणाच्या कडेला एक छोटा बाण प्रिंट केलेला होता. पहिल्या दोन बटणाच्या खाली इंग्रजीतील डी (D) अक्षर छापलेले होते. पुढच्या दोन बटणाच्या खाली इंग्रजीतील एम (M) हे अक्षर छापलेले होते. आणि शेवटच्या चार बटणाच्या खाली इंग्रजीतील वाय (Y) हे अक्षर छापलेले होते. त्यावरून त्याचा लगेच हे लक्षात आले कि हे DD/MM/YYYY या स्वरुपात आहे. म्हणजे तारीख निवडण्यासाठी ही बटण वापरतात. सगळ्यात खालच्या बाजूला इंग्रजीत “गो” असे लिहिलेले एक मोठे आयताकृती बटन होते. त्यावरून ते निवडलेल्या काळात जाण्यासाठी वापरायचे बटन असावे इतपत त्याला लक्षात आले होते. परंतु त्या बोर्डवर असलेल्या इतर बटणाबद्दल मात्र त्याला काही कळेना.

तेवढे पाहून तो बाहेर आला. आता तो बाहेरून ते मशीन पाहू लागला. त्या छोट्या खोलीच्या खालच्या बाजूला दोन मोठ्या धातूच्या रिंगा होत्या. वरच्या बाजूला आणि डाव्या उजव्या बाजूला चार एकमेकात बसतील अशा धातूच्या रिंगा होत्या. तेवढे पाहून झाल्यावर त्याने घरी जायचे ठरवले. तो घरी जायला निघाला तेवढयात त्याच्या लक्षात आले कि टाइम मशीन गायब करायचे राहूनच गेले. तो पुन्हा त्या मोठ्या झाडाच्या बुंध्याजवळ आला. मशीन प्रकट करायला केले तसेच हातवारे त्याने केले आणि ते मशीन पुन्हा गायब झाले.

आपल्याला टाइम मशीन जवळून पाहता आले याचा त्याला आनंद झाला होता. परंतु त्यापेक्षाही ते मशीन प्रकट आणि गायब करता आले याचा त्याला खूप आनंद झाला होता. त्या आनंदातच तो घरी निघाला. परंतु या सर्वामुळे त्याला घरी यायला थोडा उशीरच झाला होता. भैरवी त्याची जेवणासाठी वाट बघत थांबली होती. त्यामुळे तो आल्यावर ते दोघे लगेचच जेवायला बसले. जेवताना धीरज शांतपणे काहीही न बोलता जेवत होता. त्याच्या डोक्यात सारखे ते मशीन आणि सोन्याचे बिस्कीट याबद्दल विचार चालू होते. जेवणानंतर तो शांत बसला होता. तेवढ्यात भैरवीने कपाटात ठेवलेली काही कागद बाहेर काढली आणि त्याला दाखवले. तिने विचारले, “हे शेअरचे दिसतात? लागतात का? घर साफ करताना सापडले आहेत”

धीरजने ते कागद हातात घेऊन निट पाहिले आणि तिला परत देत म्हणाला, “नाही लागत. मागे विकत घेतलेल्या शेअर्सची आहेत. टाकून दे.”

“मला वाटल तुम्ही पुन्हा शेअर बाजार चालू केला कि काय.”

“नाही ग. सांगितले ना मी तुला एकदा कि आता मी शेअर बाजारात पैसे लावणे पूर्णपणे बंद केले आहे.”

"बरे झालं बाई. आपण थोडेच ज्योतिषी आहोत ? भविष्यात कुठले शेअर वाढणार हे आपल्याला कसे कळणार." असे म्हणत ती ते कागद कचऱ्यात टाकायला बाहेर गेली. परंतु जाता जाता ती धीरजच्या डोक्यात एक विचार टाकून गेली. त्याच्या डोक्यात विचार चालू झाला. जर आपल्याकडे टाइम मशीन असती तर आपल्याला भविष्य कळले असते. कधी कुठल्या शेअरचे भाव वर जाणार आहेत व कुठल्या शेअरचे कमी होणार आहेत हे कळले असते. त्यानंतर आपण योग्य त्या शेअरमध्ये पैसे गुंतवून भरपूर पैसे मिळवू शकलो असतो. मग त्याला वाटले दोन-तीन दिवस का होईना आता आपल्याजवळ प्रभातची टाइम मशीन आहे ना. परंतु अजून ती वापरून पहिली नव्हती. जर आपल्याला ती वापरता आली तर आपल्याला दोन-तीन दिवसासाठी भविष्य पाहता येईल. हा विचार डोक्यात येताच तो ताडकन उठला आणि बाहेर जाऊन येतो सांगून तो बाहेर निघाला.

गाडी झाडीच्या आडोश्याला लावून तो कोणी पाहत नाही याची खात्री करून टाइम मशीनच्या जवळ आला. आपल्याला टाइम मशीन चालवता येईल कि नाही, टाइम मशीन आपल्या प्रयत्नामुळे बिघडली तर, नंतर प्रभातला आपण मशीन वापरण्याचा प्रयत्न केला हे कळले तर, असे अनेक विचार त्याच्या डोक्यात चालू होते. आता त्याला जड बुन्ध्याचे झाड चांगले लक्षात राहिले होते. धीरज त्या जड बुंध्याजवळ गेला आणि मोकळया जागेकडे तोंड करून उभा राहिला. त्याच्या मनात चलबिचल चालू होती. त्याने टाइम मशीनचा पासवर्ड असलेले हातवारे करून ते मशीन प्रकट केले. आता त्याने ठरवले जे होईल ते बघता येईल. प्रभात आपल्यालाच का भेटला. कदाचित हा देवाचाच संकेत असावा. असा विचार करून त्याने दार उघडले आणि आत जाऊन दार बंद करून घेतले. बघू तरी आपल्याला टाइम मशीन चालवायला जमते का? असा विचार करून तो त्या खुर्चीवर बसला. समोरच्या टेबलवरील आठ बटण जे तारीख दाखवत होते. ते पाहिल्यावर धीरजला लक्षात आले कि त्यावर आजचीच तारीख आहे. धीरजने त्यातील शेवटच्या चार बटणावर त्याने आजपासून पुढील तीसरे वर्ष निवडले. म्हणजे आजपासून ३ वर्षानंतरचा तो दिवस होता. आता तो जरा वेळ शांत झाला थोडा विचार केल्यानंतर त्याने "गो" हे बटण दाबले. तेवढ्यात खूप वेगवेगळे आवाज व्हायला लागले. त्या आवाजाने धीरज खूप घाबरला. त्याला वाटले त्याने काहीतरी चुकीचे केले आहे. त्याला भीती वाटायला लागली कि मशीन बिघडले तर काय. हळू हळू भोवतालच्या सर्व वस्तू फिरु लागल्याचे त्याला दिसू लागले. धीरजला त्याचे शरीर हलके होत आहे असे वाटू लागले. हळूहळू आजूबाजूच्या वस्तूंचा वेग वाढत गेला आणि एक वेळ अशी आली कि आजुबाजुचे सर्व गायब झाले. त्याला असे वाटू लागले कि तो हवेत उडतो आहे. आजूबाजूला फक्त प्रचंड प्रकाश दिसत होता. काही वेळानंतर त्याला

आजूबाजूच्या वस्तू पुन्हा दिसू लागल्या. वेग हळू हळू कमी होत गेला आणि सर्व स्थिर झाले. या सगळयामुळे धीरजला चक्कर आल्यासारखे झाले. त्यामुळे तो थोड्यावेळ तिथेच त्या खुर्चीवर बसून राहिला. थोडे बरे वाटल्यावर तेथून उठला. त्याने दार उघडले आणि तो बाहेर आला. पाहतो तर आजूबाजूला सर्व झाडी जशीच्या तशी होती. त्याला वाटले मशीन चालले नसेल. म्हणून निराशेने त्याने दार लावून घेतले आणि त्याने घरी जायचे ठरवले. त्याचे भविष्याचा उपयोग करून घ्यायचे स्वप्न उद्ध्वस्त झाले होते. थोड्या निराशेतच हातवारे करून टाइम मशीन अदृश्य करून तो चालत रोडवर आला.

रोडवर जिथे त्याने गाडी लावली होती तिथे त्याची गाडी नव्हती. तो एकदम घाबरला, त्याला वाटले त्याची गाडी चोरीला गेली असेल. गाडी घेऊन जाणारा कुठे दिसतो का म्हणून त्याने आजूबाजूला पाहिले. परंतु कोणीही दिसेना. त्यामुळे खूपच निराश झाला. जर गाडी मिळाली नाही तर सोन्याच्या बिस्किटाच्या माध्यमातून मिळणारे काही पैसे गाडीत खर्च होणार होते. त्यामुळे तो जास्तच उदास झाला. तो घराकडे चालत निघाला. तेवढ्यात त्याच्या लक्षात आले कि झाडीमध्ये जाताना खडबडीत खडीचा असलेला रस्ता आता गुळगुळीत असा डांबरी झाला होता. मग त्याने थोडे दूरवर पाहून अजून काही बदल झाला का ते पाहू लागला. तर दूरवर दिसणारी काही घरे, जी कच्ची होती ती पक्की झालेली दिसत होती. त्याने मोबाईल काढून पाहिले तर मोबाईलवर तीन वर्षानंतरची तारीख दिसत होती. त्याच्या चेहऱ्यावरील उदासीचा भाव एकदम गायब झाला. या सगळ्या बदलामुळे त्याच्या लक्षात आले कि आपण टाइम मशिनच्या मदतीने खरोखरच तीन वर्ष पुढे भविष्यात आलो आहोत.

आता मात्र त्याचा चेहरा खुलला. आपण कशासाठी भविष्यात आलो हे त्याला आठवले. त्यामुळे जास्त वेळ वाया न घालवता तो भरभर चालत गावात जायला निघाला. जसे त्याने गावात प्रवेश केला तसे त्याला काही दुकानामध्ये बदल झालेला दिसला. गावातील बरेचसे रोड सिमेंटचे झालेले त्याच्या लक्षात आले. तेवढ्यात त्याच्या लक्षात आले कि त्याच्या ओळखीचे लोकं त्याला आवाज देत आहेत. थांबलो तर वेळ जाईल आणि वर्तमानात जायला वेळ होईल म्हणून सगळयांना तो उद्या बोलू असे सांगून पुढे भरभर जात होता. त्याला शेअरचे भाव घेऊन वर्तमानात परत जायची घाई झाली होती. त्यामुळे त्याला बोलायला मुळीच वेळ नव्हता. तो भरभर चालत नेटकॅफेत गेला. तर नेटकॅफे देखील बराच बदलला होता. सगळे फर्निचर नवीन दिसत होते. सगळ्या कॉम्पुटरला फ्लॅट स्क्रीन डिस्प्ले लावले होते. तो नेटकॅफेतील मुलाला कुठे बसू विचारून. त्याने सांगितलेल्या कॉम्पुटरवर येऊन बसला. त्याने शेअर बाजाराची माहिती देणाऱ्या वेबसाईटवर जाऊन ३ वर्षापूर्वी कमी असलेल्या आणि आता वाढलेल्या सर्व शेअरची

यादी काढली. त्यातील सर्वात जास्त वाढलेल्या २५ कंपन्याची यादी त्याने वेगळी केली. त्यातील बहुतांश कंपन्याचे भाव कमीत कमी पंचवीस पट तरी वाढले होते. त्याने पटकन त्या शेअर्सची यादी प्रिंट करून घेतली. पैसे देऊन तो नेटकॅफेतून बाहेर निघणार तर नेटकॅफेवाला तिथे आला आणि त्याला काही विचारू लागला. परंतु धीरज त्याला म्हणाला आता गडबडीत आहे उद्या बोलू असे म्हणाला आणि लगेच टाइम मशीनकडे जायला निघाला.

तो पुन्हा चालत मशिनकडे आला. पटकन पासवर्डचे हातवारे करून मशीन प्रकट केले आणि दार उघडून त्यात जाऊन बसला. आता त्याच्या मनातील टाइम मशीनबद्दलची भीती निघुन गेली होती. आता त्याने तीन वर्षापूर्वीची तारीख म्हणजे वर्तमानाची तारीख टाकली. त्यानंतर मशीन चालू करून वर्तमानात परत आला. बाहेर येऊन त्याने पुन्हा मशीन गायब केले. आता तो रस्त्यावर आला तेंव्हा त्याची गाडी तिथे उभी होती आणि रस्ता देखील पहिल्यासारखा खडबडीत दिसत होता. आता त्याला खात्री झाली कि आपण भविष्यात जाऊन परत आलो आहोत. आता तो पुन्हा गावात निघाला. आता त्याला खात्री करायची होती कि त्याने यादी केलेल्या शेअरचे आताचे भाव नक्की कमी आहेत का? तो नेटकॅफेत आला तर त्याला तिथे जुने फर्निचर व कॉम्पुटर दिसले. हे सगळे पाहून त्याला खूप गंमत वाटत होती. तो गालातल्या गालात हसत होता. कॉम्पुटरवर बसल्यावर त्याने पुन्हा त्याच शेअर बाजाराच्या वेबसाईट उघडल्या आणि त्या शेअरच्या आजच्या किंमती तपासल्या तर त्या अगदी बरोबर निघाल्या. आता त्याला खात्री झाली कि हे शेअर ३ वर्षांनंतर नक्कीच वाढणार आहेत. या सगळया धावपळीत संध्याकाळ झाल्याने तो लगेच नेटकॅफेतून घरी जायला निघाला.

त्याला खरोखरच भविष्य कळल्याने तो खूप खुश होता. आता गुंतवणुकीचे विचार त्याच्या डोक्यात फिरू लागले. तो आता गुंतवणुकीसाठी पैशाची जुळवाजुळव कशी करता येईल याचा विचार करू लागला. घरी आपल्याकडे पन्नास हजार आहेत. हे सोन्याचे बिस्कीट विकून अडीच लाख येतील. असे ३ लाख गुंतवले तर तीन वर्षात तीन लाखाचे कमीत कमी पंच्याहत्तर लाख तर नक्की होतील. घरी आल्यानंतर जेवण तयार झाल्यावर त्याने लगेच जेवण केले आणि अंगणामध्ये भविष्यातील श्रीमंतीचे स्वप्न रंगवत बसला. त्याच्या डोक्यात आले कि तीन चार दिवसानंतर प्रभात आला आणि ती मशीन घेऊन गेला कि आपल्याला भविष्य जाणून घेता येणार नाही. आणि तीन वर्षानंतर मिळणाऱ्या पंच्याहत्तर लाखात तो काही त्याची विकलेली सगळी जमीन घेऊ शकणार नाही. त्यामुळे या सुवर्णसंधीचा चांगलाच फायदा उठवायलाच हवा. त्यामुळे पैसे वाढण्याची खात्री असलेल्या या गोष्टीत शक्य तेवढे पैसे आता गुंतवायला हवेत. परंतु गुंतवणूकीसाठी अजून पैसे आणायचे कुठून? जमीन विकली तर जगणार कसे. तेवढ्यात त्याला

आठवले कि शेअर बाजारात गुंतवण्यासाठी त्याने थोडी जमीन सावकाराकडे गहाण ठेवली होती. मग आता सर्व जमीन तीन वर्षासाठी गहाण ठेऊन मिळतील तेवढे पैसे घेतले तर त्या पैशाचे तीन वर्षात कमीत कमी पंचवीस पट होणार आहेत. सावकाराला भरपूर व्याज देऊन सुध्दा मोठा फायदा होणार आहे. त्यामुळे हे करायला काही हरकत नाही असे त्याला वाटू लागले.

परंतु सावकार कमी वेळात मोठी रक्कम देऊ शकेल का? अशी त्याच्या मनात शंका आली. त्याने ताबडतोब अंगणामध्ये घरापासून लांब जाऊन सावकाराला फोन लावला. सावकाराने फोन उचलायला थोडा वेळ लावला. त्याने उचलताच हळू आवाजात धीरज म्हणाला, “सावकार, मी धीरज बोलतोय.”

“बोल. एवढ्या रात्री का फोन केला आहेस.”

“मला तातडीने खूप मोठी रक्कम हवी आहे. माझी सगळी १० एकर जमीन जर तुमच्या कडे गहाण ठेवली तर किती पैसे मिळतील?”

“पहिलेच तू माझ्याकडून पैसे घेतले आहेत ते परत कर. नंतर बोलू पुढच्या पैशाचे.” असे म्हणत सावकाराने फोन ठेवला.

धीरजने पुन्हा फोन लावला, “सावकार, माझे पूर्ण ऐकून घ्या. मी सगळया पैसे एकदम देईन परत. तुम्ही वाढीव व्याज लावा वाटल तर.”

“का रे बाबा? सगळी जमीन गहाण ठेवायचे म्हणतोस. व्याज जास्त द्यायला तयार आहेस. काय भानगड आहे?”

“काही नाही हो. माझा एक मित्र मोठा उद्योग सुरु करतो आहे. त्यात त्याला चांगला फायदा व्हायची खात्री आहे. त्याने मला सगळी योजना सांगितल्यावर मलाही ती पटली आहे. त्यामुळे त्यात पैसे गुंतवावे म्हणतो.”

“असे म्हणतोस...... बरं........ तुझी १० एकर जमीन आहे ना. आजचा भाव १५ लाख एकर चालू आहे. म्हणजे झाली दीड कोटीची जमीन. पैसे कधी परत देणार आहेस ?”

“जास्तीत जास्त ३ वर्षानंतर परत करेन. कारण नफा यायला तेवढा वेळ लागणार आहे.”

“चाळीस-पन्नास लाख देऊ शकेन. पण तू एवढा पैसा गुंतवणार आहेस का? बघ बाबा विचार कर.”

“मला पन्नास लाख द्या.”

“पण हे लक्षात ठेव जर तू मला तीन-साडेतीन वर्षात सगळे पैसे परत नाही केलेस तर सगळी जमीन माझी होईल.”

“काही हरकत नाही. मी तुम्हाला तीन वर्षांनंतर डबल पैसे देतो. चालेल ना?”

“बघ बाबा. खूप मोठा धोका घेतो आहेस तू. मला काय तुझी जमीन मिळेल. परंतु जमीन गेल्यावर तू रस्त्यावर येशील. बरं, कधी पाहिजेत पैसे?”

“उद्या सकाळी दिले तर बरे होईल.”

“उद्या सकाळी शक्य होणार नाही. तू सकाळी जागेचे कागद घेऊन ये माझ्याकडे. मग आपण गहाण ठेवायचे कागद करू. त्यानंतर दुपारपर्यंत मी तुझे पैसे तयार ठेवतो. पण एवढे पैसे रोख द्यायला जमणार नाही.”

“तुम्ही पैसे माझ्या खात्यात ट्रान्सफर केले तरी चालेल मला. कुठलाहि दोन नंबरचा धंदा करायचा नाही मला. सावकार, परंतु तुम्हाला उद्या पैसे द्यायला जमणार नसेल तर आताच सांगा म्हणजे मला दुसऱ्या कोणाकडे तरी बघायला. कारण मला उद्या कुठल्याही परिस्थितीत पैसे हवे आहेत.” असे धीरजने विचारले.

तेंव्हा सावकार म्हणाला, “काळजी करू नको ये उद्या.” असे म्हणत सावकाराने फोन ठेवला.

उद्या काय, काय काम करायचे याचा विचार करत धीरज झोपी गेला. कारण उद्याचा दिवस खूप धावपळीत जाणार होता. दुसऱ्या दिवशी लवकर उठून नाश्ता करून तो गावात गेला. त्याने भैरवीच्या नकळत जमिनीचे कागदपत्र बरोबर घेतले होते. सावकाराकडे जाऊन त्याने सगळे जमिनीचे कागद त्याला दाखवले. सावकाराने ते खरे असल्याची खात्री करून घेतली. नंतर त्याने धीरजकडून तो ती जमीन गहाण ठेवत असल्याचे अग्रीमेंट करून घेतले. एवढे पैसे रोख देणे शक्य नसल्याने धीरजकडून पैसे ट्रान्सफर करण्यासाठी बँकेच्या खात्याची माहिती घेतली. त्यानंतर त्याने त्याच्याकडच्या माणसाला धीरजचे बँकेचे खाते स्वतःच्या खात्याला लिंक

करायला सांगितले. ते लिंक करत असताना त्या माणसाच्या एकदम लक्षात आले कि पहिल्याच वेळेस एवढी मोठी रक्कम ट्रान्सफर करता येत नाही. हे त्याने लगेच सावकाराच्या लक्षात आणून दिले. आता काय करायचे याचा विचार ते दोघे करत होते. तेवढ्यात सावकाराच्या माणसाने सांगितले कि धीरजच्या बँकेत देखील सावकाराचे खाते आहे. फक्त सावकार ते नेहमी वापरत नव्हता. त्यामुळे सावकार लगेच धीरजला म्हणाला, “मी तुला त्या खात्याचा चेक देतो तो तू दुपारनंतर बँकेत भर. म्हणजे तोपर्यंत मी माझ्या त्या खात्यात तेवढे पैसे ट्रान्सफर करून ठेवतो.”

धीरजने सावकाराकडून पन्नास लाखाचा चेक घेतला. तो हरवेल या भीतीने त्याने तो चेक बँकेत भरायचे ठरवले. धीरजचे सारखे त्या बँकेत काहीना काही व्यवहार चालत असे त्यामुळे तेथील कर्मचारी चांगलेच ओळखीचे झाले होते. ओळखीतील कोणाला तरी विनंती केली तर चेकचे क्लिअरिंग दुपारपर्यंत थांबवणे शक्य होते. त्यामुळे धीरज लगेच बँकेत गेला. त्याने बँकेत चेक भरला आणि बँकेतील कर्मचाऱ्याला दुपारनंतर जेंव्हा दुसऱ्या खात्यात पैसे येतील तेंव्हा तो क्लिअरिंगसाठी पाठवाची विनंती केली. मोठ्या रक्कमेची तजवीज झाल्याने त्याला चांगलाच दिलासा मिळाला. आता सोन्याचे बिस्कीट मोडून पैसे घ्यायचे ठरवले. पन्नास लाखासमोर ती रक्कम छोटी असली तरी पंचवीस पट बनल्यानंतर मोठी बनणार होती. त्यामुळे बँकेतून बाहेर पडून धीरज सरळ सोनाराकडे सोन्याचे बिस्कीट मोडायला गेला. सोनाराने त्याची पावती नसल्याने पाच टक्के कमी मिळतील असे सांगितले. धीरजला ते पैसे गुंतवनुकीसाठी शक्य तेवढ्या लवकर हवे होते. त्यामुळे त्याने पाच टक्के कमीदेखील लगेच मान्य केले. सोनाराने सोन्याचे बिस्कीट विकत असल्याचे व त्याची पावती नसल्याचे धीरजकडून शंभर रुपयाच्या स्टॅम्पपेपरवर लिहून घेतले. नंतरच सोनाराने त्याला पैसे दिले. धीरजने बँकेत जाऊन ते पैसे देखील बँकेच्या खात्यात भरले.

हे सगळे करेपर्यंत दुपार झाली होती. त्यामुळे भैरवी घरी जेवणासाठी वाट बघत असेल म्हणून तो घरी आला. दुपारचे जेवण झाल्यानंतर त्याने घरातले पैसे घेतले व ते बँकेत भरायला गेला. त्याला जवळ असलेले कुठलेही पैसे सोडायचे नव्हते. कारण तीन वर्षानंतर प्रत्येक रुपया पंचवीस रुपये होणार होते. सावकाराचे चेक क्लीअर होऊन बँकेत पैसे यायला दुपारचे चार वाजले होते. शेअर बाजार साडेतीन वाजता बंद होतो. त्यामुळे आज त्याला शेअर विकत घेता येणार नव्हते. आता त्याला दुसऱ्या दिवसाची वाट पहावी लागणार होती.

आता त्याचा वेळ जाता जात नव्हता. कधी एकदा दुसरा दिवस उजाडतो असे त्याला झाले होते. सकाळी नऊ वाजता शेअर बाजार चालू होतो. त्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर आवरून तो नऊ वाजण्याच्या सुमारास गावातल्या नेटकॅफेत आला. येताना त्याने आठवणीने शेअर खरेदी करण्यासाठी डीमॅट खात्याचा लॉगइन, पासवर्ड आणि आरएसए टोकन घेतले होते. त्याने यादीत असलेल्या पंचवीस कंपन्याचे जवळजवळ ५३ लाख किंमतीचे शेअर खरेदी केले. नंतर काही गडबड नको म्हणून त्याने सर्व खरेदी केलेल्या शेअर्सची संख्या आणि किंमतीसहित यादी प्रिंट करून घेतली. आता ती यादी व डीमॅट खात्याचा लॉगइन, पासवर्ड, आरएसए टोकन त्याला पुन्हा तीन वर्षानंतर लागणार होते. तेंव्हा ते वेळेत सापडणे अत्यंत गरजेचे होते. त्यामुळे या सगळया गोष्टी सुरक्षित व लगेच सापडेल अशा ठिकाणी ठेवणे गरजेचे होते. त्यासाठी त्याने गावातून एक छोटी आणि मजबूत पेटी (लॉकर) विकत घेतली. खरेदी केलेल्या शेअर्सची यादी, डीमॅट खात्याचा लॉगइन, पासवर्ड, आरएसए टोकन त्याने त्या पेटीत ठेवून कुलूप लावले. त्या कुलपाची चावी हरवू नये म्हणून त्याने स्वतःच्या कंबरेला असलेल्या करदोट्याला बांधली. पेटी गाडीच्या डिकीत ठेऊन तो घरी आला. एक मोठे काम पार पडले होते. आता याच्या फळासाठी तीन वर्ष वाट पहायची होती. त्याला या सगळयाबद्दल भैरवीला काही सांगायचे नव्हते. कारण तीचा काय कोणाचाही टाइम मशीनवर विश्वास बसणार नव्हता. म्हणून भैरवी शेतात काही कामासाठी गेलेली पाहून त्याने ती पेटी घरामागील आंब्याच्या झाडाच्या खाली फुटभर खोल खड्डा करून त्यात पुरली. आता ती पेटी तीन वर्षानंतरच काढायची असे त्याने ठरवले.

हे शेअरची खरेदी लवकर झाल्यामुळे आज तो दुपारच्या जेवणाला वेळेवर घरी आला होता. दुपारचे जेवण लवकर करुन तो आराम करत पडला होता. भविष्यात एकदम पंधरा कोटी मिळाल्यानंतर आयुष्य कसे बदलेल याचा तो विचार करू लागला. आपण गेलेली जमीन विकत घेतली असेल. चांगला मोठा बंगला बांधला असेल. आपल्या कडे किमंती चारचाकी गाड्या असतील. सगळे चांगले झाल्यामुळे आपल्याला मुलं झालेली असतील. अशा प्रकारे भविष्यातल्या श्रीमंतीचे व सुखी जीवनाची स्वप्न स्वप्न रंगवत तो पडला होता. या सर्व सुखानंतर आनंदी झालेल्या भैरवीचा चेहरा त्याला सारखा डोळयासमोर दिसत होता. तो पाहून तो स्वतःशीच हसत होता. आता त्याला त्याचा भविष्यातील बंगला, गाडी, मुल पहायची इच्छा निर्माण झाली. प्रभातला बाहेर जाऊन आज तिसरा दिवस चालू होता, त्यामुळे आज किंवा उद्या प्रभात येऊन ती मशीन घेऊन जाईल. त्यानंतर आपल्याला भविष्यात जाता येणार नाही. त्यामुळे आताच भविष्यात जाऊन सगळे पहावे असे त्याला वाटले. या विचाराने तो पटकन उठला आणि गाडी घेऊन निघाला.

झाडीजवळ कोणाला दिसणार नाही अशा पद्धतीने गाडी लावून तो टाइम मशिनजवळ गेला. त्यावेळेस दुपारचे साडेतीन-चार वाजले होते. ताबडतोब मोठ्या बुंध्याच्या झाडाजवळ जाऊन त्याने हातवारे करून मशीन प्रकट केले आणि त्यात जाऊन बसला. आता तो हे सगळे एखादा सराईतासारखे करत होता. तीन वर्षानंतर भरपूर पैसे मिळाल्यानंतर आपल्याला मुलबाळ झालेले असेल तेंव्हा आपण दहा वर्षानंतरचे जीवन पाहू या. म्हणजे आपल्याला आपली मुलं देखील दिसतील व आपली श्रीमंतीही दिसेल. या विचाराने त्याने दहा वर्ष पुढील साल टाइम मशीनमध्ये टाकले. गो असे बटण दाबताच १० वर्ष पुढे भविष्यात तो आला.

बाहेर येऊन पाहतो तर त्या जाड बुंध्याच्या झाडाजवळच डोंगरावर जाण्यासाठी सिमेंटच्या पायऱ्या तयार केलेल्या दिसत होत्या. तो त्याच पायऱ्यानी खाली उतरून रस्त्यावर आला. तर तिथे त्याची गाडी नव्हती. रस्ता चांगलाच रुंद आणि मोठा तसेच सिमेंटचा झाला होता. दूरवर दिसणारी सर्व घरे आता पक्की झालेली दिसत होती. काही शेतात तर मोठे बंगले बांधलेले दिसत होते. दहा वर्षानंतर झालेली प्रगती त्याला दिसत होती. तो चालत चालत त्याच्या शेताकडे निघाला. आज त्याला परत वर्तमानात जायची घाई नव्हती त्यामुळे जाताना तो वाटेत लागणारा प्रत्येक बंगला निट पाहत चालला होता. कोणी ओळखीचा दिसते का हे तो पाहत चालला होता. तेवढ्यात त्याला एका बंगल्याच्या बाहेर एक ओळखीची आकृती दिसली. जवळ जाऊन पाहतो तर ती भैरवी होती. निट पाहिल्यावर त्याला जाणवले कि ती जुनाट कपड्यामध्ये दुसऱ्याच्या घरामध्ये धुणीभांडी करत होती. हे पाहून त्याला धक्काच बसला. हे असे कसे झाले? त्याला काय करावे ते कळेना. अशा विचित्र भविष्याला पाहून तो चक्रावून गेला. त्याला काही सुचेना. तो धावतच टाइम मशीनजवळ आला आणि पटकन वर्तमानात परत आला.

आता मात्र त्याचा आनंद पुरता मावळला होता. पुन्हा आपण बुडालो आणि सगळे गमावून बसलो कि काय या विचाराने तो खूप घाबरून गेला. तो शांतपणे घरात येऊन बसून राहिला. त्याला आता जेवणही गोड लागेना. थोडेफार खाऊन तो अंथरुणावर पडून राहिला. भैरवीच्या हे लक्षात आले कि धीरज खूप उदास आहे. तिने त्याला खोदून खोदून विचारण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याने तिला उडवाउडवीची उत्तरे दिली. का कोणास ठाऊक कशामुळे. धीरज ताडकन उठला आणि तासाभरात बाहेर जाऊन येतो असे सांगून तो गाडी घेऊन निघाला. त्यावेळेस रात्रीचे नऊ वाजले होते. त्यामुळे भैरवीने त्याला उद्या सकाळी जावा असे सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु तो काहीही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. एवढे सगळे करूनही आपण गरिबीतच जगणार आहोत व सगळे शेत घालवून बसणार या सत्याने तो खूप घाबरला होता.

त्याने गाडी काढली आणि तो टाइम मशिनच्या दिशेने निघाला. आता त्याला समजून घ्यायचे होते कि नक्की काय झाले? गाडी रस्त्याच्या कडेला लावून धीरज झाडीत निघाला. उद्या कदाचित मशीन असेल कि नसेल याची काही खात्री नव्हती. तिसरा दिवस संपला होता. प्रभात कोणत्याही क्षणी येऊन टाइम मशीन घेऊन जाऊ शकतो. त्यामुळे त्यापूर्वी काय झाले हे पाहणे गरजेचे होते. तीन वर्षांनतर आपण विकत घेतलेल्या शेअरचे भाव वाढणार हे नक्की होते. शेअर विक्रीसाठी लागणारे लोगिन, पासवर्ड, टोकनदेखील सुरक्षित ठेवले होते. त्यामुळे नक्की काय झाले हे समजून घ्यायला हवे या विचारात तो मशीनजवळ पोहचला. टाइम मशीन प्रकट करून, दार उघडून धीरज त्यात बसला. टाइम मशीनच्या बोर्डवर त्याने पाच वर्षानंतरचे वर्ष टाकले. त्या काळात जाण्यासाठी त्याने गो हे बटन दाबले. आतापर्यंत तो दोन वेळा भविष्यात जाऊन आला होता. परंतु त्याच्या हे लक्षात आले नव्हते कि तो येथुन दिवसाच्या ज्या वेळेस भविष्यात जाण्यासाठी निघत होता त्याच वेळेस तो भविष्यातील दिवसात पोहचत होता. आज त्याने रात्रीच्या साडेनऊ वाजता जाण्यासाठी बटन दाबले होते. त्यामुळे तो पाच वर्षानंतरच्या रात्रीच्या साडेनऊ वाजता तिथे पोहचला होता.

आजूबाजूला झाडीमध्ये किरर्र अंधार होता. आता त्याला नक्की काय झाले होते हे पहायची घाई झाली होती. त्यामुळे झपझप पावले टाकत तो त्याच्या घराकडे जायला निघाला. तो घराजवळ पोहचतो तर त्याला त्याचे घर मोडकळीस आलेले दिसते आणि त्या जुन्या घराशेजारी एक मोठा बंगला बांधलेला दिसला. त्याला खूप बरे वाटले. त्याला वाटले कि तीन वर्षानंतर शेअरमधून पैसे कमावल्यावर त्याने मोठा बंगला बांधला आहे. त्यामुळे तो त्या आनंदात त्या बंगल्याजवळ गेला. त्याने बंगल्यात डोकावून पाहिले तर हे काय? घरात दुसऱ्या कोणाचे तरी कुटुंब दिसत होते. म्हणजे नक्की झाले काय? याचा तो विचार करू लागला. मला सर्व नुकसान होऊन ही जागा सोडून जावे लागले कि खूप फायदा झाल्यामुळे दुसरीकडे राहायला गेलो? त्याला काही सुचेना. आपण ठेवलेल्या ठिकाणी पेटी आहे कि नाही ते तरि पाहू या. असा विचार त्याच्या मनात आला. म्हणजे कळेल कि नक्की काय झाले होते. परतू जमीन खोदण्यासाठी टिकाव किंवा फावडे लागणार होते. मोडकळीस आलेल्या घरात काही मिळते का हे पाहण्यासाठी तो त्या घरात शिरला. धीरज तिथे खोदण्यासाठी काही मिळते का हे शोधायला लागला. तो हे पूर्णपणे विसरला होता कि तो भविष्यात आला आहे. त्यामुळे शोधण्याच्या नादात अंधारात आवाज होत होता. त्याच्या हाताला दोन-तीन खांदायला उपयोगी होतील अशा वस्तू लागल्या.

धीरज हे घरात शोधात असताना काही आवाज होत होता. सध्या त्या भागात बरेच दरोडे पडत होते. त्यामुळे त्या आवाजाने शेजारील बंगल्याचा मालक सावध झाला. त्यांने

घरच्यांना घरातच लपून बसायला सांगितले आणि स्वतः बंदूक घेऊन घराबाहेर आला. बाहेर येऊन त्याने इकडे तिकडे पाहायला सुरुवात केली. तेवढ्यात त्याला शेजारच्या जुन्या घरातून एक जण हातात हत्यारासारखे काहीतरी घेऊन बाहेर येताना व मागे जाताना दिसला. अंधारात त्या मालकाला तो कोण आहे व नक्की त्याच्या हातात काय आहे दिसत नव्हते. त्याला वाटले कि तो दरोडेखोर आहे. दरोडेखोराने आपल्यावर हल्ला करण्यापूर्वी आपण हल्ला करून जखमी केलेले केंव्हाही चांगले असे त्याला वाटले. त्या विचारातच त्याने त्याच्यावर गोळी झाडली. ती गोळी धीरजला पाठीत लागली आणि तो खाली कोसळला. तो माणूस बंदूक रोखुन धीरजकडे हळू हळू चालत आला. जवळ येऊन पाहिले तेंव्हा त्याला कळले कि हा या जागेचा जुना मालक आहे. त्याने धीरजला हलवून पाहण्याचा प्रयत्न केला. परंतु धीरजची काहीच हालचाल होईना. त्याला वाटले आपण खात्री न करता त्याला गोळी घातली त्यामुळे आपल्यावर आता खुनाचा आरोप येऊ शकतो. या विचाराने तो बंगल्याचा मालक खूपच घाबरला. काय करावे याचा तो विचार करू लागला. त्याने आजूबाजूला पाहिले तेंव्हा त्याच्या लक्षात आले कि त्याला गोळी घालताना कोणी पाहिले असण्याची शक्यता खूप कमी आहे. त्यामुळे प्रेताला शेतात जमिनीमध्ये पुरले तर तो इथे आल्याचे कोणालाही कळणार नाही. हा विचार करत तो खड्डा करण्यासाठी टिकाव-फावड आणायला घरात गेला.

##############################################

इकडे मध्यरात्र झाली तरी धीरज काही घरी आला नाही. त्यामुळे भैरवीला काळजी वाटू लागली. ती सारखी त्याचा मोबाईल लावण्याचा प्रयत्न करत राहिली. परंतु त्याचा मोबाईल संपर्क कक्षेच्या बाहेर असल्याची anouncement येत होती. तिला आता जास्तच काळजी वाटू लागली. ति रात्रभर जागीच राहिली आणि त्याची वाट पाहत बसली. सकाळ झाली तरी तो आला नाही. आता मात्र तिने त्याच्या मित्रांना फोन लावून विचारायला सुरुवात केली. परंतु सगळ्यांनी त्यांच्याकडे धीरज न आल्याचे सांगितले. काहींनी तिला समजावयाचा प्रयत्न केला कि तो एखाद्या शहरातील मित्राकडे गेला असेल, येईल दुपारपर्यंत. धीरजच्या बऱ्याच मित्रांच्या म्हणण्यामुळे तिलाही तसेच वाटू लागले. त्यामुळे ती थोडा वेळ आराम घेण्यासाठी ती बिछान्यावर पडली. तर तिला चांगलाच डोळा लागला. तिला जाग आली तेंव्हा दुपारचे दोन वाजले होते. अजूनही धीरज घरी आला नव्हता. आता मात्र तिला काही तरी वेडंवाकडं झाल्याची

भीती वाटू लागली. तिने पुन्हा त्याच्या गावातील मित्रांना फोन करून अजून तो न आल्याचे सांगितले. त्यावर तिची मदत करायला म्हणून त्यातले काहीजण लागलीच तिच्या घरी यायला निघाले. येताना त्यांना टेकडी जवळील रस्त्यावर धीरजची गाडी उभी असलेली दिसली. त्यांच्यातील एकजण ताबडतोब ते सांगायला व भैरवीला आणायला घरी गेला. इतर मित्र तिथेच धीरजचा शोध घेऊ लागले. भैरवी आल्यानंतर त्यांनी झाडीमध्ये जाऊन सगळे जंगल पिंजून काढले. काही जणांनी टेकडीवर जाऊन धीरजला शोधले. परंतु धीरज काही केल्या त्यांना सापडेना.

या सर्व धावपळीत दुपारचे चार वाजले होते. त्यामुळे त्यांनी पोलिसात तक्रार करायचे ठरवले. मधल्या काळात काही मित्रांनी गावात जाऊनही त्याला शोधण्याचा प्रयत्न केला होता. तिथेही तो न सापडल्याने शेवटी भैरवीने पोलिसात तक्रार केली. तो पर्यंत संध्याकाळ झाली. आता घरी जाऊन त्याची वाट पाहण्याशिवाय भैरवीकडे दुसरा काहीहि पर्याय नव्हता. पोलीस त्यांच्या परीने धीरजला शोधण्याचा प्रयत्न करत होते. परंतु काही केल्या धीरजचा ठावठिकाणा लागत नव्हता. दिवसामागून दिवस जात होते. आठ दिवस झाले तरी धीरज घरी आला नाही. त्याचे काय झाले हे देखील कळायला तयार नव्हते. धिरजला आदल्याच दिवशी जमीन गहाण ठेऊन पन्नास लाख रुपये दिल्याने नसत्या लफड्यात आणि चौकशित अडकायला नको म्हणून सावकारही कुणाकडे काही बोलला नाही. आता हळूहळू गावात धीरज विषयी अफवा पसरू लागल्या. कोणी म्हणत होते कि तो कोणाबरोबर तरी पळून गेला असेल. कोणी म्हणत होते त्याने आत्महत्या केली असेल.

परतू भैरवीचा या कशावरही विश्वास बसत नव्हता. तिला माहिती होते तिचा नवरा धीरज कसा जरी असला तरी त्याचे तिच्यावर जीवापाड प्रेम होते. त्यामुळे तो असे काही करणार नाही याची तिला खात्री होती. धीरज आज येईल, उद्या येईल या आशेने ती दररोज त्याची वाट पाहत होती. जगण्यासाठी काहीतरी हालचाल करणे गरजेचे होते. तिने आता शेतीत लक्ष घालायला सुरुवात केली. नोकरांच्या मदतीने ती शेती करू लागली. महिन्यामागून महिने जात एक वर्ष झाले. तरी धीरज काही आला नाही. ती तशी अजून तरुण होती. दिसायला चांगली होती. तिला मुलबाळ नसल्याने ती तरी एकटे आयुष्य किती दिवस काढणार. या काळजीने तिचा मामा तिला दुसरे लग्न करण्याबद्दल विचारायला लागला. परंतु तिने साफ नकार दिला आणि तिने धीरजची वाट पाहायचे ठरवले. दुसरे वर्ष देखील संपले. तिसरे वर्ष सुद्धा संपत आले होते. आता तिचे मनही तिला म्हणू लागले कि धीरज काही आता परत येईल असे वाटत नाही. त्यामुळे मामा म्हणतो त्याप्रमाणे दुसऱ्या लग्नाचा विचार करावा असे तिला वाटू लागले. तेवढ्यात एके दिवशी

तिला कळले कि काही जणांनी धीरजला गावात फिरताना पाहिले. बरेच जण असेहि म्हणाले कि तो फार घाईत होता. त्यांनी त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला तर तो उद्या भेटून बोलू असे म्हणून पुढे गेला. काही जणांकडून असे ही कळाले कि तो नेटकॅफेत देखील जाऊन बसला होता.

आता मात्र या सगळ्या उडत्या बातम्यांची खात्री करण्यासाठी भैरवी गावातील त्या नेटकॅफेत गेली जिथे तो येऊन गेल्याचे काहीजण सांगत होते. तेथील माणसाने देखील तिला धीरज खरोखरच तिथे येऊन गेल्याचे सांगितले. त्याने सांगितले कि तो जवळ जवळ अर्धा तास इंटरनेट वर बसला होता. त्याने हे देखील सांगितले कि जाताना त्याने एक प्रिंट देखील काढून नेली होती. तो म्हणाला कि त्याने धीरजशी बोलण्याचा प्रयत्न केला तेंव्हा तो उद्या बोलू असे सांगून निघून गेला. तिने त्याला विचारले कि तो कशासाठी येथे आला होता? नेटवर बसून काय करत होता? हे कळू शकेल का? नेटकॅफेवाल्यानी धीरज बसला होता त्या कॉम्पुटरची हिस्टरी तपासली. आणि सांगितले कि धीरजने काही शेअर बाजारासंबंधी वेबसाईट पाहिल्या होत्या. आता भैरवीला असे वाटू लागले कि तीन वर्षापूर्वी तो तिला न सांगता काही जणांकडून उसने पैसे घेऊन शेअर बाजारात गुंतवत असेल. त्यात मोठे नुकसान झाल्यामुळे आता तो तोंड लपवून फिरत असेल. पुन्हा त्यातून बाहेर येण्यासाठी तो शेअर बाजाराचा आधार घेत असेल. या घटनेमुळे भैरवीला तो जिवंत असल्याची खात्री पटली. त्यामुळे आज ना उद्या तो परत येईल अशी तिला आशा निर्माण झाली. त्यामुळे आता तिने दुसऱ्या लग्नाचा विचार पूर्णपणे डोक्यातून काढून टाकला. आणि त्याची आयुष्यभर वाट पाहायचे ठरवले.

काही दिवस गेले नाही तर एक दिवशी सकाळी ती दारात भांडी घासत होती. तेवढ्यात गावातील सावकार भैरवीच्या दारात उभा राहिला. आणि विचारले, “धीरज दळवीचे घर हेच का?”

लगबगीने उठून उभी राहत ती म्हणाली, “हो. त्यांची काही बातमी आहे का?”

त्याने विचारले, “तू कोण त्याची?”

“त्यांची बायको आहे.”

“तुझ्या नवऱ्याने माझ्याकडून पन्नास लाख रुपये घेतले आहेत. ते आणि त्याचे व्याज मिळून एक कोटी रुपये झालेत. ते घ्यायला आलो आहे.”

भैरवीला हे काय चालले आहे काही कळेना. तिने विचारले, “कसले पन्नास लाख रुपये? कधी घेतले?”

तिच्या चेहऱ्यावरील भाव पाहून सावकाराच्या लक्षात आले कि धीरजच्या बायकोला काही माहिती नाही. तेव्हा सावकाराने तिला सांगितले, “तीन वर्षापूर्वी तुमची सर्व शेती गहाण ठेवून धीरजने माझ्याकडून कुठल्यातरी मित्राकडे गुंतवणूक करण्यासाठी पन्नास लाख रुपये घेतले होते.”

आता तिला असे वाटू लागले कि ते पन्नास लाख रुपये घेऊन त्याने कुठेतरी गुंतवले असतील. त्या गुंतवणुकीत ते सर्व पैसे बुडाल्यामुळे तो गायब झाला असेल. तरीही खात्री करण्यासाठी तिने सावकाराला विचारले, “काही पुरावा आहे का तुमच्याकडे?”

सावकाराने धीरजने सही केलेले कागदपत्र तिला दाखवले. ते पहिल्याने तिला आता धीरजने सावकाराकडून पन्नास लाख रुपये घेतले असल्याची खात्री पटली. त्या कागदात तीन वर्षात पैसे परत देतो असेही म्हंटले होते. त्यामुळे आता तिला सावकाराला पैसे देण्याशिवाय गत्यंतर नव्हते. परंतु ती एवढे पैसे आणणार कुठून? कोणाकडून उसने घेऊन फेडण्याएवढी ती रक्कम नव्हती. त्यामुळे तिने सावकारालाच सांगितले, “ सावकार. आता माझ्या नवऱ्याने जागा गहाण ठेवूनच एवढे पैसे घेतले आहेत. तर आता तुम्ही ही जागा विकून घ्या तुमचे पैसे आणि वरचे पैसे द्या मला.”

सावकार पक्का व्यवहारी होता. त्याने तिच्या हतबलतेचा फायदा करून घ्यायचा ठरवले. तो म्हणाला, “ एवढ्या मोठ्या जागेला लवकर गिऱ्हाईक मिळणे अवघड आहे. तू मला माझे पैसे दे आणि तू बघ तुझी जमीन कशी विकायची ते.”

भैरवीने पुन्हा विनंती केल्यावर तो म्हणाला, “माझे कर्ज फेडून मी तुला जेमतेम पंचवीस लाख रुपयेच देऊ शकेन. उद्या म्हणू नको कि मी तुला लुटले. मंजूर असेल तर उद्या ये माझ्याकडे. आपण जागेचा कागद करू. आणि पटत नसेल तर माझे एक कोटी रुपये उद्या सकाळपर्यंत आणून दे” असे म्हणून सावकार निघून गेला.

जवळ असलेल्या शेतीवर किमान ती जगत तरी होती. आता तीही हातून जाणार होती. त्यामुळे तिला आत्महत्या करावी असे वाटू लागले. परंतु काही दिवसापूर्वीच त्याला गावातल्या लोकांनी जिवंत पाहिले होते. त्यामुळे धीरज कधी तरी परत येईल याची आशा निर्माण झाली होती. त्यामुळे तिने जमेल त्या अवस्थेत जगायचे ठरवले. परंतु एका दिवसात जागेला

गि़ऱ्हाईक मिळणे शक्य नव्हते. धीरज गेल्यापासून धीरजच्या मित्रांचे देखील येणे जाणे बंद झाले होते. त्यामुळे तिला एकटीलाच निर्णय घेणे भाग पडले होते. तिने जागा सावकाराला विकायची ठरवले. दुसऱ्या दिवशी ती सावकाराकडे गेली आणि शेती विकल्याचे कागदपत्र करून आली. त्याने तिला पंचवीस लाख रुपये दिले. त्या पैशात तिने गावामध्ये एक छोटे घर विकत घेतले आणि उरलेले पैसे भविष्याची तजवीज म्हणून बँकेत ठेवले. आता भैरवी दुसऱ्यांच्या घरी धुणीभांडीची कामे करून पोट भरू लागली.

काही दिवसाने सावकाराने ती जमीन चांगला नफा मिळवून दुसऱ्या एकाला विकून टाकली. जागेच्या नवीन मालकाने धीरजच्या घराशेजारी एक मोठा बंगला बांधला. भैरवीला सारखे वाटत होते कि धीरज परत येईल. आल्यानंतर तो आपल्या शेतातल्या घरी जाईल. त्यामुळे तिने त्या जागेच्या नवीन मालकाला विनंती केली कि त्यांचे जुने घर काही दिवस तरी तसेच ठेवा. शिवाय तिने धीरजचा एक फोटो त्याच्याकडे दिला आणि सांगितले. जर कधी धीरज तिथे परत आला तर त्याला तिचा गावातला नवा पत्ता द्या. आता ती केवळ धीरजची वाट बघत दिवस काढत होती.

##################################################

इकडे जेंव्हा धीरज तिसऱ्यांदा भविष्यात गेलेला असतो त्याच्या १० मि. नंतर प्रभात तिथे येतो. तो मशीन दृश्य करून टाइम मशीनमध्ये प्रवेश करतो. तर त्याला तिथे काही मातीने उमटलेले चपलाचे ठसे दिसतात. त्याला शंका येते कि त्याच्या गैरहजेरीत टाइम मशीनमध्ये कोणीतरी नक्की आले होते. मातीचे चपलाचे ठसे त्याच्या काळात तर शक्य नाही. म्हणजे आताच्या काळातीलच कोणी तरी आत आलेले असेल. त्याला वाटले कोणी तरी त्याला व धीरजला चोरून पहिले असेल आणि आत आला असेल. कदाचित स्वतः धीरजहि असू शकेल. नक्की कोण होते हे पाहण्यासाठी त्याने टेबलखालील एका कप्प्यातून लॅपटॉप बाहेर काढला आणि टाइम मशीनला जोडला. टाइम मशीन प्रत्येक वेळेस, वेगळया काळात जाताना, जाणाऱ्याचा फोटो काढून सेव्ह करून ठेवत असत. त्याने मागील तीन दिवस टाइम मशीन वापरणाऱ्याचे फोटो पहिले तर त्याला धीरजचे फोटो दिसले. त्याच्या लक्षात आले कि धीरजने आपण मशीन प्रकट व गायब करण्यासाठी वापरलेले हाताचा पॅटर्न नीट लक्षात ठेवून तो वापरला होता. त्याच्या हे ही लक्षात आले कि त्याने

खूप सोप्पा असा पासवर्ड ठेवला होता. त्यामुळे त्याने लगेच टाइम मशीनचा पासवर्ड बदलायचा ठरवले. त्यांनी नवीन पासवर्ड हा थोडा अवघड पॅटर्न ठेवला.

धीरज नक्की कुठल्या काळात गेला होता हे पाहण्यासाठी त्याने टाइम मशीनचा मागील चार दिवसाचा सर्व लॉग पाहिला. त्यावरून त्याला कळाले कि धीरज तीन वेळा भविष्यात गेला होता. नीट पाहिल्यानंतर एकदम त्याच्या लक्षात आले कि धीरज दोन वेळा जाऊन परत आला होता परंतु तिसऱ्यांदा गेलेला अजून परतला नाही. तेवढ्यात प्रभातच्या हे लक्षात आले कि त्याने आताच पासवर्ड बदलला आहे. बदललेला नवीन पासवर्ड धीरजला माहिती असणार नाही. त्यामुळे तो परत येण्यासाठी जुनाच पासवर्ड वापरून प्रयत्न करत बसेल. तो न चालल्यामुळे वर्तमानात परत येऊ शकणार नाही. मशिनच्या काही मर्यादेमुळे प्रभातला पुन्हा जुना पासवर्ड ठेवता येणार नव्हता. धीरजने त्याला मदत केल्यामुळे त्याला धीरजच्या काळातील चांगली माहिती मिळाली होती. त्यामुळे आपण त्याला मदत करायला हवी असे त्याला वाटले. त्याने धीरज शेवटी गेला होता ती वेळ पाहिली आणि ती वेळ टाइम मशीनमध्ये टाकली आणि धीरज गेला होता त्या काळात गेला. मशिनच्या प्रोसेसिंगला लागणाऱ्या वेळेमुळे प्रभात धीरज गेला त्याच्या १० मी. नंतर तिथे पोहचला.

प्रभात धावत धीरजला शोधण्यासाठी बाहेर रोडपर्यंत आला. त्याने आजूबाजूला पाहिले तेंव्हा त्याला दूरवर एकजण अंधारातून भर भर जाताना दिसला. प्रभातला तो धीरजच असावा असे वाटले. म्हणून प्रभातने त्याचा तो पाठलाग करायचे ठरवले. ती अंधारातील आकृती एका मोठ्या बंगल्याजवळ गेली आणि आत डोकावली. नंतर परत फिरून शेजारील मोडकळीस आलेल्या घरात जाऊन काही तरी घेऊन बाहेर आली. तोपर्यंत बंगल्यातून एकजण बाहेर आला व त्याने त्या माणसाच्या आकृतीवर गोळी झाडली. तो माणूस गोळी लागून खाली कोसळला. त्यानंतर गोळी झाडणारा बंगल्यात परत गेला. तोपर्यंत प्रभात त्या पडलेल्या माणसाजवळ पोहचला होता. त्याने पडलेल्या माणसाचा चेहरा पाहिला, तर तो धीरजच होता. धीरज गोळी लागून जखमी होऊन पडला होता. आपल्या टाइम मशीनमुळे धीरज भविष्यात आला आणि या संकटात सापडला. त्यामुळे त्याला वाचवणे आपले काम आहे असे समजून त्याने ताबडतोब धीरजला उचलले आणि टाइम मशीनजवळ आला. त्याने धीरजला शुद्धीवर आणण्याचा खूप प्रयत्न केला परंतु तो काही शुद्धीवर येइना. त्यामुळे प्रभातने त्याला स्वतःच्या काळात घेऊन जाऊन उपचार करायचे ठरवले. त्यासाठी त्याने धीरजला टाइम मशीनच्या मदतीने त्याच्या काळात नेले.

############################################

इकडे जेंव्हा बंगल्याचा मालक टिकाव-फावडे घेऊन बाहेर आला. जिथे धीरज पडला असतो तिथे तो जातो. पाहतो तर धीरजचे प्रेत तिथे नसते. त्याला वाटते कदाचित तो जखमी झाला असेल आणि शुद्ध आल्यानंतर उठून निघून गेला असेल. या सर्व प्रसंगाची जास्त कुठे वाच्यता होऊन एखादे संकट अंगावर येऊ नये म्हणून तो हा प्रसंग कोणालाच सांगत नाही. अगदी स्वतःच्या कुटुंबीयांना देखील या घटनेपासून अंधारात ठेवतो. त्यांना सांगतो कि दरोडेखोरांना पळविण्यासाठी त्याने हवेत गोळी झाडली होती.

###########################################

बेशुद्ध अवस्थेतील धीरज टाइम मशीनच्या वेगामुळे कोमामध्ये जातो. प्रभात त्याला बरे करण्यासाठी उपचार करायचे ठरवतो. त्यासाठी तो त्याला स्वतःच्या घरात ठेऊन उपचार द्यायला लागतो. दवाखान्यात अॅडमिट करणे शक्य नसते कारण तो त्याच्या काळातील नसल्याने त्याची कुठेही सरकारी नोंद नसते. शिवाय त्यामुळे त्याचे टाइम मशीनची माहिती बाहेर पडण्याची भीती होती. प्रभात धीरजला आपला मित्र आहे असे सांगून ओळखीच्या डॉक्टरामार्फत त्याचे घरीच उपचार चालू ठेवतो. धीरजची जखम लवकरच भरून येते. परंतु तो कोमामधून बाहेर यायला पाच वर्ष लागतात.

कोमातून बाहेर आल्यावर धीरज स्वतःला वेगळ्याच ठिकाणी पाहतो. आपण कुठे आहोत हे शोधण्यासाठी तो उठून बाहेरच्या खोलीत येतो. तिथे प्रभात बसलेला असतो. धीरजला बरे झालेले पाहून प्रभातला आनंद होतो. धीरज लगेच विचारतो, “आपण कोण आहात? आणि मी कुठे आहे?” धीरजच्या या प्रश्नाने प्रभातच्या लक्षात येते कि धीरज त्याला ओळखत नाही. त्यामुळे प्रभात त्याला त्यांच्या भेटीचे आणि टाइम मशीनबाबत सगळे सांगतो. त्यानंतर धीरज प्रभातला ओळखु लागतो. धीरज विचारतो, “मी इथे कसा काय आलो?” त्यावर प्रभात त्याला त्याचे भविष्यातले जाणे, त्याला गोळी लागणे, आणि प्रभातने त्याला उचलून आणणे इ. सगळे सविस्तर सांगतो. धीरजला सर्व प्रसंग आठवायला लागतात. तेवढ्यात त्याच्या डोळ्यासमोर

भैरवीचा चेहरा येतो. ती आता काय करत असेल? मला तिने किती आणि कुठे कुठे शोधले असेल? या विचाराने त्याला वाईट वाटते. आता त्याला तिची काळजी वाटू लागते. त्या विचाराने कासावीस होत तो प्रभातला विचारतो, “ मी किती दिवस कोमामध्ये होतो?”

“जवळजवळ पाच वर्ष”

“किती तारखेला तू मला इथे आणलेस?”

प्रभात लगेच उठतो टाइम मशीन जवळ जातो. टाइम मशीन प्रभातच्या घरातील एका खोलीमध्येच ठेवलेली असते. प्रभात टाइम मशीनला बाहेरूनच लॅपटॉप जोडतो आणि टाइम मशीनच्या लॉग पाहून त्याने धीरजला तिथे आणले ती तारीख सांगतो. प्रभातने त्याला वाचवले आणि त्याच्यावर उपचार केले यासाठी धीरज त्याचे आभार मानतो. प्रभातला तो विनंती करतो, “मला आता माझ्या बायकोची काळजी वाटते आहे. मला तिला भेटायचे आहे. त्यामुळे मला लवकर टाइम मशीन चालू करून दे.”

प्रभात धीरजला म्हणतो, “ तू आताच कोमातून बाहेर आला आहेस. थोडा आराम कर काही तरी खा आणि नंतर जा.”

परंतु धीरजला आता सर्व स्पष्ट आठवायला लागले होते. आपण एवढे वर्ष इथे होतो. म्हणजे आता सावकाराने जमीन ताब्यात घेतली असेल. भैरवी आता कुठल्या अवस्थेत असेल? असेल कि नाही? या सगळ्या विचाराने त्याला गहिवरून येते. तो प्रभातला हात जोडून विनंती करतो, “तू मला वाचवले. त्यामुळे मी तुझा खूप खूप आभारी आहे. परंतु तिकडे माझी बायको माझी वाट पाहत असेल. त्यामुळे मला जाऊ दे.”

त्याची ही अवस्था बघून प्रभात त्याला अजून थांबवायची इच्छा होत नाही. तो लागलीच टाइम मशीन उघडून देतो. धीरज खूप गडबडीने त्यात घुसतो आणि दार बंद करून घेतो. आणि प्रभातने त्याला आणलेल्या तारखेत पाच वर्ष मिळवून ती तारिख टाइम मशीनमध्ये टाकतो आणि वर्तमानात परततो. परंतु तो पहिलेच पाच वर्ष पुढे गेलेला असतो. त्यात तो अजून पाच वर्ष टाकतो. त्यामुळे तो एकूण दहा वर्ष पुढे येतो. धीरज टाइम मशीनच्या बाहेर येतो तेंव्हा टाइम मशीन आपोआप गायब होते. मधल्या काळात प्रभातने टाइम मशीनला नवीन प्रकारे प्रोग्राम केलेले असते. त्यामुळे टाइम मशीनला गायब करण्यासाठी पासवर्डची गरज लागत नव्हती.

धीरज बाहेर येऊन पाहतो तर त्या जाड बुंध्याच्या झाडाजवळ डोंगरावर जाण्यासाठी सिमेंटच्या पायऱ्या तयार केलेल्या होत्या. तो त्याच पायऱ्यानी उतरून टेकडीच्या खाली रस्त्यावर आला. रस्ता चांगलाच रुंद, मोठा आणि सिमेंटचा झालेला असतो. दूरवर दिसणारी सर्व घरे पक्की झालेली दिसत होती. काही शेतात तर मोठे मोठे बंगले बांधलेले दिसत होते. दहा वर्षानंतरची झालेली प्रगती त्याला दिसत होती. परंतु त्याला घाई असते भैरवीला पाहण्याची. तो चालत चालत त्याच्या शेताकडे निघाला. तेवढ्यात त्याला एका बंगल्याच्या बाहेर एक ओळखीची आकृती दिसली. जवळ जाऊन पाहतो तर ती भैरवी होती. ती जुनाट कपड्यामध्ये दुसऱ्याच्या घरामध्ये धुणीभांडी करत होती. हे पाहून त्याला धक्काच बसला. आपण नव्हतो त्यामुळे भैरवीची किती वाईट अवस्था झाली याची त्याला कल्पना येते. आणि त्या विचाराने त्याला खूप वाईट वाटते.

धीरज तिला आवाज देतो. नवऱ्यानी मारलेली हाक कानी पडल्यावर तिला सुरुवातीला भास होत असल्यासारखे वाटते. त्यामुळे ती दुर्लक्ष करते. पुन्हा दुसऱ्या हाकेला ती आवाजाच्या दिशेने पाहते. धीरजला पाहून तिचा आनंद गगनात मावेनासा होतो. ती हातातले काम सोडून धावत येऊन त्याला मिठी मारते. तिचा गळा भरून येतो आणि ती आनंदाने रडायला लागते. तो तीला काय झाले हे समजवायला लागतो तर ती त्याच्या तोंडावर हात ठेवते आणि म्हणते, “तुम्ही आलात हेच माझ्यासाठी खूप आहे. मला आता तुमचे कुठे गेलो होतो, कशासाठी गेला होतो हे काहीही ऐकायचे नाही. आता जे काही उरले आहे त्यात आपण कष्ट करून सुखाने आयुष्य काढू.” त्यानंतर ती काम करत असलेल्या घरात जाऊन सांगते कि तिचा नवरा परत आला आहे. त्यामुळे तिला आज घरी लवकर जायचे आहे. ती परवानगी घेऊन लगेच धीरजकडे येते. धीरजला घेऊन ती गावातल्या छोट्या घरात येते. ती त्याच्यासाठी स्वयंपाक करते. आज ते खूप दिवसानंतर ते दोघे एकत्र बसून जेवणार होते. जेवण झाल्यांनतर ती त्याला दहा वर्षात झालेल्या सर्व गोष्टी सांगते. त्या ऐकूण त्याला रडू कोसळते. या सगळ्याला आपला अधीरपणा कारणीभूत होता हे त्याच्या लक्षात येते.

त्याला हे लक्षात येते कि झाडाखालच्या पेटी बद्दल आणि त्याने विकत घेतेलेल्या शेअर्स बद्दल तिला काहीही माहिती नाही. त्यामुळे तो तिला म्हणतो, “ जर दैवाने साथ दिली तर उद्या आपली गरिबी संपेल.”

“तुम्ही बरोबर असाल तर ही गरिबी देखील मला श्रीमंतीसारखीच आहे.”

“काळजी करू नको. जरी गरिबी तशीच राहिली तरी कष्ट करून सगळे मिळविण्याचा मी प्रयत्न करेन.”

तिला त्याच्या उद्या गरिबी दूर होईल या बोलण्याचा काही अर्थ कळत नाही. नवरा परत आला या आनंदातच ती त्याला बिलगून झोपी जाते.

सकाळी उठून सर्व आवरून झाल्यावर तो तिला म्हणतो, “ मला आपल्या विकलेल्या जागेवर जायचे आहे. तू पण चल माझ्याबरोबर.”

ते दोघेजण त्यांच्या जुन्या घराजवळ येतात. परंतु तिथे त्यांचे जुने घर नसते. पाच वर्षापूर्वीच्या घटनेनंतर त्या माणसाने ते घर पाडून टाकलेले असते. फक्त नवीन मालकाने बांधलेला बंगला तिथे असतो. त्या बंगल्याजवळ एक आंब्याचे जुने झाड दिसत असते. तेच ते आंब्याचे झाड, ज्याच्या खाली धीरजने पेटी पुरलेली असते. धीरज त्या बंगल्याजवळ जातो आणि दारावरील बेल वाजवतो. बंगल्याचा मालक दार उघडतो. तर समोर धीरजला पाहतो आणि चपापतो. पाच वर्षापूर्वी त्याने ज्याला गोळी मारली तो हाच माणूस हे त्याच्या लगेच लक्षात येते. परतू त्याला ओळखत नसल्याचा आव आणत तो विचारतो, “ काय पाहिजे? काय काम आहे?”

“पूर्वी ही जागा आमची होती.” धीरज त्याला येण्याची पार्श्वभूमी सांगायला सुरुवात करतो.

परंतु धीरजला मध्येच तोडत तो म्हणतो, “हो माहिती आहे.”

“माझ्या वडिलांची एक आठवण मी झाडाखाली पुरली आहे. जास्त खोल नाही खणायला लागणार. जर आपण परवानगी दिली तर ती मला काढायची आहे.”

पाच वर्षापूर्वीच्या प्रकरणाची कुठे वाच्यता होण्यापेक्षा हे बरे म्हणून त्या मालकाने धीरजला खोदायला परवानगी दिली. धीरज त्यांना टिकाव-फावडे मागतो. बंगल्याचा मालक त्याला टिकाव-फावडे आणून देतो. ते घेऊन धीरज झाडाखाली खोदायला सुरुवात करतो. दीड-दोन फुट खोदल्यावर एक छोटी पेटी लागते. धीरज ती पेटी काढून भैरवीच्या हातात देतो. आणि तो पुन्हा तयार झालेला खड्डा बुजवतो. हे सर्व तो मालकही पाहत असतो. एवढ्याशा छोट्या पेटीत असणार तरी काय म्हणून बंगल्याचा मालक त्याकडे दुर्लक्ष करतो. धीरज त्यांना टिकाव-फावडे परत करून त्यांचे आभार मानतो आणि गावातल्या घराकडे जायला जातो.

हे सर्व भैरवी शांतपणे पाहत असते. तीला हे काय चालले आहे ते कळायला तयार नव्हते. ती हळूच विचारते, “ हे काय आहे?”

“हि मी दहा वर्षापूर्वी पुरलेली वस्तू आहे. कळेल तुला हळू हळू काय आहे ते.”

तो ती पेटी उघडतो तर सर्व कागद व टोकन त्यात व्यवस्थित असते. फक्त दहा वर्षानंतर त्या टोकनची बॅटरी गेल्याने ते बंद पडलेले असते. तो तिला घरी सोडून बाहेर जायला निघतो. परंतु ती आता त्याला एकटे सोडायला तयार नसते. तो तिला घेऊन शहरातील डीमॅट खाते काढलेल्या कंपनीचं कार्यालयात जातो. सर्व गरजेचे सोपस्कार पूर्ण करून नवीन पासवर्ड व टोकन घेतो. तिथेच इंटरनेट वर बसुन त्याच्या शेअरची किंमत पाहतो. तर दहा वर्षापूर्वी घेतलेल्या त्याचा शेअर्सची किंमत आता पन्नास कोटीच्या पुढे गेलेली असते.

# कथा २

# दीर्घायू......

आज दिनांक ३ ऑगस्ट २१९७. आज पुण्यामध्ये एक वेगळीच लगबग दिसत होती. पुण्यामध्ये आज एक खूप मोठा समारंभ होणार होता. त्यामुळे सगळे पुणे सजले होते. पुण्यामधील स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर आज एक मोठा सत्कार समारंभ होणार होता. तसे पाहिले तर आजकाल जाहीर कार्यक्रम होणे बंदच झाले आहे. सगळे जण आपआपल्या घरातून इंटरनेट वापरून संगणक, मोबाईल, टेलिव्हिजन वापरूनच सभा कार्यक्रमाला हजेरी लावत होते. काहीजण तर ३ डी होलोग्रॅमिक प्रोजेक्टर वापरून सभेला हजेरी लावायला लागले आहेत. ३ डी होलोग्रॅमिक प्रोजेक्टर हे तंत्रज्ञान तसे जुनेच आहे. साधारणपणे पावणेदोनशे वर्षापूर्वी भारताचे तेंव्हाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहिल्यांदा त्यांच्या निवडणुकीत ३ डी होलोग्रॅमिक तंत्रज्ञान वापरून सभा घेऊन भारतीयांना त्याची ओळख करून दिली होती. परंतु तेंव्हा ते तंत्रज्ञान हे एकतर्फी (one way direction) चालत होते. आता मात्र ते दोन्ही मार्गाने (both way) वापरता येते. शिवाय एवढ्या वर्षानंतर ते तंत्रज्ञान आता सर्वसामान्यांच्या आवाक्यात आले आहे. आता मोबाईलची 18G तंत्रज्ञान असल्याने इंटरनेटचा वेग कमालीचा वाढलेला आहे. त्यामुळे आता हे ३ डी होलोग्रॅमिक प्रोजेक्टर दोन्ही मार्गाने सहज चालते. घरी बसल्याबसल्या आपण त्यावर सभेचा कोड व पासवर्ड टाकला कि त्यानंतर त्या सभेत बोलणारा वक्ता तुमच्या समोर उभा राहून भाषण करतो आहे असे वाटते. तर वक्त्याला ३ डी होलोग्रॅमिक प्रोजेक्टर वापरून सभा पाहणारे सर्वजण समोर बसल्यासारखे वाटतात. त्यामुळे कितीजण सभेला ३ डी होलोग्रॅमिक प्रोजेक्टर वापरून हजर आहेत हे वक्त्याला कळत असते आणि मोठा श्रोतागण पाहून वक्त्याला देखील हुरूप येत असे. त्यामुळे बऱ्याच दिवसात अनेक लोकं एकत्र येऊन गर्दी झाल्याचे पाहायलाच मिळाले नव्हते.

परंतु आज स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर होणाऱ्या समारंभासाठी कमीत कमी ५००० जण प्रत्यक्ष उपस्थिती लावतील असा अंदाज होता. त्यामुळे आज पुण्याच्या आसमंतात विशेषतः स. प. महाविद्यालयाच्या आसपास आकाशात गाड्यांची खुप गर्दी होण्याची शक्यता होती. आकाशात गाड्यांची गर्दी???? अहो विसरलात का २१९७ साल चालू आहे. आता रस्त्यावरच्या गाड्या जवळजवळ नामशेष झाल्या होत्या. व्हिंटेज गाड्यांच्या शर्यतीच्या वेळेसच त्या रस्त्यावर दिसत असत. आता सगळेजण हवेत उडणाऱ्या गाड्या वापरत होते. उडणाऱ्या गाड्यांना त्यांच्या पॉवर प्रमाणे ठरवून दिलेल्या वेगवेगळया उंचीवर गाड्या चालवाव्या लागत असत. उंचीवर देखील आखून दिलेल्या रस्त्यानेच जावे लागत असत. ते रस्ते त्यांच्या गाड्यांच्या स्क्रीनवर दिसत असत. जर स्क्रीनमध्ये न दिलेल्या रस्त्यावर अथवा एकेरी वाहतुकीच्या रस्त्यावर उलट्या दिशेने गाडी नेल्यास ताबडतोब चलन कापले जात असत आणि ते तुमच्या गाडीत पाठवले जात असत, जे तुम्हाला गाडीच्या स्क्रीनवर दिसत असत. तसेच चलनाचे पैसे तुमच्या बँकेच्या खात्यातून वजा केला जात असत. प्रमाणापेक्षा जास्त वेळा नियम तोडल्यास पोलिसांच्या गाड्या येऊन पकडत असत. गाड्या हवेत चालायला लागल्या असल्या तरी तेथेही गाड्यांची गर्दी होत होती. त्यामुळे तिथेही सिग्नल आले होते. काही ठिकाणी सारख्या पॉवरच्या गाड्यांसाठी दोन-दोन उंची दिल्या जात असत. म्हणजे हवेतील उड्डाण पूलच होते ते.

18G च्या इंटरनेट वेगामुळे बरेच जण घरी बसूनच काम करत असत. बाहेर फक्त वैयक्तिक काम, कौटुंबिक समारंभासाठी बाहेर पडत. सार्वजनिक कामासाठी खूप कमी वेळा बाहेर पडले जात असत. एकमेकांना काही द्यायचे असेल तर त्यासाठी ड्रोनचा किंवा रोबोटचा वापर केला जात असे. त्यामुळे आज एकदम ५००० हजार जण स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर एकत्र येणार असल्याने वाहतूक पोलिसांची तारांबळ उडाली होती. ५ हजार जणांची वाहतूक सुरळीत होईल असे पहायचे होते. तसेच तेवढ्या गाड्यांचे पार्किंगची नीट व्यवस्था असेल हे पहायचे होते. कारण जर वाहतूक जाम झाली किंवा पार्किंग शोधण्यात वेळ गेला तर पोलिसांना वाया गेलेल्या वेळेची मिनिटाच्या हिशोबात प्रत्येकाला भरपाई द्यावी लागत होती. त्यामुळे एवढ्या गाड्या पार्क करण्यासाठी पोलीस टिळक रोड, शास्त्री रोडवर पार्किंग डॉक उभारण्यात व्यस्त होते. पार्किंग डॉक म्हणजे एक उंच खांब असतो. ज्याच्यावर दर आठ फुटावर एक हुक लावलेले असतात. त्या हुकला गाडीच्या पुढच्या भागात असलेले हुकने स्पर्श करताच गाडी तिथे लॉक होत असत व त्या उंचीवर थांबत असत. त्या उंचीवर गाडी थांबण्यासाठी लागणारी पॉवर गाडीला त्या खांबातून मिळत असत. एका उंचीवर समोरासमोर असे दोन हुक असतात. एक पार्किंग डॉक साधारणपणे १५०- २०० फुट उंचीचा असतो. एका डॉकवर साधारणपणे ४०-५०

गाड्या पार्क होत असत. तुम्हाला प्रश्न पडत असेल एवढ्या उंचावर गाडी लावल्यावर खाली उतरायचे कसे? अहो त्या काळातील बूट हे देखील हवेत उडणारे होते. त्यामुळे तेवढ्या उंचीवरून खाली उतरणे तसे अवघड नव्हते. पाच हजार गाड्या पार्क करण्यासाठी किमान १०० ते १२५ पार्किंग डॉक लावावे लागणार होते. शिवाय गाडी त्या एरियात आल्यानंतर रिकाम्या पार्किंग डॉकची माहिती गाडीच्या डिस्प्ले स्क्रीनवर दिसेल अशी सोय देखील करावी लागणार होती. जवळील रिकामे पार्किंग हुक निवडण्याची सुविधा देखील द्यायला लागणार होती. तसेच त्या भागातील वाहतूक दुसरीकडे किंवा दुसऱ्या उंचीवर शिफ्ट करावी लागणार होती. अशा प्रकारे वाहतूक पोलीस यंत्रणा त्यात व्यस्त होती.

३ डी होलोग्रॅमिक प्रोजेक्टर आल्यापासून बरेच जण खूप कमी वेळा प्रत्यक्ष भेटत असत. त्यामुळे बरेच जण मोठया प्रमाणात एकत्र येणे व त्याचा आनंद घेणे विसरले होते. परंतु आजच्या कार्यक्रमाला येण्यासाठी पाच हजार जणांनी नोंदणी केली होती. परंतु एवढे सगळे जण एवढ्या दिवसानंतर कशासाठी एकत्र येत होते? असे काय कारण होते?

कारणही तसे विशेष होते. तिसऱ्या महायुद्धानंतर जगातील बऱ्याच देशांचा भूगोल बदलला होता. आता जगात मोजकेच २५-३० देश उरले होते. भारत हा जगातील महासत्ता बनला होता. भारताच्या प्रयत्नामुळे जगभरातील शस्त्रस्पर्धा थांबली होती. सर्व देश गुण्यागोविंदाने नांदत होते. त्यामुळे माणसाचे आयुष्यमान चांगलेच वाढले होते. सर्वसामान्य माणूस सहजपणे ८० वर्ष जगत होता. बरेच जण नव्वदी सहज गाठत होते. शंभरातील ५-१० लोकं आरामात शंभरी गाठत होते. परंतु आज सगळे जण अशा व्यक्तीला पहायला व भेटायला एकत्र येणार होते, जी व्यक्ती आज आयुष्याचे दुसरे शतक पूर्ण करत होते. कानावर विश्वास बसत नाही ना? पण हे खरे आहे. मोहनकाका हे जगातील पहिले असे व्यक्ती होते ज्यांचा आज दोनशेवा वाढदिवस साजरा होत होता. आधुनिक सर्व उपचार पद्धतीमुळे सुद्धा कोणी १२०-१२५ वर्षापेक्षा जास्त वर्ष जगलेला माणूस पहिला नव्हता.

त्यांच्या वाढत्या वयामुळे आतापर्यंत बऱ्याच जणांनी त्यांना वर्तमानपत्रातून, वेबसाईटवर, टेलिव्हिजनवर पाहिले होते. त्यांच्याबद्दल कलेहि होते. या वयातही ते व्यवस्थित चालत फिरत होते. स्वतःची कामे स्वतः करत होते. त्यामुळे बरेच जण त्यांना प्रत्यक्ष पहायला व भेटायला उत्सुक होते. जगभरातील अनेक मोठमोठ्या व्यक्तींनी त्यांना शुभेच्छा संदेश पाठवले होते. कारण तिसरे महायुद्ध प्रत्यक्ष अनुभवणारे, जग अणुयुद्धातून शांततेच्या “वसुधैव कुटुंबकम” च्या युगात जातानाच्या प्रत्येक क्षणाचे ते जगातील एकमेव साक्षीदार होते. त्यांना पहायला व

ऐकायला यायला अनेक जण उत्सुक होते. परंतु वाहतूक व इतर गैरसोईचा विचार करता सरकारने पाच हजार जणांनाच एकत्र येण्याची परवानगी दिली होती. परंतु या कार्यक्रमाचे उपलब्ध असणाऱ्या सर्व माध्यमांच्या आधारे जगभर प्रक्षेपण होणार होते. असा अंदाज होता कि किमान काही कोटी लोकं ते पाहतील.

पावसाळ्याचे दिवस असल्याने स. प. महाविद्यालयाचे मैदान पूर्ण कव्हर करण्यात आले होते. पाच हजार आरामदायी खुर्च्यांची सोय करण्यात आली होती. राज्याचे मुख्यमंत्री या कार्यक्रमाला उपस्थित राहणार होते. त्यामुळे सुरक्षा यंत्रणाही तेवढी सज्ज होती. पंतप्रधानांचा संदेश तेथे वाचून दाखवला जाणार होता. मोहनकाकांची सातवी, आठवी व नववी पिढीदेखील उपस्थित राहणार होती. ते सगळे नातेवाईक विविध शहरातून सुट्टी काढून या कार्यक्रमासाठी पुण्यात आले होते.

संध्याकाळच्या सहा वाजल्यापासून सर्वजण स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर जमायला सुरुवात झाली होती. त्याच वेळेस मोहनकाका शुक्रवार पेठेतील साठे कॉलोनीतील त्यांच्या घरातून हळूहळू चालत निघाले होते. बरोबर असणाऱ्या कोणाचीही एवढे चालायची तयारी नव्हती. त्यामुळे बरोबरचे सगळेजण हवेत उडणारे बूट व फ्लोटर घालून निघाले होते. दोनशे वर्षाचा तरुण चालत चालला होता. आणि त्याच्यापेक्षा कितीतरी कमी वयाचे तरुण चालू शकत नव्हते. हेच तर मोहनकाकांचे आश्चर्य पाहायला सर्वजण आले होते. भिकारदास मारुतीच्या मेट्रो स्टेशन आल्यावर अजून १०० जण त्यांच्या या प्रवासात सामील झाले. जे या कार्यक्रमाला येत नव्हते असे लोकं जागोजाग पुढे होऊन त्यांचे अभिनंदन करत व आशीर्वाद घेत होते.

सात वाजण्याच्या सुमारास मोहनकाका स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर पोहचले. त्यानंतर त्यांचे स्वागत, सत्कार झाला. मुख्यमंत्र्यांचे छोटेखानी भाषण झाले. पंतप्रधानांचा संदेश वाचण्यात आला. त्यानंतर मोहनकाकावर एक छोटी फिल्म दाखवण्यात आली. शेवटी जे ऐकण्यासाठी सगळेजण जमले होते ते मोहनकाकांचे बोलणे सुरु झाले. सुरुवातीला त्यांनी त्यांच्यासाठी आयोजित केलेल्या एवढ्या भव्य सत्कार समारंभासाठी सगळयांचे आभार मानले. नंतर त्यांनी त्यांच्या आठवणी सांगायला सुरुवात केली. सुरुवातीला त्यांनी त्यांच्या लहानपणीच्या काही आठवणी सांगितल्या. त्या काळातील तंत्रज्ञानाबद्दल बद्दल सांगितले. भारतातील सत्तांतर, तिसरे महायुध्द, त्यातील सुरुवातीची भारताची अवस्था, त्यानंतरची भारताची घोडदौड आणि महासत्ता बनणे हे सगळे सांगितले. जगातील शस्त्रस्पर्धा

थांबविण्यासाठी भारताने केलेले प्रयत्न व त्याला आलेले यश याबद्दल सांगितले. त्यानंतर ते खाली बसू लागले. तर सर्वजणांनी एकदम एक साथ विनंती केली, “ काका, तुमच्या सुदृढ आणि दोनशे वर्षाच्या जपलेल्या आरोग्याचे रहस्य सांगा. आम्हाला काही तरी आरोग्यमंत्र द्या.”

लोकांच्या आग्रहाखातर मोहनकाका पुन्हा बोलायला उभे राहिले. ते सांगू लागले, “माझ्या या सर्व दीर्घ आयुष्याचे राज आहे ते माझे नियमित सूर्यनमस्कार, योगासन आणि ध्यान करण्यामध्ये. मी दहा-बारा वर्षाचा असताना शाळेत मला सूर्यनमस्कार शिकवले आणि त्याचे महत्व सांगितले. तेंव्हापासून माझे बारा सूर्यनमस्कार कधी चुकले नाहीत. त्यानंतर महाविद्यालयात गेल्यावर त्यावेळेचे भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारानंतर त्यावेळेस नुकत्याच सुरु झालेल्या जागतिक योगदिनाच्या निमित्ताने योगासनांची माहिती मिळाली. तेंव्हा ते शिकलो व त्याचे फायदे पाहून नियमित योगासन करू लागलो. कोणत्या दिवशी कोणते योगासन करायचे याचे साप्ताहिक वेळापत्रक तयार केले. आजतागायत मी ते पाळतो आहे. २५-३० वर्षाचा असताना ध्यान करायला शिकलो. त्यानंतर दररोज किमान १५ मी. तरी ध्यान करतो. या सर्वाला दररोज एक तास पुरेसा असतो. या व्यतिरिक्त दोन किलोमीटरच्या आतील सर्व कामे चालत करतो. हल्ली तर महिन्यातून एखाद-दोन दिवस पूर्ण दिवसभर ध्यानात घालवतो. त्यात खूप मोठा आनंद मिळतो. या सर्वांमुळे शरीर उत्तम राहिले. शिवाय पहिल्यापासून मी शाकाहारी असल्याने मांसाहार करायचा संबंध आला नाही. कधीही कुठले व्यसन केले नाही. जास्त आंबट, जास्त तिखट पदार्थ खाणे टाळले. फळे व शक्य त्या भाज्या कच्च्या खाण्यावर भर देत आलो. त्यामुळे शरीराला कधी त्रास झाला नाही. याच बरोबर मानसिक स्वास्थ्य चांगले राहील याची देखील काळजी घेतली. सर्वांशी नम्रपणे वागत आलो. सर्वांचे म्हणणे पूर्ण ऐकून घेण्याची सवय लावली. कोणावरही स्वतःचे मत लादण्याचा प्रयत्न केला नाही. शक्यतो कोणावरही रागावत नाही. या स्वभावामुळे कोणाशीही वाद झाले नाहीत व मानसिक स्वास्थ्य चांगले राहते. अशाप्रकारे मानसिक व शारिरिक स्वास्थ्य सांभाळले म्हणून माझे आयुष्य वाढले आणि आज दोनशेवा वाढदिवस साजरा करतो आहे. अशीच जीवनशैली ठेवली आणि ईश्वराने साथ दिली तर अजून पन्नास वर्ष नक्की जगू शकेन. आपणदेखील या गोष्टी करायला सुरुवात केली आणि मुलांना करायला सांगितल्या तर यानंतरच्या काळात लवकरच अजून कोणीतरी आयुष्याचे द्विशतक पूर्ण करताना दिसेल. पुन्हा सगळ्यांचे या सत्काराबद्दल खूप खूप आभार व धन्यवाद.” सगळ्यांना हा सुदृढ आयुष्याचा संदेश देऊन मोहनकाका खाली बसले. आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रम संपला.

मोहनकाका घरी येताना त्यांच्या एका नातवाच्या गाडीतून घरी आले. सोसायटीत सोसायटीवाल्यांनी व काकांच्या नातेवाईकांनी एक छोटा कार्यक्रम ठेवला होता. तो आटोपता आटोपता रात्रीचे दहा वाजले. मोहनकाकांची झोपायची वेळ झाल्यामुळे थोडे काहीतरी खाऊन काका झोपायला अंथरुणावर पडले. परंतु त्यांना आज झोप लागत नव्हती. त्यांना सारखा त्यांनी लोकांना दिलेला सुदृढ आयुष्याचा संदेश आठवत होता. त्यांना स्वतःला माहित होते कि त्यांनी हे सगळे केल्याने त्यांचे शरीर आतापर्यंत चांगले होते. परंतु दोनशे वर्ष जगण्याचे कारण दुसरे वेगळेच होते. जे ते कोणालाही सांगू शकत नव्हते..........

मोहन पेंडसे म्हणजे आजचे आपले मोहनकाका. यांचा जन्म एका सधन कुटुंबात झाला होता. वडील सरकारी नोकरीत मोठ्या पदावर होते व आई एका खाजगी कंपनीत चांगल्या पदावर नोकरीला होती. मोहनला एक मोठा भाऊ देखील होता. मोहन मध्ये आणि त्याच्यामध्ये दहा वर्षाचे अंतर होते. मोठ्या भावाच्या जन्माच्या वेळेस त्याची आई नोकरी करत नव्हती त्यामुळे तिने मोठ्या भावाला पुरेसा वेळ दिला होता. तो पाच वर्षाचा होईपर्यंत आई त्याच्याबरोबर खेळायला होती. जसा तो शाळेत जाऊ लागला तसे मोहनच्या आईने नोकरी करायचे ठरवले. पाच वर्षात ती चांगल्या पदावर पोहचली होती. त्यामुळे जेंव्हा मोहनचा जन्म झाला तेंव्हा त्याच्यासाठी नोकरी सोडायची तिची तयारी नव्हती. आर्थिकदृष्ट्या कुटुंब उत्तम असल्याने मोहनला सांभाळण्यासाठी व इतर कामासाठी घरात नोकर ठेवण्यात आले. त्यामुळे मोहन लहानपणापासून नोकर व नोकरांच्या मुलांबरोबर मोठा झाला. मोठा भाऊ त्यांच्यापेक्षा चांगला दहा वर्षांनी मोठा होता. त्यांच्या वयातील अंतरामुळे त्यांचे खेळायचे खेळ वेगवेगळे होते. त्यामुळे मोठा भाऊ जास्त त्याच्याबरोबर खेळत नव्हता. भावाला त्याचा समवयस्क मित्रपरिवार होता. त्यामुळे तो त्यांच्याबरोबर खेळायला जायचा. त्यामुळे मोहन बऱ्याच वेळा त्यांच्या घरातील नोकरांच्या समवयस्क मुलांबरोबर खेळायचा. त्यामुळे साहजिकच त्याचे नोकरांशी चांगले संबंध तयार झाले.

वडील सरकारी नोकरीत मोठ्या पदावर असल्याने घरी वरिष्ठ अधिकाऱ्यांचे व इतर मोठमोठ्या लोकांचे सारखे येणे जाणे असायचे. पार्ट्या व्हायच्या. त्यांच्याबरोबर त्यांची मुलेही घरी यायची. परंतु मोहनचे मन रमायचे घरातल्या नोकरांमध्ये आणि त्यांच्या मुलांमध्ये. जसजसा मोहन मोठा होऊ लागला शाळेत जाऊ लागला तसे त्यालाही समवयस्क मित्र मिळायला लागले होते. परंतु त्यांच्यांमध्ये चालणाऱ्या श्रीमंतीच्या दिखाव्याच्या स्पर्धा मोहनला आवडत नव्हत्या. नोकरांच्या मुलांशी खेळताना त्याला ते कधी जाणवले नव्हते. जे आहे त्यात ती मुले खुश असायची. छोट्या-छोट्या गोष्टीत देखील ती मुले खूप खुश होत होती. त्यामुळे शाळेत जायला

लागला तरी मोहनला त्यांच्याबरोबरच खेळायला जास्त आवडत असे. मोहन आपल्या सर्व गोष्टी त्यांच्याबरोबर शेअर करत असे. मोहनची खेळणीही त्या मुलांचीच खेळणी असल्यासारखी असायची. मोहन त्याच्या खाण्याच्या गोष्टीही बऱ्याच वेळा त्यांच्याबरोबर वाटून खात असे. मोहनच्या भावाला हे मुळीच आवडत नसे. तो नेहमी त्या मुलांपासून लांबच राहत असे. त्याच्या आई-वडिलांना ते आवडत होते असे मुळीच नाही. परंतु त्यांचा त्याला आक्षेपही नव्हता. मोहन अभ्यासात चांगला असल्याने त्याचा निकाल चांगला लागत होता. मोहन वेगवेगळया स्पर्धांमध्ये भाग घेऊन बक्षीस मिळवत होता. शिवाय त्या मुलांबरोबर राहिल्याने खुश असायचा. त्यामुळे ते त्या गोष्टीला आक्षेप घेत नव्हते.

या सगळयामुळे मोहनला गरीब लोकांबद्दल आपुलकीचा भाव निर्माण झाला होता. यामुळे नकळत त्याच्यात सेवाभाव वाढत चालला होता. नवीन आलेल्या शिक्षण हक्काच्या कायद्यामुळे (Right to education) त्याच्या वर्गात गरीब घरातील काही मुलांना प्रवेश देण्यात आला होता. एकदम श्रीमंत मुलांच्या शाळेत आल्याने ती मुले चांगलीच बुजत होती. परंतु मोहनने जाणूनबुजून त्यांच्याशी मैत्री करून घेतली. त्यामुळे ती मुले शाळेत लवकर रुळू शकली. ही मुले वस्तीत राहणारी होती. त्यांचे आई-वडील पोटापाण्यासाठी मोलमजुरी करत असत. कामाच्या व्यापामुळे त्यांना मुलांना शाळेत नेणे-आणणे शक्य नसायचे व शाळेची बस लावणे देखील परवडणारे नव्हते. त्यामुळे ती मुले चालतच शाळेत यायची व शाळेतून चालत जायची. त्यांची घरे तशी शाळेपासून लांब असायची. मोहनच्या हे लक्षात आले. त्याने त्याच्या घरी जाण्याच्या रस्त्यावर असणाऱ्या मुलांना घरी सोडायचे ठरवले. त्याला माहिती होते कि त्या मुलांबरोबर शाळेत खेळण्यापर्यंत त्याचे आई-वडील त्याला काही बोलत नव्हते. परंतु त्यांच्या महागड्या गाडीतून त्या मुलांना न्यायला आणायला सुरुवात केली तर मात्र त्यांना ते आवडणार नाही. म्हणून त्याने पहिल्यांदा गाडीच्या ड्रायव्हरशी बोलणे केले आणि घरी काही सांगणार नाही याची कबुली घेतली. आणि मग त्याने दररोज त्याच्या रस्त्यात राहणाऱ्या ४-५ मुलांना शाळेत जाताना घेऊन जायला व शाळेतून परतताना घरी सोडायला सुरुवात केली. मोहन त्याला मिळणारी पॉकेट मनी ही नेहमी गल्ल्यात साठवत असे. जेंव्हा त्याला असे लक्षात येत असत कि या मुलांना एखाद्या शैक्षणिक गोष्टीची गरज आहे परंतु पैसे नसल्याने ते तो घेऊ शकत नाहीत. तेंव्हा मोहन त्याची साठवलेली पॉकेट मनी त्या मुलांना देत असत. असा हा मोहन होता. गरिबांबद्दल त्याच्या मनात दयाभाव होता. कोणीही संकटात दिसले तर त्याला मदतीला धावून जायला तो नेहमी तयार असत.

हळूहळू त्याचे शाळेचे शिक्षण पूर्ण झाले. तो आता कॉलेजमध्ये जायला लागला. तरी त्याच्या स्वभावात फरक पडला नाही. गरीबच असले पाहिजे असे काही नाही परंतु साधे राहणारा प्रत्येकजण हा त्याचा मित्र असायचा. मौज-मजा, हुल्लडबाजी, पार्ट्या करणे या गोष्टी त्याला मुळीच आवडत नसे. त्यापेक्षा एखादा अभ्यासात मागे पडला असेल किंवा त्याला काही समजत नसेल तर त्याच्या घरी जाऊन त्याला समजावून सांगणे त्याला जास्त आवडत असत. आणि हे सगळे करताना आपण काही तरी वेगळे करतो आहोत असे त्याला कधीच वाटत नव्हते. त्यामुळे अडीअडचणीला धावून येणारा, मदतीसाठी सदैव तत्पर असणारा असा तो सगळयांचा मित्र होता.

परंतु त्याच्या घरच्यांचा स्वभाव पूर्णपणे वेगळा होता. त्यांचा भर हा नेहमी भरपूर पैसे कमावण्यावर असायचा. चांगले खर्चिक कपडे घेत राहणे. चांगले खर्चिक ठिकाणी निमित्त शोधून पार्ट्या करत राहणे. त्या सगळयाचा मित्रपरिवारामध्ये शो-ऑफ करत राहणे असा त्यांचा स्वभाव होता. त्याच्या घरचे लोकांना दाखवण्यासाठी काही समाजकार्य करत असत. बऱ्याच वेळा कुठल्यातरी कार्यक्रमात गरिबांना बोलावून काही वस्तूंचे, साहित्याचे वाटप करत असत. परंतु ते तेवढ्यावर थांबत नसत, तर त्याचे फोटो वेगवेगळया वर्तमानपत्रात कसे येतील किंवा टेलिव्हिजनवर कसे दिसतील असा प्रयत्न असायचा. असे म्हटले तर जास्त सोईचे होईल कि जिथे प्रसिद्धीची खात्री असायची अशाच ठिकाणी जाण्यावर त्यांचा भर असायचा.

मोहनचा मोठा भाऊ इंजिनियरिंगचे शिक्षण पूर्ण झाल्यांनतर उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला गेला होता. तिथे त्याने पुढील शिक्षण घेतले आणि तिथेच नोकरीला लागला होता. आता तर त्याने तिथेच स्थायिक होण्याचा निर्णय घेतला होता. त्याच्या आई-वडिलांना या गोष्टीचा खूप आनंद झाला होता व त्याचा खूप अभिमान वाटत होता. त्यांना वाटे मोहनने देखील तसेच काही तरी करावे. परंतु मोहनला हे सर्व पटत नव्हते. त्याला पैशाच्या मागे पाळण्यात विशेष रस नव्हता. त्यापेक्षा जीवन आनंदाने जगण्यावर त्याचा जास्त भर होता. त्याने संगणकातील पदवी पूर्ण केली. घरच्यांमध्ये आणि आपल्यामध्ये वैचारिक मतभेद आहेत त्यामुळे आपल्या विचारांप्रमाणे जगण्यासाठी लवकरात लवकर स्वतःच्या पायावर उभे राहण्याच्या उद्देशाने त्याने नोकरी करायला सुरुवात केली. त्याचे सर्व मित्रही तसे साधारण घरातीलच होते त्यामुळे ते देखील लवकर नोकरीला लागले होते. पण त्यामुळे मित्रांचे भेटणे कमी झाले.

मोहन नोकरीला लागल्यानंतरचा पहिलाच पावसाळा होता. मोहनला नोकरी लागून काही महिनेच झाले होते. त्याचवेळेस मोहनचा मोठा भाऊ काही कामानिमीत्त भारतात

आला होता. त्याला कामातून चार-पाच दिवस मोकळे मिळणार होते. त्यामुळे घरातील सर्वांनी त्यांच्या कोंकणातील सेकंड होममध्ये काही दिवस रहायला जाऊन एन्जॉय करायचे ठरवले. परंतु मोहनने त्यांच्याबरोबर जाण्यास नकार दिला. कारण त्याला त्यांच्या एन्जॉय करण्याची पध्दतच आवडत नव्हती. त्यामुळे त्याने कारण सांगितले कि तो customer care विभागात कामाला आहे, त्यामुळे त्याला सदैव म्हणजे २४ x ७ तास कामासाठी तयार असावे लागते. कोकणात विजेचा आणि इंटरनेट या दोन्हीचा सारखा प्रॉब्लेम असतो त्यामुळे येणे शक्य नाही असे त्याने सांगितले. तसेच नवीन नोकरी असल्याने त्याला सुट्टी मिळणे अशक्य होते. त्याला एकट्याला घरी सोडून सगळे कुटुंब चार दिवसासाठी कोकणात राहायला गेले. परंतु घरी नोकरमंडळी होती जे त्याची खाण्यापिण्याची काळजी घ्यायला हजर होती. एकट्याला असे किती लागणार अशा विचारणे त्याने नोकरांना एक वेळसच येऊन स्वयंपाक करायला व घरातील स्वच्छता करायला सांगितले. त्याचा विचार होता मित्रांना घरी बोलावून बऱ्याच दिवसाच्या राहिलेल्या गप्पा माराव्यात. त्याने फोन करून विचारल्यावर कळले कि सगळेजण आपआपल्या कामात व्यस्त आहेत. त्यामुळे मोहन शेवटी घरी एकटा पडला. तसं त्याला एकटे राहायलाच जास्त आवडत असे.

पहिल्या दिवशी तो कामाला गेला. त्यामुळे त्याचा वेळ कामात गेला. त्यानंतर शनिवार व रविवार होता. त्यामुळे त्याला सुट्टी होती. परंतु त्यादिवशी देखील मित्रांना यायला जमणार नव्हते. त्यामुळे कुठेतरी जवळपास फिरून येऊ असे त्याने ठरवले. परंतु शनिवारी सकाळपासून बाहेर जोराचा पाऊस लागला होता. त्यामुळे घराबाहेर पडणे केवळ अशक्य होते. त्यामुळे घरीच काय करावे याचा तो शोध घेत होता. वेळ घालवण्यासाठी काही वेळ त्याने टेलिव्हिजन पाहिला नंतर तो गॅरेजमध्ये आला. काही वेळ तिथल्या महागड्या गाड्या पाहण्यात त्याचा वेळ गेला. त्याही पाहून झाल्या आता करायचे काय? असा तो विचार करत होता. तेवढ्यात त्याचे लक्ष गॅरेजच्या एका कोपऱ्यात गेले. जिथे एक पत्र्याचे मोठे आयताकृती झाकण होते. ते झाकण एका कुलुपाने जमिनीच्या हुकला लावलेले होते. सुरुवातीला वाटले ड्रेनेजसारखे काही तरी असेल. पण त्याला कुलूप लावलेले पाहताच त्याची उत्सुकता ताणली गेली. त्याने त्या कुलुपाची चावी आजूबाजूला पाहण्याचा प्रयत्न केला. मग त्याला वाटले कि कदाचित याची चावी गाड्यांच्या चाव्याबरोबर असेल. त्यामुळे त्याने गाड्यांच्या चाव्यांमध्ये शोधायला सुरुवात केली. तर त्याला तिथे एक जुनाट चावी मिळाली. जी कदाचित बरेच दिवस कोणी हाताळली नसल्याने तिच्यावर बरीच धूळ साचलेली होती.

मोहनने त्या चावीने ते कुलूप उघडण्याचा प्रयत्न केला. चावी कुलुपात लगेच गेली. परंतु कुलूप काही उघडायला तयार नव्हते. त्याला लक्षात आले कुलूप बरेच दिवस न हाताळल्याने त्याला थोडा गंज आला होता. त्यामुळे त्याने गाडीच्या स्पेअर-पार्टच्या पेटीत असणारे ऑईल त्यात घातले. त्यानंतर थोड्या वेळानंतर ते कुलूप थोडा जोर लावल्यावर उघडले. कुलूप उघडल्यावर मोहनने तो पत्रा बाजूला केला. तर त्याला तिथे खाली तळघरात जाणाऱ्या पायऱ्या दिसल्या. तिथे त्या पायऱ्यांच्या वाटेवर बराच अंधार होता. त्यामुळे त्याने गॅरेजमधून एक मोठा टॉर्च घेतला. आणि तो तळघरात जायला निघाला. दहा-पंधरा पायऱ्या उतरून खाली आल्यावर त्याला एक दरवाजा लागला. त्याला वाटले आता याला देखील कुलूप असले तर पुन्हा चावी शोधत बसावे लागेल. त्याने टॉर्चच्या प्रकाशात पाहिले तेंव्हा लक्षात आले कि दाराला फक्त कडी लावलेली होती. त्याने दरवाजा उघडला व तो त्या खोलीत गेला. खूप दिवस ती खोली न उघडल्यामुळे तिथे कुबट वास येत होता. त्याने टॉर्चच्या प्रकाशात खोलीच्या बल्बचे बटन शोधले आणि बल्ब चालू केला. बरेच दिवस तिथे कोणी न आल्याने आतील सर्व वस्तूंना कोळयाने जाळी करून ठेवली होती. त्याने हाताने तिला बाजूला केले. त्या खोलीत खूप समान अस्ताव्यस्त पडलेले होते. त्याला सुरुवातीलाच त्याची लहानपणीची खेळणी व त्याच्या भावाची खेळणी नजरेस पडली. आता त्याच्या लक्षात आले कि लहानपणापासून त्याला भीती दाखवताना कोंडून ठेवतो असे म्हणताना सांगितली जाणारी स्टोअर रूम ती हीच आहे. ही खोली पाहण्याची त्याला कधी संधीच मिळाली नव्हती.

त्याने तिथे बसायला थोडे जागा केली आणि तो त्याची खेळणी पाहत तिथे बसला. प्रत्येक खेळण्याबरोबर जोडलेल्या लहानपणीच्या आठवणी त्याच्या डोळयासमोर येऊ लागल्या. यात त्याचा बराच वेळ गेला. दुपार झाली आणि त्याला भूकही खूप लागली. त्यामुळे तो वर आला आणि त्याने जेवण केले. त्यानंतर पुन्हा तो खाली जाऊन त्या खोलीत वस्तू पाहत बसला. एक एक वास्तू पाहत असताना त्याचे लक्ष कोपऱ्यात ठेवलेल्या एका जुनाट नक्षीदार पेटीकडे गेले. तो ताबडतोब त्या पेटीकडे गेला. त्याला ती कधी पाहिल्याचे आठवत नव्हते. त्यात काय आहे हे पाहण्याचा त्याने प्रयत्न केला. परंतु त्याला फक्त छोटीशी फट निर्माण करता आली. त्यात त्याला काचा लावलेले काही तरी वस्तू आहे हे जाणवले. परंतु त्या खोलीतील पसाऱ्यामुळे त्याला ती पूर्ण उघडता येत नव्हती. त्याला ती पेटी बाहेर काढून त्यातील वस्तू पहायची इच्छा निर्माण झाली. ती बाहेर काढून गॅरेजमध्ये ठेवणे योग्य नव्हते. ती जर गॅरेजमध्ये ठेवली तर त्याला अनेकांच्या अनेक प्रश्नांना उत्तरे देत बसावे लागले असते. म्हणून त्याने ती पेटी त्याच्या खोलीत न्यायची ठरवले. परंतु त्याला एकट्याला ते शक्य नव्हते. कारण तशी ती पेटी खूप जड होती.

आता त्याला नोकर घरी येईपर्यंत वाट पाहण्याशिवाय गत्यंतर नव्हते. परंतु त्याच्या नशिबाने संध्याकाळच्या वेळात काही काम करायचे राहिल्याने एक नोकर घरी आला होता. मोहनने ताबडतोब त्याच्या मदतीने ती पेटी स्वतःच्या खोलीत आणून ठेवली आणि त्याने ती पेटी उघडून पहायला सुरुवात केली. त्यात एक मोठी आयताकृती वस्तू होती. त्याने ती वस्तू काढून बाहेर ठेवली. त्या वस्तूला चारी बाजूला बऱ्याच भिंगासारख्या काचा लावल्या होत्या. त्या वस्तूच्या एका बाजुला पाहण्यासाठी एक छिद्र होते. मोहनने त्यात पहिले तर त्याला लांबची वस्तू जवळ व मोठी दिसू लागली. त्याला वाटले ही एक प्रकारची दुर्बीण असावी. त्याने ती बाजूला ठेवली आणि पेटीत अजून काही आहे का ते पाहू लागला. तर त्याला त्यात एक अंगठी दिसली ज्यात एक कागद सुरळी करून ठेवला होता. त्याने तो अंगठीतील कागद काढून पहिला तर त्यावर संस्कृतमध्ये काही तरी लिहिलेले होते. तसेच त्याला त्या पेटीत एक कॅलेंडर मिळाले.

हि वस्तू कोणाची असेल असा तो विचार करू लागला. कारण त्या खोलीत असणाऱ्या जवळजवळ सगळया वस्तू ह्या त्याच्या किंवा त्याच्या भावाच्या होत्या. काही वस्तू आई-वडिलांच्या देखील होत्या. परंतु ही काही त्यांची कोणाची असेल असे त्याला वाटेना. त्यामुळे या वस्तूशी जास्त काही खेळण्यापूर्वी ती कोणाची आहे हे जाणून घेणे गरजेचे आहे असे त्याला वाटले. म्हणून त्याने आईला फोन लावला आणि विचारले, “आई, ती स्टोअर मध्ये असलेली नक्षीदार पेटी कोणाची आहे?”

“कुठली पेटी? आणि तू स्टोअरमध्ये काय शोधत होतास?”

“काही शोधत नव्हतो. कंटाळा आला म्हणून स्टोअर उघडून पहात बसलो होतो. तिथे कोपऱ्यात मला एक नक्षीदार लाकडाची पेटी दिसली. ती कोणाची आहे?”

“मला नाही माहिती.... मी लग्न करून या घरात आली तेंव्हाही ती तिथे होती. जाऊदे ना तुला काय करायचे आहे?”

“ठीक आहे” असे म्हणून त्याने फोन खाली ठेवला.

त्याला लक्षात आले कि आईला काही माहिती नाही. परंतु त्याला माहिती करून घ्यायचे होते कि ती नक्की कोणाची आहे. कारण अशा प्रकारची दुर्बीण त्याच्या ऐकण्यात व पाहण्यात देखील नव्हती. म्हणून त्याने वडिलांना फोन लावला, “बाबा, कंटाळा आला म्हणून मी स्टोअर उघडून तिथल्या वस्तू पहात बसलो होतो. तर तिथे कोपऱ्यात मला एक नक्षीदार लाकडी पेटी दिसली. ती कोणाची आहे?”

“अरे ती माझ्या वडिलांची म्हणजे तुझ्या आजोबांची आहे.”

“त्या पेटीत काय आहे? ती आजोबांच्या कामाची वस्तू होती का? आजोबा काय करत होते? ”

“अरे तुझे आजोबा शास्त्रज्ञ होते. भौतिकशास्त्र या विषयाचे. आईन्स्टाईनने मांडलेल्या टाईम मशीन या कल्पनेने ते फार प्रभावित झाले होते. त्यामुळे निवृत्तीनंतर सतत ते तळघरात काही तरी करत बसलेले असत. म्हणायचे मी टाईम मशीन तयार करणार आहे. ते गेल्यानंतर त्यांचे सगळे सामान मी भंगारवाल्याला देऊन टाकले होते. या पेटीची नक्षी छान वाटल्याने मी ती तेवढी ठेवली होती. बरे झालं तू ती काढलीस. भंगारवाल्याला देऊन टाकायला सांग कोणाला तरी. कारण ती काय आता कोणाच्या कामाची नाही.”

आता मात्र मोहनची उत्सुकता ताणली गेली. त्याने विचारले, “मी ती उघडून पहिली तर चालेल का?” खरं तर त्याने ती आधीच उघडली होती.

“हो काही हरकत नाही. बघ तुझ्या कामाच्या आहेत का त्यातील गोष्टी. बरं तु कसा आहेस. जेवण पाणी वेळेवर कर.”

“सगळे छान चालू आहे. ठेवतो आता.” असे म्हणून मोहनने फोन ठेवला. आता त्याला पेटीतील वस्तू नीट पहायची घाई झाली होती.

या वस्तू कोणाच्या आहेत आणि यात काय असू शकते याचा साधारणपणे मोहनला अंदाज आला होता. कदाचित आजोबांनी टाईम मशीन बनवण्यासाठी गोळा केलेल्या वस्तू तर नसतील यात. आता तो वेगळ्याच नजरेने त्या सर्व वस्तूकडे पहायला लागला. त्याने सुरुवातीला अंगठी बाहेर काढली व पाहू लागला. ती जाळीदार अंगठी होती. अंगठीतील खड्याच्या खाली एक छोटी डब्बी होती. अगदी घड्याळाच्या मशिनसारखी. त्याने ती अंगठी बोटात घालायचा प्रयत्न केला. तर त्याला ती खूप मोठी होत होती. त्याला वाटले आजोबा चांगले बलदंड असतील. त्यामुळे त्यांचे बोटही जाड असणार. तशीच अंगठी बोटात ठेऊन तो अंगठीत असलेला कागद उलगडून पाहू लागला. त्याने ते संस्कृत वाक्य पहिले तर त्याला ते एखाद्या मंत्रासारखा वाटले. मोहनने तो मंत्र वाचण्याचा प्रयत्न केला. त्याला सलग असा तो वाचता येईना. त्याने दोन-तीन वेळा प्रयत्न केला. नंतर त्याला तो मंत्र सलग वाचता आला. मग त्याने शेवटचे एकदा म्हणून तो मंत्र स्पष्टपणे मोठ्याने उच्चारला. आणि काय आश्चर्य. त्या अंगठीची जाळी एकदम आकसल्यासारखी झाली आणि ती अंगठी त्याच्या बोटात अगदी मापाची असल्याप्रमाणे घट्ट

बसली. मोहन या प्रकाराने एकदम दचकलाच. मग त्याच्या लक्षात आले कि ही अंगठी आणि या मंत्राचा काहीतरी संबंध आहे म्हणून तर आजोबांनी ते एकत्र ठेवले होते. कदाचित हा मंत्र त्या अंगठीचा पासवर्ड असला पाहिजे.

आता मात्र त्याला वाटायला लागले कि या पेटीतील इतर गोष्टींचा देखील असाच काहीतरी संबध नक्कीच असेल म्हणून त्याने कॅलेंडर काढले आणि नीट पाहू लागला. सर्वात वरती जिथे एखादे चित्र असते तिथे मोकळी जागा होती. त्याच्या खाली मोठ्या अक्षरामध्ये साल निवडण्यासाठी चार आकडे होते. आता त्यावर १९७० साल निवडले होते. आणि प्रत्येक आकड्याच्या खाली ०ते ९ असे आकडे एकाखाली एक होते. ज्याचा उपयोग करून दुसरे साल निवडता येऊ शकत होते. त्याच्या बरोबर खाली महिना होता. ज्यावर आता फेब्रुवारी महिना दाखवत होता. आणि त्याच्या खाली इतर महिने होते. सर्वात खाली तारिख निवडण्यासाठी दोन आकडे होते. आता तिथे ०४ तारीख होती. त्याच्या खाली देखील ० ते ९ असे आकडे एका खाली एक होते. ते वापरून तारीख निवडता येऊ शकत होती. ते सर्व आकडे व महिने हे कुठल्यातरी विशिष्ठ धातूचे होते. कदाचित चांदी किंवा तसा दिसणारा दुसरा कुठलातरी धातू असावा. शेवटी त्याने पुन्हा दुर्बीण पहायला घेतली. त्या दुर्बीण सारख्या दिसणाऱ्या आयताकृती ठोकळयाच्या सर्व बाजूला कुठे भिंग तर कुठे काचा अशाप्रकारे बऱ्याच काचा व बऱ्याच भिंग लावलेल्या दिसत होत्या. परंतु दुर्बीण म्हणून एकच भिंग वापरली जात असल्याचे लक्षात आले. मग त्याच्या लक्षात आले कि त्या दुर्बिणीतून उंचावरची गोष्ट म्हणजे छताच्या कोपऱ्यातील छोटा डाग मोठा दिसत आहे. त्याला वाटले कि कॅलेंडर यातून पहिले तर काहीतरी होत असेल. परंतु तेवढ्या उंचीवर कॅलेंडर लावणे शक्य नव्हते. त्यामुळे दुर्बिणी सारखी ती वास्तू त्याने जमिनीवर ठेवली व त्याच्या समोर स्टुल ठेवून त्यावर कॅलेंडर ठेवले. थोडे इकडे तिकडे केल्यावर त्याला कॅलेंडर दिसायला लागले. परंतु काहीही व्हायला तयार नव्हते.

मोहनचे लक्ष दुर्बिणीतून पाहण्यासाठी असलेल्या छिद्राच्या खाली असलेल्या एका खाचेकडे गेले. त्या खाचेच्या खड्ड्याचा आकार हा अंगठीतल्या खड्याच्या आकाराचा होता. मग त्याने पटकन अंगठी बोटातून काढली व तिथे लावण्याचा प्रयत्न केला. परंतु काहीही होत नव्हते. त्याने अंगठी परत बोटात घातली आणि तिथे लावण्याचा प्रयत्न केला तर यावेळेस ती पटकन त्या खाचेत जाऊन बसली. त्याने ती अंगठी खाचेतून काढण्याचा प्रयत्न केला तर ती काही निघायला तयार नव्हती. ती त्याने थोडी फिरवून काढण्याचा प्रयत्न करत असताना ती घड्याळाच्या काट्याच्या दिशेने (clockwise) फिरवली गेली आणि नंतर ती अंगठी त्या खाचेतून

निघाली. परंतु काय आश्चर्य अंगठी निघाल्यानंतर ट्रान्सफार्मर चित्रपटातील गाड्यांप्रमाणे तो ठोकळा उलगडू लागला. उलगडून ते ४ बाय ४ फुटाच्या चौकोनाएवढे किंवा त्याच्यापेक्षा मोठे व सात फुट उंचीचे मोठे यंत्र तयार झाले. त्या यंत्राने खोलीचा बराच मोठा भाग व्यापला होता. त्याला स्वतःलाच माहिती नव्हते कि हे नक्की काय आहे. जर दुसऱ्यांनी ते यंत्र पाहून प्रश्न विचारले तर काय उत्तर द्यायचे. या विचारणे बाहेरून कोणी पाहू नये म्हणून मोहनने ताबडतोब उठून खोलीचे दार व खिडक्या आतून बंद करून घेतल्या. आता त्यावरील काचा व भिंग या आतमध्ये वेगवेगळया जागेवर दिसत होत्या. त्या यंत्रामध्ये काही प्रीझमच्या आकाराचे लहान मोठे असे बरेच काचेचे ठोकळेदेखील होते. काही भिंग ह्या बाहेरच्या बाजूला दिसत होत्या. आता दुर्बिणीचे पाहायचे छिद्र एका बाजूला व माणसाच्या डोळयाच्या उंचीवर आलेला दिसत होता. त्यातून अजूनही ते कॅलेंडर स्पष्ट दिसत होते. आता त्याला त्या मशिनच्या आतल्या बाजूला बरीच वेगवेगळया आकाराची व जाडीची काटेरी चाके (machine wheels) दिसत होती. ते एक किचकट यंत्र आहे असे वाटत होते.

त्याने नीट फिरून बाहेरच्या सर्व बाजूने ते मशीन पहिले. एक सगळयात मोठ्या आकाराची भिंग एखाद्या रडारच्या डिशसारखी थोडी बाहेर निघून आकाशाकडे बघत होती. त्याने तेथून काही दिसते हे पाहण्यासाठी मोहन खिडकीत चढला. तरीही त्याला नीटसे काही दिसेना. त्यामुळे त्याने खिडकीच्या वरची झडप उघडली. परंतु त्याला काही दिसेना. कारण हे सगळे पहायच्या नादात मोहनच्या हे लक्षात आले नव्हते कि रात्र झाली आहे व बाहेर आता चांगलाच अंधार पडला होता. त्यामुळे मोहन खाली उतरला व कशाप्रकारे त्या भिंगात पाहण्यासाठी प्रकाश टाकता येईल याचा विचार करू लागला. त्याने गॅरेजमध्ये जाऊन टॉर्च आणायचे ठरवले. त्यासाठी खोलीच्या बाहेर जाण्यासाठी त्याने बोटातून अंगठी बाहेर काढली. तर पटकन घडी होऊन ते यंत्र पूर्वीप्रमाणे छोट्या आकारात गेले. त्याला लक्षात आले कि या अंगठीने बरेच काही नियंत्रित होते आहे. आता हे सर्व उद्या सकाळी निवांत पाहू या असे मनाशी ठरवून त्याने सर्व पसारा आवरून पेटीत पुन्हा ठेऊन दिला. आणि पेटी त्याच्या बेडखाली सरकावून ठेवली.

खाली डायनिंग खोलीमध्ये जाऊन त्याने जेवण केले. खोलीत येऊन अंथरुणावर पडला. पडल्या पडल्या तो विचार करू लागला हे यंत्र म्हणजे नक्की काय असेल? हेच तर टाईम मशीन नसेल ना? या विचारातच त्याला झोप लागली. त्याला स्वप्नातही तेच मशीन सारखे दिसत होते.

दुसऱ्या दिवशी पुन्हा एकदा ते मशीन कधी पाहतो असे त्याला झाले होते. त्याने सर्व सकाळच्या विधी आवरल्या. कामवाल्या मावशी आल्या होत्या त्यांनी तयार करून दिलेला चहा, नाश्ता केला. आणि त्यांना सांगितले कि स्वयंपाक करून झाल्यावर तुम्ही दार ओढून घेऊन गेलात तरी चालेल. तेवढ्यात कपडे धुण्यासाठी मावशी आल्या. त्यांनाही त्याने तेच सांगितले. त्यानंतर तो त्याच्या खोलीत गेला. त्याने कालप्रमाणे स्टूलवर कॅलेंडर ठेवले. अंगठी बोटात घातली आता ती सहज बोटात जाऊन त्याला बसत होती. म्हणजे फक्त पहिल्यांदा नवीन माणसाला ती घालताना तो मंत्र म्हणणे गरजेचे असते हे त्याच्या लक्षात आले. त्यानंतर त्याने अंगठी त्या खाचेत घालून अंगठी फिरवली आणि यंत्र मोठे केले. इतर कोणाला तो काय करतो आहे किंवा काय पाहतो आहे हे कळू नये म्हणून त्याने खोलीचे दार व खिडक्या लावल्या होत्या. आता त्याने वरची झडप उघडून ती रडारसारखी बाहेर असणारी भिंग पहायला गेला. तर झडप उघडताच ते भिंगच त्या दिशेने वळले आणि बाहेरुन येणारा सूर्यप्रकाश त्याच्यावर पडेल अशा पद्धतीने स्वतःला सरकवून घेतले. जसे त्या भिंगावर सूर्यप्रकाश पडला तसा त्यावरील प्रकाश परावर्तीत होऊन यंत्रामधल्या सर्व काचा व भिंगावर पडला. आणि ते मशीन एकदम प्रकाशाने चमकु लागले होते. त्याने निट पाहिल्यावर त्याच्या लक्षात आले जेथे दुर्बिणीचे पहायचे छिद्र होते त्याच्या बाजूला माणसाला आता जाता येईल अशी जागा होती. यंत्राच्या मध्यभागी एक माणूस उभा राहील एवढी जागा होती. आणि एक प्रकाशाचा झोत त्या मध्यभागात येऊन पडत होता.

आता त्याने आत जायचे ठरवले. तो हळूच यंत्राच्या मध्यभागात असणाऱ्या जागेत आला तर त्याच्या लक्षात आले कि तो प्रकाशझोत साधारण अंगठीच्या जवळपास येत होता. त्याला वाटले कदाचित तो प्रकाश अंगठीवर पडल्यानंतर काही तरी होईल. परंतु आता तो प्रकाश अंगठीवर पडत नव्हता. कदाचित आजोबांच्या व त्याच्या उंचीतील फरकामुळे हे होत असेल. मग त्याने जेथून तो प्रकाश परावर्तीत होऊन तेथे येत होता त्या काचेला हात लावला तर ती काच थोडी हालत होती. त्याने ती काच थोडी हलवल्यावर अंगठीवर प्रकाश पडू लागला. परंतु तरीही काही झाले नाही. मोहनला वाटले कदाचित आजोबा इथपर्यंतच हे मशीन करू शकले असतील. करण अंगठीवर प्रकाश पडूनही काही होत नव्हते. त्याने उभे राहिल्या राहिल्या अंगठीचा हात हलवायला सुरुवात केली. एका विशिष्ठ कोनात अंगठी गेल्यावर. अंगठीतून खूप प्रकाश बाहेर पडला व त्या यंत्रातील सर्व चाके एकदम फिरायला सुरुवात झाली. ह्या सर्व प्रकाराने तो दचकला. आजूबाजूचे सर्व फिरती चाके व चमकणाऱ्या काचा पाहून त्याला आपण एका हिऱ्याच्या घड्याळात उभे असल्यासारखे वाटत होते. परंतु एवढी सगळी चाके फिरत असताना आवाज होत नव्हता. काही वेळातच चाकांचा वेग वाढला आणि त्याला केवळ प्रकाशच दिसू

लागला. त्याचे शरीर एकदम हलके झाल्याचा त्याला भास होऊ लागला. त्यानंतर काही वेळातच प्रकाश नाहीसा झाला. तो आकाशात उडतो आहे असे त्याला वाटू लागले. त्याने खाली पाहिले तर एक शहर दिसत होते. जिथे खूप कमी गाड्या दिसत होत्या. त्याने आजूबाजूला पहिले तर त्याला एका बाजूला छोटी टेकडी दिसली. त्या टेकडीवर एक देऊळ दिसले. त्या टेकडीच्या जवळ एक छोटी बागेसारखे काही तरी दिसत होते. त्याच्या मध्यभागी एक उंच भाग दिसत होते. त्या भोवती पाणी दिसत होते. त्या बेटावर खूप झाडी दिसत होती. त्या झाडीच्या मध्यभागातून एका मंदिराचे शिखर वर आलेले दिसत होते. मग त्याच्या लक्षात आले कि ती टेकडी म्हणजे पर्वती आहे व ते तळे म्हणजे सारसबाग आहे. मग निट लक्ष देऊन पहिले तर त्याला रस्त्यावर एखाद दुसरीच गाडी दिसत होती. सायकली व घोडागाडी मात्र मोठ्या प्रमाणात दिसत होत्या. एकूणच पुण्यात आताच्या मानाने खूप झाडी दिसत होते. हळूहळू खालील शहराचा फिरण्याचा वेग वाढू लागला. त्यामुळे त्याला चक्कर आल्यासारखे होऊ लागले. त्याने पटकन हातातील अंगठी काढली. तर त्याने स्वतःला यंत्रामध्ये उभे असलेले पाहिले. त्याला प्रचंड थकल्यासारखे वाटत होते. जसा एखाद्या विमानप्रवासानंतर आपल्याला जेटलॉग येतो अगदी तसा. परंतु हा जास्तच मोठा जेटलॉग वाटत होता. तो ताबडतोब यंत्राच्या बाहेर आला आणि त्याच्या बेडवर जाऊन पडला. पडताक्षणी त्यालाझोप लागली. तो यंत्रातून बाहेर पडताच यंत्र आकसले जाऊन छोटे झाले होते. परंतु ते पहायला मोहन जागा नव्हता.

जवळजवळ मोहन सहा तास तसा झोपून होता. त्याला जाग आली ती त्याला लागलेल्या कडाक्याच्या भुकेमुळे. तो उठला खाली आला तर सर्व नोकरमंडळी आपापली कामे करून निघून गेली होती. मोहनने जेवण केले. आता त्याला सकाळचा सगळा प्रकार आठवला. त्याला लक्षात आले कि तो जुन्या पुण्यात गेला होता. पण कधीच्या? मग त्याला आठवले कि कॅलेंडरवर १९७० ची तारीख होती. म्हणूनच आपण १९७० सालच्या पुण्यात गेलो होतो. जिथे सायकली व घोडागाड्या मोठ्या प्रमाणात होत्या. मग हे टाईम मशीन फक्त कॅलेंडर मधल्या काळात जाऊन फक्त पुण्यावरून फिरण्यासाठीच आहे का? असे त्याला वाटू लागले. त्याचे दुसरे मन म्हणू लागले अजून काहीतरी नक्की असणार त्या पेटीमध्ये किंवा त्या मशीनमध्ये जेणेकरून आपल्याला तिथे थांबता येईल.

या विचारात पटकन जेवण आवरून तो खोलीत आला. त्याने पेटीत निट शोधायला सुरुवात केली तर त्याला काही दिसेना. तेवढ्यात त्याच्या लक्षात आले कि पेटीच्या झाकणाला आतल्या बाजूने एक छोटा कप्पा होता. त्याने त्यात हात घालण्याचा प्रयत्न केला परंतु हात त्यामध्ये जाईना. मग त्याने दोन बोट घालून चपापले तर त्याला आता काही कागद असल्याचे

जाणवले. त्याने हळूच बोटाने सरकवत ते कागद बाहेर काढले. एकूण दोन कागदाचे फोटो होते. एक सारसबागेतील तळयातील गणपतीचा फोटो व दुसरा पुण्यातील मंडईचा फोटो होता. हा इथे कशासाठी आहे याचा तो विचार करत बसला. तेवढ्यात त्याच्या लक्षात आले कि हे फोटो कॅलेंडरवरील मोकळया जागेच्या आकाराचे आहेत. म्हणजे ते तिथे लावायचे तर नसतील ना? असा विचार करत त्याने गणपतीचा फोटो त्या मोकळया जागेत लावला. सकाळप्रमाणे त्याने टाईम मशीन चालू केले. दोन वेळेच्या चालू करण्याच्या अनुभवामुळे तो ते मशीन चालू करण्यात सराईत झाला होता. तो आतमध्ये जाऊन त्या टाईम मशीनमध्ये जाऊन उभा राहिला. अंगठीवर प्रकाश पडेल असा उभा राहिला व अंगठीचा कोन नीट केला. तसा मोठा प्रकाश झाला चाके फिरायला लागली. खूप प्रकाश दिसू लागला आणि जसा प्रकाश नाहीसा झाला. तसा त्याला आता शहराऐवजी सारसबागेतील गणपती समोर दिसू लागला. परंतु तरीही त्याला तो उडतो आहे याचाच भास होत होता. त्याला कळेना थांबायचे आणि उतरायचे कसे? त्याने इकडे तिकडे पहिले. त्याला एका बाजूला मोकळी व शांत जागा दिसली. त्याने तिथे एवढी शांतता व कोणीच कसे नाही असा विचार करून लक्ष देऊन पाहिले. तर पुढच्या क्षणी तो तिथे उतरला होता. मग त्याच्या लक्षात आले कि जो फोटो आपण कॅलेंडरवर लावतो तिथे आपण पोह्चतो. तिथे आल्यावर ज्या जागेकडे लक्षपूर्वक पाहतो तिथे आपण उतरतो. आता त्याने आजूबाजूला पाहिले खूप शांतता होती. समोरच्या रस्त्यावर एखाद दुसरी घोडागाडी दिसत होती. काही सायकलींच्या घंटीचा आवाज पार देवळात येत होता. मोहनने गणपतीला नमस्कार करून एक प्रदक्षिणा घातली. पहिल्या अनुभवातून त्याच्या लक्षात आले होते कि अंगठी बोटातून काढल्यावर तो परत त्याच्या काळात जातो. त्यामुळे त्याने एका कोपऱ्यात जाऊन बोटातील अंगठी काढली. त्याबरोबर तो यंत्रात उभा असल्याचे त्याला जाणवले. म्हणजे तो वर्तमानात परतला होता. तो मशीनमधून बाहेर येताच मशीन पुन्हा छोटी झाली. टाईम मशीनमधून आल्यामुळे तो प्रचंड थकला होता. त्यामुळे तो झोपी गेला.

रात्री उशिरा भूक लागल्यामुळे त्याला जाग आली. जेवण करून पुन्हा झोपी गेला. सकाळी सगळे लवकरात लवकर आवरून पुन्हा मशिनकडे आला. खरे तर आज सोमवार होता. त्याला कामावर जावे लागणार होते. उद्या त्याच्या घरातील सगळे परत येणार होते. त्याला माहिती नव्हते कि तो पुन्हा हे मशीन वापरू शकणार आहे कि नाही. मशीनमध्ये एखाद्या काळात जाऊन यायचं म्हटल तरी पूर्ण एक दिवस जात होता. या मशीनबरोबर दिवस घालवण्यासाठी त्याने आज सुट्टी घेतली होती. आता त्याने गणपतीचा फोटो काढून दुसरा लावण्याचा विचार केला. तो फोटो काढताना त्याच्या लक्षात आले कि त्या फोटोच्या मागे एक

बाण होता व त्याच्या टोकाशी मोठा लाल टिपका होता. एखादा फोटो लावल्यावर आपण त्या ठिकाणावर जातो हे आता त्याच्या लक्षात आले होते. परंतु हा बाण व लाल टिपका काय प्रकार आहे हे समजून घेण्यासाठी त्याने तो बाण कॅलेंडरच्या मोकळया जागेत लावायचा ठरवला.

त्याने बाणाच्या फोटो मोकळया जागेत असलेली हुकला लावला. तर तो त्या बाणाची दिशा खालच्या बाजूला झाली आणि लाल ठिपका त्याच्या खालच्या बाजूला आला. त्याचे लक्ष खालील तारखेवर गेले. त्याला वाटले कि आता तारीख बदलून पहावे. म्हणून त्याने सहज वर्ष बदलून १९९५ केले. नंतर त्याने अंगठी घातली मशीनला लावली. मशीन मोठी झाल्यावर आत जाऊन त्याने अंगठीवर प्रकाशाचा झोत पडेल असे पाहिले. अंगठीचा कोन नीट केल्यावर मशीन चालू झाले. प्रचंड प्रकाश पडला. प्रकाश गेला तेंव्हा तो एका बंगल्यावर होता. त्याने बंगल्याबाहेरील मोकळया जागेकडे लक्ष देऊन पाहिल्यावर तो तिथे उतरला. नंतर त्याने थोडे पुढे येऊन बंगल्याकडे पहिले तर तो त्याचाच बंगला होता. तो लहान असताना जसा बंगला होता तसाच होता. कारण ते १९९५ साल होते. त्याचा आताचा बंगला हा ८-१० वर्षापूर्वी रीनोव्हेट करून घेतला होता. त्याच्या लक्षात आले कि जर बाण व लाल ठिपका असणारा फोटो लावला कि जेथे मशीन असेल त्याच ठिकाणी पोहचता येत होते. त्यामुळे त्याने आता परत जायचे ठरवले. अंगठी बोटातून काढल्यावर तो परत आला. थकल्यामुळे तो लगेच झोपी गेला.

आता त्याला कधी मित्रांना किंवा घरातल्या सगळयांना सांगतो असे झाले होते. त्याने एका जवळच्या मित्राला कामावरून सुटल्यावर घरी यायला सांगितले. आणि मोहन परत झोपी गेला. मित्र आल्यावर त्याने मोहनला उठवले. मोहनने त्याला टाईम मशीनबद्दल सांगितले. मित्र मोठ्याने हसू लागला. त्याला मोहनचे म्हणणे पटायला तयार नव्हते. मोहनने त्याला मशीन दाखवायचे ठरवले. मोहनने त्याला ती पेटी दाखवली. त्यातील सगळया वस्तू दाखवल्या. मित्राने मान्य केला कि ह्या त्याच्या आजोबांच्या काळातील वस्तू असू शकतील. परंतु तो ती टाईम मशीन आहे हे मुळीच मान्य करायला तयार नव्हता. मोहनने टाईम मशीन चालू करून दाखवायचे ठरवले. परंतु अंगठी लावली तरी ती मशीन मोठी व्हायला तयार नव्हती. मोहनने ठरवले मित्राच्या बोटात अंगठी बसवून त्याला मशीन वापरायला सांगू. मोहन मित्राच्या बोटात अंगठी घालण्यासाठी मंत्राचा कागद शोधायला सुरुवात केले परंतु तो त्याला सापडायला तयार नव्हता. मित्राने त्याला समजवायला सुरुवात केली कि ते त्याचे स्वप्न होते. मोहनच्या लक्षात आले कि तो कागद नसेल तर कोणालाही त्या टाईम मशीनबद्दल पटवून देणे अवघड आहे. त्यामुळे तो आता गप्प बसला. मोहनचे गप्पपणा पाहून त्याची समजूत काढण्यासाठी मित्र म्हणाला कि जेंव्हा त्याला तो कागद सापडेल तेंव्हा तू मला पुन्हा बोलाव. मित्र निघून गेल्यावर त्याने खूप शोधले,

परंतु त्याला काही केल्या तो कागद मिळेना. त्याने अगदी घरातील कचरा देखील शोधला. परंतु काहीही उपयोग झाला नाही. त्यामुळे त्याने आता अगदी घरच्यांना देखील सांगायचे नाही असे ठरवले. आता ते मशीन त्याच्या पुरतेच राहिले. उद्या सकाळी घरातील सगळे परत येणार असल्याने त्याने ती पेटी आवरून बेडखाली ठेवून दिली.

तरीही सगळ्यापासून ही गोष्ट लपविणे त्याला योग्य वाटत नव्हते. दुसऱ्या दिवशी सगळ्यांशी गप्पा मारताना जेंव्हा त्याच्या वडिलांनी विषय काढला की त्या पेटीचे काय केले. त्याने सांगितली कि त्याने ती उजून तशीच ठेवली आहे. नंतर सहज बोलता बोलता त्याने टाईम मशीन हा विषय काढला आणि विचारले जर आजोबांनी खरोखरच टाईम मशीन शोधले असते तर तुम्ही काय केले असते. तर प्रत्येकाच्या कल्पना भरपूर पैसे जमवणे व जगावर राज्य गाजवणे अशाच थाटाच्या होत्या. त्यामुळे यांना ते सगळे सांगणे म्हणजे नवीन संकट ओढवून घेणे ठरेल. म्हणून त्याने ते आता कोणालाच सांगायचे नाही असे ठरवले.

त्याला टाईम मशीन वापरायची खूप इच्छा व्हायची. परंतु ते टाईम मशीन वापरायचे म्हणजे आरामासाठी कमीत कमी एक दिवस तरी जात होता. एक दिवस सर्वांपासून अज्ञातवासात जाणे अवघड होते. त्यामुळे सगळे घरातून बाहेर जाण्याची वाट पहावी लागायची. असा दिवस त्याला वर्षातून एखाद दुसऱ्या वेळेसच मिळत होता. वेळ मिळेल तेंव्हा तो वेगवेगळया काळात जाऊन येत असत. फक्त त्याला एकच खंत होती ती म्हणजे त्याला हे कोणालाच सांगता येत नव्हते. त्यामुळे ते सगळे त्याच्यापुरतेच गुपित राहत होते. हे सर्व एक गंमत म्हणून चालू होते. यातून कोणाला मदतही होत नव्हती याची मोहनला सगळ्यात जास्त खंत होती.

एक दिवस घरात कोणी नाही हे पाहून मोहनने टाईम मशीन बाहेर काढले. त्याने कॅलेंडरवर साल टाकले ६०० वर्षानंतरचे म्हणजे साधरण २६२३ आणि फोटो लावला बाणाचा. म्हणजे तो पोहोचणार होता ६०० वर्षानंतरच्या त्याच्या घराजवळ. त्याने नेहमीप्रमाणे टाईम मशीन चालू करण्यासाठी जे करावे लागते ते सर्व केले. त्यानंतर तो पोहचला एका बंगल्याजवळ. रस्त्याच्या कडेला कोणी नाही असे पाहून तिथे लक्ष केंद्रित केले आणि मोहन ६०० वर्षानंतरच्या पुण्यात उतरला. त्याने शेजारी पहिले तर खूप वेगळया प्रकारच्या डिझाईनचा असा बंगला तिथे झालेला दिसत होता. एकूणच त्याला सगळीकडे खूप शांतता जाणवत होती. त्याने त्याच्या सवयीप्रमाणे तिथे चालत फिरायला सुरुवात केली. तो वेगवेगळया काळात जाऊन आल्यामुळे उडत्या गाड्या त्याला नवीन नव्हत्या. इथे मात्र त्याला एखाद दुसरी गाडीच हवेतून उडताना दिसत होती. रस्त्याच्या कडेला भरपूर झाडी दिसत होती. बरेच लोकं हे चालताना किंवा

सायकलवर जाताना दिसत होते. ती सकाळची वेळ होती. त्याला जाणवले कि बरेच जण घरातल्या मोकळया जागेत सूर्यनमस्कार घालत आहेत. तर काही ठिकाणी योगासन करणे चालू आहे. काहीजण ध्यानात बसले आहेत. सगळे कसे छान प्रसन्न वाटत होते. मोहनला वाटायला लागले कि तो भविष्याच्या ऐवजी भूतकाळात तर गेला नाही ना?

तेवढ्यात त्याला जाणवले कि प्रत्येकाच्या हातात स्मार्ट बॅण्ड किंवा घड्याळासारखा एक पट्टा होता. सुरुवातीला त्याला वाटले ते घड्याळ असेल. परंतु त्यावरील आकडे काही बदलत नव्हते. क्वचितच कोणाचे तरी आकडे बदलत होते. आणि प्रत्येकाच्या त्या पट्ट्यावर वेगवेगळे आकडे होते. मोहनची खात्री झाली कि हे घड्याळ तर नक्की नाही. मग हे आहे तरी काय? त्याला ते काय आहे व सगळयांनी का घातले आहे हे जाणून घ्यायची इच्छा निर्माण झाली. परंतु विचारणार कोणाला? रस्त्याच्या कडेला एका झाडाखाली एका वयस्कर व्यक्तीला बसलेले पहिले. ते कदाचित आपल्याला माहिती देतील या विचाराने मोहन त्यांच्याकडे गेला. त्यांना विचारले, “काका, एक विचारू का?”

मोहनच्या प्रश्नाने तो माणूस एकदम चकित झाला. त्याने मोहनला डोक्यापासून पायापर्यंत निरखून पाहत विचारले, “इथला दिसत नाहीस? आदिवासी भागातून आलास का?”

मोहनला काय उत्तर द्यावे कळेना, “हो. तुम्ही कसे ओळखलेत?”

“तुझा पोशाख जुन्या पद्धतीचा दिसतो आहे. तुझ्याकडे भाषा अनुवादक यंत्र देखील दिसत नाही.” तरी बरं मोहन जीन पॅन्ट व टी-शर्ट घालून गेला होता. त्याने इकडे तिकडे पहिले. तेंव्हा त्याच्या लक्षात आले कि सगळयांनी साधे, शरीराला लूज असणारे कपडे घातले होते.

मोहनने प्रश्नार्थक नजरेने त्याच्याकडे पाहत विचारले, “भाषा अनुवादक यंत्र?”

त्या वयस्कर व्यक्तीने त्याच्या कानातील छोट्या यंत्राकडे बोट दाखवून त्याला सांगितले, “हे यंत्र दिसत नाही. याला भाषा अनुवादक यंत्र म्हणतात. हे आपल्याशी बोलणाऱ्याची भाषा अनुवादित करून तुम्हाला ऐकवते व ती भाषा तुम्हाला बोलण्यासाठी मदत करते. बरं ठीक आहे. तू म्हणालास कि तू आदिवासी भागातून आला आहेस. म्हणजे असेल काही भाग कि जिथे अजून हे तंत्रज्ञान पोहचले नसेल. विचार काय विचारायचे आहे तुला?”

मोहनने त्यांच्या हातातील आकडे असणाऱ्या त्या काळया पट्ट्याकडे बोट दाखवत विचारले, “हे काय आहे? घड्याळ तर वाटत नाही?”

"बरोबर. हे घड्याळ नाही. हे आहे श्वासयंत्र. तू एकले असेलच श्वासयंत्राबद्दल? तसे हे देशातील सर्व भागात पोहचले आहे. खूप कमी भाग असतील कि जिथे हे अजून पोहचले नसेल."

"श्वासयंत्र ? नक्की काय करते हे?"

त्यांना लक्षात आले कि याला काहीच माहिती नाही. त्यांना मोहनची किव आली. त्यांनी मोहनला शेजारी बसण्यासाठी इशारा केला आणि त्याला समजावून सांगू लागले, "माणसाने खूप प्रगती केली. वेगवेगळे वैद्यकीय उपकरणं, साधनं, उपचार पद्धती शोधल्या, तरीही माणसाच्या आयुष्यमान ठराविक मर्यादेच्या पलीकडे वाढेना. आजारावर उपचार करून बरे केले तरी हृदयविकाराने मारत होती. कितीही प्रयत्न केला तरी हृद्यविकाराने मरणाऱ्याचे प्रमाण काही केल्या कमी नव्हते होते. अगदी लहान वयातल्या मुलांनादेखील हृद्यविकाराचा झटका येऊ लागला. मग शास्त्रज्ञांनी भारतीय अध्यात्म आणि ग्रंथ यांचा आधार घेऊन थोड्या वेगळया पद्धतीने विचार करायला सुरुवात केली. खूप संशोधनानंतर असे लक्षात आले कि माणूस जन्माला येतो तेंव्हा येताना ठराविक प्राणशक्ती घेऊन येतो. त्या मिळालेल्या प्राणशक्तीवरच त्याचे आयुष्य ठरते. ही प्राणशक्ती कोणाला कमी तर कोणाला जास्त का मिळते यावर संशोधन अजून चालू आहे. त्यांना वाटते कदाचित ते पूर्वजन्म अथवा पूर्वकर्मावर अवलंबून असेल. त्यावर अजून संशोधन चालू आहे. परंतु ही प्राणशक्ती मोजायची कशी यावर संशोधन झाल्यावर लक्षात आले ही प्राणशक्ती ही श्वासातील ऑक्सिजनचे ज्वलन करून शरीराला उर्जा देण्यासाठी वापरली जाते. मग प्रत्येक श्वासाला किती प्राणशक्ती वापरली जाते हे शास्त्रज्ञांना कळले. त्यानंतर त्यांनी हे श्वासयंत्र शोधून काढले. हे यंत्र तुमचे किती प्राणशक्ती शिल्लक आहे हे श्वासाच्या संख्येच्या स्वरूपात दाखवते."

"परंतु तुम्ही तर आता श्वास घेत आहात तरी आकडे कमी का होत नाहीत?" त्यांना मध्येच तोडत मोहनने प्रश्न विचारला.

"हे श्वासयंत्र हजारांमध्ये आकडे दाखवतो. हजारापेक्षा कमीचे आकडे पाहण्यासाठी हे निळया रंगाचे बटन दाबून ठेवावे लागते." त्यांनी ते दाबून धरले. त्यानंतर त्या श्वासयंत्रावर तीनच आकडे दिसत होते व प्रत्येक श्वासागणिक आकडा कमी होत होता. नंतर त्यांनी ते बटन सोडले तर पुन्हा न बदलणारे आकडे दिसू लागले.

मोहनने लगेच विचारले, " या यंत्रामुळे काय साध्य झाले?"

"या यंत्रामुळे सगळयांना कळू लागले कि आपले किती आयुष्य म्हणजेच किती श्वास शिल्लक आहेत. त्यामुळे कमीत कमी श्वास घेण्यासाठी श्वासाचे प्रकार व ध्यान करायला सुरुवात झाली. आता लक्षात आले होते कि माणूस मरतो एकतर त्याचा श्वास संपतो तेंव्हा किंवा शरीर नष्ट झाले तर. शरीराला आजार झाला किंवा कोणी शरीराला मारले तर श्वास शिल्लक असला तरी माणूस मरतो. त्यामुळे माणूस जास्त शरीराची व श्वासाची काळजी घ्यायला लागला आहे. सगळेजण जास्त श्वास न वाया घालवता करायचे उत्तम व्यायाम म्हणजे योगप्रकार व सूर्यनमस्कार यावर भर द्यायला लागले. शिवाय मानसिक स्वास्थ्य ढासळू नये म्हणून देखील प्रयत्न करू लागले. रागावणे, ओरडणे, चीड चीड करणे कमी झाले. कारण या सर्व प्रकारात श्वास जास्त खर्च होतात. यामुळे लोकांना आपले श्वासाची चांगली काळजी घेऊ लागला."

मध्येच मोहनने विचारेल, "शरीर सगळे चांगले असेल आणि श्वास संपले तर?"

"जेंव्हा श्वास संपतो म्हणजेच प्राणशक्ती संपते. तेंव्हा ऑक्सिजनचे ज्वलन थांबते व साहजिकच शरीराला मिळणारी उर्जा थांबते. उर्जा न मिळाल्याने सर्वात पहिले बंद पडतो तो रक्ताचा पंप म्हणजे आपले हृदय. तेंव्हाच हृदयविकाराचा झटका येतो. आता त्या व्यक्तीलाही कधी हृदयविकाराचा झटका येणार हे पहिलेच कळल्यामुळे सगळेजण त्या मानसिक तयारीत राहतात. आणि योग्य त्या कौटुंबिक व आर्थिक माहितीची देवाण-घेवाण करतात. त्यामुळे बरेच भविष्यात निर्माण होणारे प्रश्न निकाली लागतात."

"एखाद्याचे शरीर नष्ट झाल्याने त्याचा मृत्यू होत असेल आणि त्याचे मात्र खूप श्वास शिल्लक असतील तर ते दुसऱ्याला देण्यावर संशोधन नाही का झाले?"

"खूप हुशार दिसतोस? झाले त्यावर ही संशोधन झाले आहे. एकमेकांची प्राणशक्ती म्हणजेच श्वास एकमेकांना देता येतात. परंतु बाजारात उपलब्ध असणाऱ्या अशा यंत्रातून फक्त दुसऱ्याकडून श्वास घेण्याची सुविधा आहे. म्हणजे मी हे पिवळे बटन दाबले कि एक छोटी सुई माझ्या शरीरात जाते आणि माझ्या शरीरात दुसऱ्याने दिलेली प्राणशक्ती जाते. परंतु त्यासाठी जो मला प्राणशक्ती देणार आहे त्याचे असे श्वासयंत्र माझ्या श्वासयंत्राला एका विशिष्ठ केबलने जोडावे लागते. शिवाय श्वास देण्यासाठीच्या यंत्राला एक लाल बटन असते. ते दाबले कि त्याची प्राणशक्ती दुसऱ्याकडे जायला सुरुवात होते. परंतु लाल बटण असलेले श्वासयंत्र बाजारात उपलब्ध नाही. त्याच्या विक्रीला कायद्याने बंदी आहे. ते फक्त सरकारच्या नियंत्रणात आहे. कायद्याने परवानगी दिलेली वैद्यकीय स्थिती निर्माण झाली तरच श्वास देवाण घेवाणीला परवानगी आहे. म्हणजे ब्रेनडेड वगैरे... तेदेखील सरकारी अधिकाऱ्यासमोर. जर लाल बटणाचे श्वासयंत्र बाजारात

उपलब्ध झाले तर श्वासाचा काळाबाजार व चोरी करणे सुरु होईल. त्यामुळे एका दृष्टीने ते योग्यच आहे."

मोहनने विचारले, "हे सगळ्या लोकांपर्यंत पोहचले नाही का?"

"तसे पाहिले तर सर्व ठिकाणी पोहचले आहे. राहिला असेल एखाद दुसरा भाग. तुला घ्यायचे असेल तर ते बाजारातून विकत घेता येते."

एक प्रश्न विचारू का नको असे मोहनच्या मनात चालले होते. हे त्या माणसाच्या लक्षात आले, "विचार काय विचारायचे आहे ते?"

"मी तुमचे श्वासयंत्र वापरून माझे किती श्वास शिल्लक आहे हे पाहू शकतो का?"

त्यावर त्या माणसाने त्याच्या हातातील श्वासयंत्र काढून मोहनला दिले, "एक छोटी सुई टोचल्यासारखे होईल पहिल्यांदा."

मोहनने ते श्वासयंत्र घातले व स्वतःच्या हातात घालून चालू केले. लगेच त्याला छोटी सुई टोचल्यासारखे झाले. आणि यंत्राने "३१, ६८, २४" हे आकडे दाखवले. तो माणूस म्हणाला, "तुझे एवढे हजार श्वास शिल्लक आहेत."

मोहनने श्वासयंत्र काढून त्यांना परत दिले. मग त्या माणसाने सांगितले, " साधारणपणे तुझे ३१ वर्ष आयुष्य अजून शिल्लक आहे."

"कसे काय?"

"सर्वसाधारण माणूस दर मिनिटाला १८-२० श्वास घेतो. त्या हिशोबाने अंदाजे १ कोटी श्वास प्रत्येक वर्षाला लागतात. आता तुझ्यावर अवलंबून आहे अजून आयुष्य किती वाढवायचे ते."

"म्हणजे?"

"श्वासावर नियंत्रण मिळवून प्रत्येक मिनिटाला १२ पर्यंत श्वास खाली आणता येतात हे मी स्वतः पाहिलेले आहे. कदाचित त्याच्याही खाली आणता येत असतील परंतु माझ्या माहितीत तरी नाही. मी माझा वेग १५-१६ पर्यंत आणला आहे. जर तू तुझ्या श्वासाचा वेग १६ वर आणलास तर तू तुझे आयुष्य अजून ६ वर्ष वाढवू शकशील"

मोहनला हे सगळे चमत्कारिकच वाटत होते. तेवढ्यात मोहनच्या लक्षात आले कि आपण वेगळया काळात आलो आहोत. त्यामुळे तो लगेच त्यांना म्हणाला, “माहितीच्या ओघात किती वेळ गेला कळलेच नाही. मला निघायला हवे. काका छान माहिती दिलीत. खूप खूप धन्यवाद. निघतो.”

असे म्हणून मोहन ताबडतोब तेथून निघाला व एका कोपऱ्यात जाऊन त्याने अंगठी काढली आणि तो वर्तमानात परतला. खूप थकवा आल्याने तो लगेच झोपी गेला. उठल्यावर मोहनला ६०० वर्षानंतरचे जग व तेंव्हाची प्रगती आठवली. शिवाय आपले स्वतःचे किती श्वास शिल्लक आहे ते कळल्याने आनंद ही झाला. त्याने लगेच घड्याळ लावून एका मिनिटात तो किती श्वास घेतो हे मोजले. तो एका मिनिटाला १९ श्वास घेत होता. आता त्याने ती कमी करण्याचे ठरवले. त्यासाठी ध्यानधारणा व श्वसनप्रकार शिकायचे ठरवले. पहिले तो सूर्यनमस्कार व योगासन करत होता. परंतु सातत्य नव्हते. आता त्याला त्याचे गांभीर्य लक्षात आले होते. त्यामुळे शरीर सुदृढ राहण्यासाठी सूर्यनमस्कार व योगासन नियमित करण्याचे ठरवले. ह्या भविष्यातील भेटीमुळे त्याच्या जीवनपद्धतीत खूप बदल झाला होता.

आता त्याला पुन्हा त्या जगात जायची इच्छा होत होती परंतु त्यासाठी वेळ मिळेनासा झाला. कारण आता मोहनचे लग्न झाले होते. त्याने हे सगळे त्याच्या बायकोला सांगण्याचा प्रयत्न केला तर तिनेही ते सर्व हसण्यावारी नेले. त्यामुळे तिच्याशी देखील आता विषय बोलून उपयोग नव्हता. कारण टाईम मशीन तो कोणाला दाखवू शकत नव्हता. आता बायको तसेच घरातील इतर सर्व बाहेर गेल्याशिवाय मोहनला दुसऱ्या काळात जायला मिळणार नव्हते. तसे होणे खूप अवघड असायचे. बायको माहेरी गेली तरी घरचे असायचे. घरचे बाहेर गेले तरी बायको त्याच्याजवळ असायची. ३-४ वर्षातून एकदा त्याला एखादा दिवस तसा मोकळा मिळत असत. त्यासाठी देखील त्याला बऱ्याच गोष्टी जुळवून आणाव्या लागत असत.

खूप वर्षांनतर असेच एक दिवस मोहन एकटाच घरात होता. त्याने ६०० वर्षानंतरच्या काळात जाऊन यायचे ठरवले. नेहमीप्रमाणे सर्व गोष्टी करून तो त्या ६०० वर्षानंतरच्या काळात गेला. तिथे तो रस्त्यातून फिरत होता. तेंव्हा त्याने पाहिले कि एका बंगल्याच्या गच्चीतून एक ८-१० वर्षाचा मुलगा त्याच्या उडणाऱ्या फ्लोटर वरून उडत पुढे निघाला. मोहन त्याला पाहत चालला होता. मोहनच्या लक्षात आले कि काही अंतर गेल्यावर तो मुलगा वर-खाली हेलकावे खायला लागला आहे. मोहनच्या वाटले कि तो बहुतेक आता खाली पडणार. त्यामुळे मोहन पळत त्याला सावरण्यासाठी गेला. परंतु मोहनने त्याला झेलण्यापुर्वी तो

खाली पडला. मोहन मध्ये गेल्याने तो डोक्यावर आपटता आपटता वाचला होता. परंतु तरीही त्याच्या पायाला चांगलेच लागले होते. त्यामुळे त्या मुलाला उठता येत नव्हते. या सगळयात मोहन देखील खाली पडला व त्याचे कपडे थोडे खराब झाले होते. मोहनने त्या मुलाला उचलले व त्याच्या घरी घेऊन निघाला. त्या मुलाने त्याचे फ्लोटर जाताना हातात घेतले होते. तो मुलगा कुठल्यातरी संस्कृत सदृश्य भाषेत त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न करत होता. मोहन त्याच्याशी मराठीत बोलण्याचा प्रयत्न करत होता. दोघांची भाषा एकमेकांना समजत नव्हती. मोहनच्या लक्षात आले कि त्या मुलाच्या कानात भाषा अनुवादक मशीन नाही त्यामुळे संभाषण होणे अवघड होते. तो तसाच त्याला उचलून त्या मुलाच्या घरी आला.

मोहनने त्या मुलाच्या घराच्या दरवाज्यात जाऊन उभा राहातच. त्या घराचा दरवाजा एका बाईने उघडला. बहुतेक मोहन त्या बंगल्याच्या मुख्य गेटमधून आत येताच घरात बेल वाजली असेल. ती बाई बहुतेक त्या घरातली नोकर असावी कारण तिने त्या मुलाला जखमी अवस्थेत पाहताच आत आवाज दिला. तेवढ्यात दुसरी एक बाई धावत बाहेर आली आणि तिने त्या मुलाला पटकन हातात घेतले आणि मुलाला कुठे कुठे लागले ते नीट पहायला सुरुवात केली. ती बाई बहुतेक त्या मुलाची आई असावी कारण जग कितीही बदलले तरी आई ती आईंच. ती बाहेरील व्हरांड्यातील खुर्चीवर बसली व हातानेच मोहनला देखील बसायचा इशारा केला. तिने मोहनला संस्कृत सदृश्य भाषेत काहीतरी विचारले. मोहनला वाटले काय झाले विचारत असावी. म्हणून त्याने उत्तर दिले, “ तो खाली पडला.” त्यानंतर मुलाच्या आईच्या लक्षात आले कि मोहन मराठीत बोलतो आहे त्यामुळे ती त्याच्याशी मराठीत बोलू लागली. तिने विचारले, “कसा काय पडला?”

“तो तुमच्या घरातून उडाल्यानंतर काही अंतरावरच हेलकावे खायला लागला आणि खाली पडला. मी त्याला झेलण्याचा प्रयत्न केला परंतु थोडक्यात चुकलो.”

त्याच्या आईने नोकराणीला पाणी आणायला सांगितले. पाणी आणताच तिने ते मुलाला पाजले. नोकराणीने मोहनला पाणी दिले. मुलाच्या आईने लगेच तिला डॉक्टराना फोन करून बोलावून घ्यायला सांगितले. काही वेळात डॉक्टर येणार तोपर्यंत किंवा जास्त चौकशी नको म्हणून मोहनने तेथून निघण्याचा निर्णय घेतला. तो म्हणाला, “मी निघतो आता..... माझी कोणीतरी वाट बघत आहे” असे म्हणून मोहन तेथून निघाला. परंतु तेवढ्यात त्या बाईचे त्याच्या हाताकडे लक्ष गेले आणि तिने विचारले, “तुमचे श्वासयंत्र दिसत नाही. पडले कि काय याला पकडण्याच्या गडबडीत?”

आता काय उत्तर द्यायचे हे मोहनला कळेना, “हो, बहुतेक”

थांबा, मी तुम्हाला नवीन श्वास यंत्र आणून द्यायला सांगते. तुमचे पडलेले तिथे मिळेल असे मला वाटत नाही. याचे देखील भाषा अनुवादक यंत्र तिथेच पडलेले दिसते आहे.”

“नको, नको...... मला घाई आहे निघतो मी आता.”

त्यावर त्या बाईने मुलाच्या हातातील श्वासयंत्र काढून मोहनला देत म्हणाली, “याला तरी नाही म्हणू नका....... नाहीतर आमच्यामुळे तुमचे श्वासयंत्र हरवल्याचे आम्हाला वाईट वाटेल. महाग आहे तसे ते.”

“नको, मी शोधतो तिथे जाऊन पुन्हा.”

“नाही मिळणार....... मिळाले तर हे परत आणून द्या. आणि जर याचे भाषा अनुवादक यंत्र मिळाले तर कोणाला गरज असेल तर देऊन टाका किंवा रस्त्यातील एखाद्या दानपेटीत टाका. त्याच्याकडे दुसरे आहे.”

त्या मुलाची आई ऐकायला तयार नव्हती. शेवटी मोहन श्वासयंत्र घेऊन निघाला. जिथे त्याने त्या मुलाला झेलले तिथे तो आला. तिथे थोडे इकडे तिकडे पाहिल्यावर त्याला रस्त्याच्या कडेला त्या मुलाचे भाषा अनुवादक यंत्र मिळाले. मोहनने ते उचलले व ते परत देण्यसाठी त्याच्या घराकडे निघाला. घराजवळ पोहचला तर अजून चार पाच लोकं तिथे आल्याचे त्याला दिसले. कदाचित ते त्या घरचेच सदस्य असावेत. वाचवणाऱ्या माणसाची माहिती का लिहून घेतली नाही असे त्याच्या आईशी बोलत असल्याचे त्याला लक्षात आले. त्यामुळे जास्त चौकशी व संकट नको म्हणून मोहनने तिथे जायचे टाळले. आडोशाला जाऊन अंगठी काढून वर्तमानात परत आला. नेहमीप्रमाणे आल्यावर तो झोपी गेला. उठल्यावर त्याला वाटले श्वासयंत्र व अनुवादक यंत्र दाखवून आपण इतरांना पटवून देऊ कि तो खरोखरच भविष्यात जात आहे. परंतु त्याने पहिले तर श्वासयंत्र व अनुवादक यंत्र काही काम करेना. ते दोन्हीही चालूच व्हायला तयार नव्हते. असे का होते आहे हे त्याला कळेना. पुढच्या वेळेस यासंबधी माहिती काढण्याचे त्याने ठरवले. आता त्याने त्या दोन्ही वस्तू टाईम मशिनच्या पेटीत ठेऊन दिल्या.

काही वर्षानंतर मोहनला पुन्हा त्या काळात जाण्याची संधी मिळाली. तिथे जाताना या वेळेस त्याने बरोबर श्वासयंत्र व अनुवादक यंत्र घेतले होते. जसे तो तिथे पोहचला तसे ते दोन्हीही चालायला लागले. त्याला कळेना नक्की काय झाले? तो रस्त्यातून फेरफटका मारायला

निघाला. रस्त्यात कोणाला तरी याबद्दल विचाराचे त्याने ठरवले. थोडे अंतर गेल्यावर त्याला एक इलेक्ट्रोनिक वस्तूंचे दुकान दिसले. दुकानात कोणीच ग्राहक दिसत नव्हते. त्यामुळे मोहनने त्यालाच विचारायचे ठरवले. तो हळूच दार उघडून आता गेला. आणि त्या दुकानदाराला म्हणाला, " मला श्वासयंत्र व अनुवादक यंत्र याबद्दल एक प्रश्न आहे विचारायचा आहे?"

"बोल."

"माझ्या गावात गेले कि श्वासयंत्र व अनुवादक यंत्र चालत नाहीत."

"इलेक्ट्रिसिटीच्या कार्यालयात जाऊन तक्रार नोंदव ना..... इथे का आलास?"

"म्हणजे...... ?"

त्या माणसाच्या लक्षात आले कि मोहनला काही कळाले नाही.

"तुमच्या भागातील वायरलेस पॉवर गेली असेल. सगळे छोट्या गोष्टी त्या वायरलेस पॉवर वर चालतात ना........ का तेही विसरलास?"

मोहनला कारण लक्षात आले. ही व्यक्ती यापेक्षा जास्त समजावून सांगणार नाही हे ही त्याच्या लक्षात आले. मोहन त्याला धन्यवाद करून बाहेर निघाला. त्या काळामध्ये सगळीकडे वायरलेस पॉवर आहे. ज्यावर सर्व छोट्या गोष्टी चालतात. यावेळेस मात्र मोहनला आजूबाजूला लोकं काय बोलतात हे कळत होते. कारण आता त्याच्याकडे अनुवादक यंत्र होते. त्यानंतर त्याने स्वतःचे शिल्लक राहिलेलं श्वास संख्या तपासली व तो वर्तमानात परत आला.

खूप वर्षानंतर मोहनला पुन्हा टाईम मशीन वापरायला वेळ मिळाली तेंव्हा तो पुन्हा त्या काळात गेला. रस्त्यातून फिरताना त्याच्या लक्षात आले कि एका घरातून सारखे कपडे घातलेले काही जण, कदाचित पोलीस असावेत, एकाला पकडून घेऊन चालले होते. आजूबाजूच्या लोकांच्या बोलण्यातून त्याला कळले कि तो श्वासचोर आहे. काही लोकांनी सरकारी यंत्रणेच्या ताब्यातील श्वास देण्याचे लाल बटन असलेले श्वासयंत्र चोरले होते. तर काहींनी त्याची नकल करून तसेच श्वासयंत्र तयार केले होते. त्याचा उपयोग करून ते लोकांना धमकावून, जबरदस्तीने श्वासाची चोरी करत असत. आणि ते श्वास श्रीमंतांना व गरजवंताना मोठ्या किमतीला विकत असत. सरकार वायरलेस पॉवरच्या माध्यमातून काही माहिती देखील गोळा करत असत. त्यामुळे कोणते श्वासयंत्र कोण वापरते यावर ते नजर ठेवण्याचा प्रयत्न करत होते. परंतु चोरांनी त्यावरही तोड शोधली होती. हे मशीन वायरलेस पॉवर वापरणारच नाही अशी त्यांनी सोय केली होती

किंवा वापरत असेल तर खरी माहिती पाठवणार नाही याची काळजी घेत होते. हे सगळे ऐकून मोहनला धक्काच बसला. शेवटी मनुष्यप्राणीच तो. प्रत्येक गोष्टीत पळवाट शोधत असतोच, मग काळ कुठलाही असो. यानंतर मोहन वर्तमानात परतला. अशा प्रकारे प्रत्येक भेटीत त्याला नवीन माहिती मिळत होती. त्यामुळे त्याला त्या काळात जायला मजा वाटत होती.

काही वर्षानंतर मोहन पुन्हा त्या काळात गेला. रस्त्यात फिरता फिरता तो बराच लांब गेला परंतु त्याला काही नवीन माहिती मिळेना. काही अंतरावर त्याला हवेत बरीच वाहने जाताना दिसली. काही लोकांकडून कळले कि त्या भागात एका मोठ्या व्यक्तीच्या मुलाचे लग्न आहे. त्यामुळे हवेत जरा जास्त वाहनाची वर्दळ होती. म्हणजे त्या काळातही लग्न धुमधडाक्यात होत होते. हवेतील वाहतूक पाहून त्याला गंमत वाटत होती. तो ती पाहत पुढे चालला. तेवढ्यात तिथे हवेत काही तरी अपघात झाला आणि एक माणूस खाली पडला. स्वभावाप्रमाणे मोहन धावत त्याला मदत करायला गेला. मोहनने त्या माणसाला उचलून बाजूला घेतले. तेवढ्यात तिथे पोलीस आले. परंतु तोपर्यंत तो माणूस बेशुद्ध झाला होता. पोलिसांनी त्यांच्याजवळील यंत्राने त्या माणसाला तपासले. ते एकमेकात बोलू लागले कि हा माणूस मरत आहे. त्यामुळे याचे श्वास कोणाला तरी द्यायला हवेत. ते मोहनकडे वळले आणि त्याला म्हणाले, “ याचे श्वास आता तुझ्याकडे घे आणि नंतर चौकीत येऊन परत दे तिथे एखाद्या गरजवंताला देण्याची सोय करता येईल.”

मोहन थोडा गडबडला आणि म्हणाला, “ तुम्ही घ्या ना तुमच्याकडे ट्रान्सफर करून”

“पोलिसांना कोणाचेही श्वास ट्रान्सफर करून घेता येत नाही. तो गुन्हा आहे. त्यामुळे बघू तुझा हात तुझी सगळी माहिती घेतो.” असे म्हणून एका पोलिसाने मोहनचा हात धरला आणि त्याच्याजवळचे एक यंत्र काढून मोहनच्या हाताला लावले. मोहनला एक सुई टोचल्यासारखे झाले. बराच वेळ झाले त्यावर काही येईना.

“काय आहे हे?” असे मोहनने विचारले.

“तुझ्या DNA वरून तुझ्याबद्दलची सर्व माहिती जी सरकारी यंत्रणेमध्ये आहे ती हे यंत्र दाखवते.”

मोहनला माहिती होते कि तो या युगातला नाही त्यामुळे ते यंत्र त्याच्याबद्दल काही दाखवणार नाही. तेवढ्यात त्या यंत्राने दाखवले “unknown person”. ते पोलीस एकदम शंकेने त्याच्याकडे पाहू लागले. एकाने लगेच मोबाईल सारखे यंत्र काढून मोहनचा फोटो काढून घेतला.

मोहनच्या लक्षात आले कि आता काही तरी गडबड होणार. तेवढ्यात तो माणूस दरडावून मोहनला म्हणाला, " काय रे श्वासचोर आहेस ना? श्वास चोरायला आला होतास ना याच्या जवळ लगेच पळत?" असे म्हणत त्या पोलीसाने बंदूक काढतात तसा मागे हात नेला. मोहनला प्रसंगाचे गांभीर्य कळाले. त्याने पोलिसाला जोरात धक्का देऊन पडले आणि पळत पोलिसांच्या गाडीच्या मागे जाऊन बोटातील अंगठी काढली आणि वर्तमानात परत आला. पोलीस स्वतःला सावरून उठून गाडीमागे येईपर्यंत थोडा वेळ गेला. पोलिसांना तो काही दिसेना. त्यांना वाटले उडते बूट घालून तो उडाला असेल. इकडे मोहन खूप घाबरलेल्या अवस्थेत होता. झोपेतून उठल्यावर देखील तो घाबरलेला होता. त्याने आता ठरवले कि पुन्हा कधी त्या काळात जायचे नाही.

परंतु काही दिवसानंतर संधी मिळताच त्याला त्या काळात यायचा मोह आवरला नाही. आल्या आल्या त्याची नजर एका जाहिरातीच्या फलकावर गेली. जाहिरातीत काही श्वासचोरांचे फोटो दाखवले होते. त्यात मोहनचा फोटो दाखवला गेला. त्याच्या लक्षात आले कि मागच्या वेळेच्या घटनेमुळे तो आता या काळात चोर ठरला आहे. त्यामुळे या काळात परत येणे धोक्याचे आहे. त्यामुळे तो परत गेला. आणि या काळात पुन्हा यायचे नाही असे ठरवले.

मोहनचे आयुष्य व काळ पुढे सरकत होता. त्याला मुले झाली. ती मोठी झाली. त्यांची शिक्षण पूर्ण झाली. त्यांची लग्नही झाली होती. एक दिवस हृदय विकाराच्या झटक्याने त्याच्या बायकोचे निधन झाले. आता तसा तो घरात एकटा पडला होता. आता मोहनचे वयही ६० वर्षाच्या आसपास गेले होते. आता मोहनचा मोहनकाका झाले होते. परंतु त्यांच्या बदललेल्या जीवनपद्धतीतील योगासन, सूर्यनमस्कार यामुळे शरीराने ते चांगलेच सुदृढ वाटत होते. परंतु त्यांना स्वतःला माहिती होते कि आता त्यांचे खूप कमी श्वास शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे त्यांना एकदा शेवटचे त्या काळात जायची व किती श्वास शिल्लक राहिले आहेत हे पहायची इच्छा झाली. परंतु घरात नेहमी कोणी तरी असायचेच. त्यामुळे काहीतरी करायला हवे. म्हणून त्यांनी एक बहाणा शोधून काढला. त्यांनी घरातल्या सगळयांना सांगितले कि त्यांनी एक नवीन ध्यानपद्धती शिकली आहे. त्यासाठी त्यांना खोलीत एकटे बसून सराव करायचा आहे. जर ध्यान लागले तर ते एक-एक दिवसाचे ध्यान लागू शकते. त्यामुळे तुम्ही माझ्या खोलीचे दार उघडू नका. सर्वांना पटेल अशा पद्धतीने त्यांनी ते सांगितले. त्यामुळे सगळयांना ते पटले.

मोहनाकाकांनी चालू काळात ६०० वर्ष वाढवून तो काळ निवडला आणि त्या काळात गेले. त्या काळात आल्याआल्या त्यांनी पहिले जाहिरातीचे फलक पाहायला सुरुवात केली. तिथे इतर चोरांचे फोटो झळकत होते. काकांचा फोटो त्यात नव्हता. त्यामुळे काकांना बरे वाटले.

शिवाय काकांच्या चेहऱ्यात मागील ३० वर्षात खूप बदल झाला होता. ते आता बिनधास्तपणे तिथे फिरायला लागले. ते एका निर्मनुष्य रस्त्यातून चालले होते. तेवढ्यात त्यांचे लक्ष रस्त्याच्या दुसऱ्या टोकाकडे गेले. तिथे एक माणूस खाली पडला होता. आणि दुसरा माणूस त्याच्याजवळ बसून काही तरी करत होता. मोहनकाकांना वाटले काहीतरी झाले आहे ते ताबडतोब मदतीसाठी धावले. काका जसे जवळ पोहचले तसे बसलेल्या दुसऱ्या माणसाचे त्यांच्याकडे लक्ष गेले. तो पटकन उठला आणि पळायला लागला. त्या गडबडीत त्याच्या हातातील उडणारा फ्लोटर खाली पडला. परंतु तो उचलेपर्यंत काका फारच जवळ आल्याने तो तसाच पळत निघाला. तेवढ्यात खाली पडलेला माणूस ओरडला, “तो श्वासचोर आहे. त्याने मला जखमी करून व माझे श्वास चोरले आहेत. पकडा त्याला.”

हे ऐकताच मोहनकाका त्याच्या मागे धावले. काही अंतरावर रस्ताच संपत होता. एक उंच भिंत समोर लागली. त्यामुळे तो माणूस सरळ मागे वळला आणि एक धारधार शस्त्र बाहेर काढून मोहनकाकावरच चालून आला. शरीराने मोहनकाका चांगलेच मजबूत होते. ते त्या चोराला न घाबरता सरळ त्याला भिडले. दोघांमध्ये चांगलीच झटापट झाली. शेवटी चोरालाच ती धारधार वस्तू लागली व तो जखमी होऊन खाली पडला. ते पाहून नसती कटकट नको म्हणून मोहनकाका तेथून निघायला लागले. तेवढ्यात त्या चोराने त्यांना आवाज देऊन बोलावून घेतले. ते जवळ आल्यावर त्यांना तो म्हणाला, “ आता पोलीस येतील आणि मला पकडतील. परंतु मला वाटत नाही मी तोपर्यंत जगू शकेन. मी मेलो तर माझ्याजवळील सगळे श्वास वाया जातील. तुम्ही भले माणूस दिसता. कारण मी श्वासचोर आहे हे माहित असूनही तुम्ही माझ्याकडून श्वास मागण्याचा व घेण्याचा प्रयत्न केला नाही. त्यामुळे माझे श्वास वाया जाण्यापेक्षा ते तुम्ही ट्रान्सफर करून घ्या व नंतर पोलिसांना द्या. म्हणजे ते गरज असणाऱ्यांना देतील. किमान माझे थोडे पाप तरी कमी होईल.” असे म्हणून त्याने लाल बटण असलेले श्वासयंत्र बाहेर काढून स्वताच्या हातात घातले. एक वायर काढून त्या श्वासयंत्राला जोडली. मोहनकाका देखील जास्त विचार न करता नकळत त्याच्या जवळ गेले. त्याने ती वायर मोहनकाकांच्या श्वासयंत्राला लावली. आणि त्याने त्याच्या श्वासयंत्राचे लाल बटन दाबले व काकांच्या श्वासयंत्राचे पिवळे बटन दाबले. त्याच्याकडे साधारण एक कोटी श्वास शिल्लक राहिले असताना त्या चोराने पुन्हा लाल बटन दाबले. त्याच्या हातातील लाल बटण असलेले श्वासयंत्र व वायर मोहनकाकांना देत म्हणाला, “जर मी जखमी केलेला तो माणूस जिवंत असेल तर याने त्याचे श्वास त्याला परत द्या.” मोहनकाका ते घेऊन तेथून निघाले. कारण तेथे पोलीस आले तर त्यांना नसत्या चौकशीत

अडकण्याची इच्छा नव्हती. कारण ते या काळातील नसल्यामुळे मागील वेळेप्रमाणे तेच चोर ठरवले जाण्याची शक्यता होती.

मगाशी जिथे तो जखमी माणूस पडला होता तिथे मोहनकाका आले. पाहतात तर तिथे तो माणूस नव्हता. त्यांनी आजूबाजूला विचारले तेंव्हा त्यांना कळले कि अम्बुलंस येऊन त्याला घेऊन गेली आहे. ही चौकशी करताना त्यांच्या लक्षात आले की आजूबाजूचे सगळे त्यांच्या श्वासयंत्राकडे पाहत आहेत. दोन मिनिटे मोहनाकाकाना काही कळले नाही. त्यांनी सहज त्यांच्या श्वासयंत्राकडे पहिले तर ते १८० कोटी पेक्षा जास्त श्वास दाखवत होते. ते पाहून मोहनकाका देखील चमकले. मग त्यांच्या लक्षात आले कि मगाशी चोराने त्याच्याकडील सर्व श्वास त्यांना दिल्यामुळे हा आकडा एवढा झाला आहे. परंतु आजूबाजूचे लोक त्यांनाच चोर समजून त्यांना धमकावू लागले व प्रत्येकाला थोडा थोडा श्वास देण्याचा आग्रह करू लागले. अन्यथा पोलिसांना बोलावून पकडून देऊ असे धमकावू लागले. मोहनकाकांनी लोकांची जबरदस्ती पाहून श्वास देण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांनी लाल बटण असलेले श्वासयंत्र हातात घातले. वायर लावून एकाला श्वास देण्यासाठी त्याच्या श्वासयंत्राला वायरीचे दुसरे टोक जोडले. त्यांनी स्वतःच्या श्वासयंत्राचे लाल बटन दाबले. समोरच्या माणसाच्या श्वासयंत्राचे पिवळे बटन दाबले. परंतु काहीही व्हायला तयार नव्हते. मग त्याने मागे एकांनी सांगितलेली माहिती आठवली कि श्वास ट्रान्स्फर करण्यापूर्वी हे घड्याळ तुमच्या DNA वरून तुमची माहिती सरकारी नोंदीमध्ये तपासते. मोहनकाकांची तर या काळात नोंद असणे शक्य नव्हते. त्यामुळे श्वास ट्रान्स्फर व्हायला तयार नव्हते. त्या लोकांना वाटले श्वास द्यायचे नाही म्हणून ते मुद्दाम काही तरी गडबड करत आहेत. त्या सर्वांनी मोहनकाकांना पकडले व पोलिसाला बोलावण्यासाठी फोन करू लागले. मोहनकाकांनी कसेतरी त्यांना धक्का देऊन तेथून निसटले व पळत सुटले. एका कोपऱ्यावरून वळत असताना बोटातील अंगठी काढली व वर्तमानात परतले. सर्व मागे पळणाऱ्या लोकांना आश्चर्य वाटले कि येवढ्या कमी वेळात चोर कुठे पळाला. त्यामुळे त्यांनी आजूबाजूची घरे शोधायला सुरुवात केली.

इकडे वर्तमान काळात आल्यावर मोहनकाकांनी ठरवले कि पुन्हा त्या काळात कधी जायचे नाही. त्यांच्या तेवढ्यात लक्षात आले कि चोराच्या कृपेने त्याचे आयुष्य किमान १८० वर्षांनी वाढवले होते. आता गरज आहे शरीर तेवढे काळ तंदुरुस्त ठेवण्याची. आता ते जास्त गांभीर्याने खाण्या-पिण्यावर, योगासन, सूर्यनमस्कार व ध्यान यावर लक्ष द्यायला लागले. बघता बघता त्याची शंभरी झाली. तरीही त्यांच्या आयुष्याची वाटचाल चालूच होती. अशाप्रकारे आजोबांच्या टाईम मशिनच्या कृपेमुळे ते ६०० नंतरच्या काळात जाऊ शकले व तेथील

तंत्रज्ञानाच्या जोरावर आज त्यांचा २०० वा वाढदिवस साजरा झाला होता. अजून किमान ४० वर्ष जगतील एवढा श्वास त्यांच्याकडे शिल्लक होता. परंतु ते हे कोणालाही सांगू शकत नव्हते..

दुसऱ्या दिवशी मोहनकाका सकाळी उठले. कालच्या दोनशेव्या वाढदिवस साजरा करण्याच्या धावपळीमुळे त्यांना खूप थकवा आला होता. त्यांचे वय २०० झाले होते आणि अजून ४० वर्ष पुरेल एवढे श्वास शिल्लक असले तरी त्यांचे शरीर थकलेले होते. त्यामुळे त्यांच्या नातवाईकानी त्यांची काळजी घ्यायला बरेच नोकर घरात ठेवलेले होते. मोहनकाकानी थोडे खाल्ले आणि नोकरांना सांगितले, " थोडे थकल्यासारखे वाटते आहे. त्यामुळे मी माझ्या खोलीत आरामाला जात आहे. तरी मला त्रास द्यायला कोणी येऊ नका. तुम्हाला माहितीच आहे माझी झोप सावध आहे आणि झोप मोडली तर लगेच डोक दुखायला सुरुवात होते. त्यामुळे मला काही हवे असेल तर मीच बाहेर येईल. तुम्ही कोणीही दार उघडू नका." एवढे सांगून काका झोपायला गेले. संध्याकाळ झाले तरी दार उघडले नाही. सगळयांना वाटले चांगली झोप लागली असेल. त्यामुळे ते आत गेले नाही. परंतु दुसरा दिवस उजाडला तरी त्यांच्या खोलीचे दार उघडेना. सगळयांना काळजी वाटू लागली. त्यांनी हळूच दर उघडून पहिले तर मोहनकाका त्यांच्या बेडवर शांत पडलेले होते. त्यांचा चेहरा मात्र हसरा होता कुठल्याही वेदनांचा भाव त्यांच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता. त्यांनी ताबडतोब डॉक्टराना बोलावले. त्यांनी आल्यावर तपासले आणि सांगितले कि काल रात्रीच हृदय विकाराच्या झटक्याने मोहनकाकांचे निधन झाले आहे. शिवाय २०० जगल्याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर आहे असे त्यानी सांगितले.

---

मोहनकाका......... हृदयविकाराचा झटका ?.............. कसे शक्य आहे?.......... अजून किमान ४० वर्ष जगतील एवढा श्वास शिल्लक असताना ??

---

१८० कोटी श्वास मिळाल्यानंतर कसे तरी लोकांच्या हातातून निसटून आल्यांनतर त्यांनी पुन्हा त्या काळात जायचे नाही असे ठरवले होते. परंतु जसे त्यांची शंभरी झाली तसे त्यांना

स्वतःबद्दल घृणा वाटू लागली. त्यांना वाटू लागले कि आपण किती स्वार्थी आहोत. आपल्याला पोलीस पकडतील, शिक्षा होईल या भीतीने दुसऱ्या कोणाचे श्वास घेऊन आपण ही शंभरी साजरी करतो आहोत. खरं तर त्या ६०० वर्षानंतरच्या काळाचे हे आपल्यावर उपकार आहेत. ते आपण फेडायलाच हवेत. त्यासाठी त्या काळात जाऊन आपल्याला काही करता येते का ते पाहू आणि काही नाही जमले तर पोलिसांच्या हवाली होऊन आपले राहिलेले श्वास देऊन कोणाचे तरी आयुष्य वाढते का ते पाहू म्हणून त्यांनी त्या काळात जाण्याचा निर्णय घेतला.

मोहनकाकांची शंभरी झाल्यामुळे त्यांची काळजी घेण्यासाठी त्यांच्या नातवंडानी २४ तासासाठी घरात नोकरमाणस ठेवली होते. त्यामुळे टाईम मशीन वापरण्यासाठी त्यांनी दिवसभर ध्यान करणार असलेचा जुनाच बहाणा परत केला. त्यामुळे कोणी त्यांना त्रास द्यायला त्यांच्या खोलीत येणार नव्हते. जवळजवळ ४० वर्षांनतर ते आता पुन्हा त्या काळात चालले होते. परंतु त्यांची श्वाससंख्या पाहून त्यांना चोर ठरवू नये म्हणून त्यांनी दोन्ही श्वासयंत्र खिशात ठेवण्याचे ठरवले होते. नेहमीप्रमाणे आताच्या ६०० वर्ष पुढील साल कॅलेंडरमध्ये टाकून ते भविष्यकाळात गेले. सुरुवातीला वाटले कदाचित त्यांचा फोटो चोर म्हणून जाहिरातीच्या फलकावर दाखवत असतील. खात्री करून घेण्यासाठी त्यांनी थोडा वेळ थांबून जाहिराती पाहिल्या. परंतु इतर बऱ्याच चोरांचे फोटो दाखवले परंतु त्यात त्यांचा नव्हता. त्यामुळे ते आता निर्धास्तपणे फिरायला लागले. रस्त्यातून जाणाऱ्या एकाला त्यांनी विचारले, “असे जाहिरात फलकावर श्वासचोरांचे फोटो दाखवून काही फायदा होतो का?”

“मग दुसरे काय करणार?” त्या माणसाने प्रतिप्रश्न केला.

“तसे नाही. परंतु आता तंत्रज्ञान एवढे पुढे गेले आहे कि त्यांना शोधून काढायला अवघड जायला नको.”

“तुमचे म्हणणे बरोबर आहे. परंतु चोरही तेवढेच हुशार झाले आहेत. ते DNA tracing, CCTV या सर्वांना चकवायला ते शिकले आहेत. त्यामुळे जोपर्यंत त्याच्याबद्दल कोणी खबर देत नाही तोपर्यंत त्यांना पकडता येत नाही.” असे उत्तर देऊन तो माणूस पुढे निघून गेला. कदाचित तो घाईत असावा.

मोहनकाका थोडे पुढे गेले. तेंव्हा त्यांना ATM मशीनसारखे एक मशीन दिसले व त्यावर श्वास दानपेटी असे लिहिलेले होते. त्यांना कळेना हे नक्की काय आहे? त्यांनी रस्तातून

जाणाऱ्या एकाला थांबवले आणि विचारले, " हे काय आहे?" लाल बटनाचे श्वास यंत्र नसताना इथे श्वास देणार कसे?"

त्या माणसाने जरा शंकेने त्यांच्याकडे पाहिले आणि विचारले, "इथले दिसत नाही वाटतं? बाहेरून आला आहात का?"

"हो, आमच्याकडे नाही पाहिले हे." असे काकांनी उत्तर दिले.

"यात श्वास दान करण्यासाठी लाल बटनाचे श्वासयंत्राची गरज नसते. कोणालाही कधीही श्वास दान करता येते. श्वास वाया जाईल असा काही प्रसंग आला तर श्वास वाया जाऊ नये म्हणून सरकारने चौका चौकात अशी दानपेटी बसवली आहे."

"मग यातले श्वास दुसऱ्याला कसे दिले जातात?"

"यातले श्वास हे दररोज रात्री शहराच्या मध्यवर्ती भागात असणाऱ्या वितरण केंद्रात एकत्र केले जाते. दुसऱ्या दिवशी त्याचे वाटप गरजूंना केले जाते."

"माहितीबद्दल खूप खूप धन्यवाद" असे काकांनी म्हंटल्यावर तो माणूस हसत काकांकडे पाहत निघून गेला. काकानाही नवीन माहिती मिळाल्याने बरे वाटले. आणि त्यांनी वर्तमानात परतण्याचा निर्णय घेतला.

टाईम मशीनमधून आल्यांनतर येणाऱ्या थकव्यामुळे त्यांनी ८ तास आराम केला. कारण वय वाढल्याने आराम जास्त लागत होता. उठल्यानंतर टाईम मशीनचे सामान आवरून पेटीत ठेवताना त्यांचे लक्ष कॅलेंडर वरील जागा जिथे ते नेहमी बाण लावत होते तिथे गेले आणि त्यांना एक कल्पना सुचली. आता पुन्हा त्या काळात कधी जातो असे त्यांना झाले होते. परंतु लगेच जाणे योग्य नव्हते. त्यामुळे त्यांनी काही दिवस थांबण्याचे ठरवले. दुसऱ्या दिवशी त्यांनी जास्तच प्रसन्न वाटत असल्याचा आव आणला. त्यामुळे सगळयांना वाटले कि ध्यानामुळे काका ताजेतवाने झाले आहेत. त्यामुळे पुढील वेळेस ध्यानाला जाताना कोणी जास्त चौकशी करणार नाहीत.

साधारणपणे आठवड्यांनंतर त्यांनी परत सांगितले कि ते ध्यानाला बसणार आहेत त्रास देऊ नका. यावेळेस जाताना त्यानी बरोबर मोबाईल बरोबर घेतला होता. ते जेंव्हा ६०० वर्षानंतरच्या काळात पोहचले तेंव्हा ते प्रथम जाहिरातीच्या फालकासमोर येऊन उभे राहिले. आणि वाट पाहू लागले श्वासचोरांचे फोटो दाखवण्याची. पहिल्या चोराचा फोटो दाखवल्या

बरोबर त्यांनी मोबाईलने त्याचा फोटो काढून घेतला. आणि लगेच वर्तमानात परतले. त्यांना पुढे अजून काही तरी काम करायची ठरवलेले होते. परंतु थकव्यामुळे काही शक्य झाले नाही. झोपेतून उठल्यावर त्यांनी एक प्रिंटर आणून द्यायला सांगितला. त्यांच्या नातवांनी नोकरांना काकांना हवे ते आणून द्यायला बजावले होते. त्यामुळे काही कारण न विचारता त्यांना प्रिंटर मिळाला. त्यांनी लगेच त्या चोराच्या फोटोची प्रिंट काढून घेतली.

पुन्हा आठवड्यानंतर त्यांनी ध्यानाचा बहाणा करून टाईम मशीन चालू करण्याचे ठरवले. या वेळेस त्यांनी बाणाच्या जागेवर चोराचा फोटो लावला. आणि तारीख ६०० वर्षानंतरची टाकली. टाईम मशीन त्या काळात गेल्यानंतर प्रकाश गेल्यावर त्यांना त्यांच्या समोर फोटोतील चोर दिसू लागला. काकांनी चोरापासून लांब असे काही अंतरावर पहिले. आणि ते त्या ठिकाणी उतरले. त्यांना चोर समोर दिसत होता. परंतु ते चोराच्या नजरेला पडले नव्हते. त्यांनी पटकन खिशातील मोबाईल पोलिसांना फोन करायला बाहेर काढला. मग त्यांच्या लक्षात आले कि हा मोबाईल या काळात चालणार नाही. पोलिसांना कळवायचा दुसरा काही पर्याय काढला तरि हे ठिकाण कुठले आहे? काय पत्ता द्यायचा त्यांना? आणि आपण पोलीस चौकीत जाऊन सांगायचे तर आपलीही चौकशी होईल. यावर काही तरी पर्याय काढला पाहिजे असा विचार करत ते वर्तमानात परतले.

आता आपण चोरापर्यंत तर पोहचू परंतु नंतर काय करायचे यावर ते आता विचार करू लागले. त्यांच्या लक्षात आले कि त्यांच्याकडे लाल बटन असलेले श्वास यंत्र आहे त्यामुळे चोराकडे आपण भेटू तेंव्हा ते नसले तरी आपण त्याचे श्वास घेऊ शकू आणि जवळच्या श्वास दानपेटीत टाकता येईल. परंतु ते घेण्यासाठी त्याला जखमी करावे लागेल. ते कसे करायचे याचा ते विचार करू लागले. त्यांच्या लक्षात आले कि इलेक्ट्रिक शॉकगन आता सहजपणे बाजारात उपलब्ध आहेत. आणि आता त्याची रेंजदेखील चांगलीच वाढली आहे. त्यामुळे त्यांनी बाजारात जाऊन स्वसंरक्षणासाठी म्हणून एक इलेक्ट्रिक शॉकगन विकत आणली. शॉकगन घेताना चोर किमान तासभर बेशुद्ध अवस्थेत तिथे पडून राहील अशीच शॉकगन त्यांनी निवडली. जेणे करून तेवढ्या वेळात चोराला कोणी तरी पाहिल व पोलिसांना कळवेल. परंतु आता त्यांना दुसरी भीती होती. ती म्हणजे CCTV मध्ये पकडले जाण्याची. कारण तसे झाले तर आपणाला पुन्हा त्या काळात जाता येणार नाही. त्यामुळे त्यांनी एकविसाव्या शतकाच्या शेवटी देखील गाजणाऱ्या क्रिश या सुपरहीरोचे मास्क विकत आणला. परंतु अजून एक अडचण त्यांच्या लक्षात आले ती ही कि चोराकडून घेतलेले श्वास घेऊन श्वास दानपेटीकडे जाताना कदाचित लोकं आपल्यालाच चोर ठरवतील. पूर्ण वेळ मास्क घालून जाणे हे देखील शक्य नाही. शिवाय मोठ्या संख्येने श्वास दान

करताना cctv मध्ये आपला फोटो निघाला तरी आपला शोध सुरु होऊ शकतो. शिवाय जवळची दानपेटी कुठे आहे हेदेखील शोधत बसावे लागेल.

त्यामुळे ते पुन्हा त्या काळात गेले व एक कमी गजबजाट असणारी अशी श्वास दानपेटी शोधली. ती पेटी कशी चालते? व आपल्याला श्वास दान करता येतो का? हे त्यांनी पाहायचे ठरवले. तिथे जाताना त्यांनी साधे श्वास यंत्र हातात घातले. दानपेटी यंत्रावर दिलेल्या सूचनेप्रमाणे त्यांनी त्यांचा श्वासयंत्राचा हात मशीनमध्ये घातला. किबोर्ड वापरून एक कोटी श्वास असे आकडे टाकले. त्यानतर तिथे दाखवल्या प्रमाणे हिरव्या रंगाचे बटन दाबले. त्यानंतर तिथे हिरवा दिवा लागला. त्यांना एक सुई टोचल्यासारखे झाले व काही वेळानंतर तो दिवा लाल झाला. त्यांनी हात बाहेर काढला. त्यांनी त्यांच्या श्वासाची संख्या पहिली तर त्यांची श्वास संख्या एक कोटीने कमी झाली होती. ते श्वास दान करू शकतात हे पाहून त्यांना आनंद झाला. बाहेर येऊन त्यांनी त्या दानपेटीचा अशाप्रकारे फोटो घेतला कि आजूबाजूचा परिसर देखील त्यात दिसेल. जेणेकरून टाईम मशीनवर हा फोटो लावल्यावर आपण इथेच येऊ शकलो पाहिजे. त्यानंतर ते परतले. आता त्यांचा चोर पकडून देण्याचा व श्वास दान करण्याचा पूर्ण प्लान तयार झाला होता.

पुढच्या वेळेस मोहनकाका मास्क घालून बरोबर शॉकगन आणि दोन्ही श्वासयंत्र घेऊन निघाले. त्यांनी कॅलेंडरवर चोराचा फोटो ठेवला. आणि त्यांनी टाईम मशीन चालू केले. ते चोराच्या समोर गेले. योग्य अशी जागा निवडून ते तिथे उतरले. नंतर ते हातात शॉकगन घेऊन त्याच्याकडे चालत निघाले. तो पुरेसा जवळ आल्यावर त्याने पाहण्यापूर्वी काकांनी त्याच्यावर शॉकगन चालवली. तो शॉक लागल्याने बेशुद्ध झाला. काकांनी त्याच्या जवळ जाऊन त्याच्या हातात लाल बटन असणारे श्वासयंत्र घातले व ते वायारिने स्वतःच्या श्वासयंत्राला जोडले. त्याच्याकडे किती श्वास आहेत ते पाहिले. चोराकडे त्यावेळेस २५० कोटीपेक्षा जास्त श्वास होते. मोहनकाकानी त्याला फक्त एक कोटी श्वास ठेवून उरलेले स्वतःकडे ट्रान्सफर करून घेतले. आणि ते वर्तमानात परतले. पुढील फेरीला त्यांनी कॅलेन्डरवर श्वास दानपेटीचा फोटो ठेवला आणि मास्क लावून गेले. चोराकडून घेतलेले श्वास २४९ कोटी श्वास त्यानी दान पेटीत टाकले. आणि परत वर्तमानात परतले. त्याच्या पुढच्या फेरीला त्यांनी पुढच्या चोराचा फोटो काढून आणला.

अशाप्रकारे काकांचा तीन फेऱ्यांचा कार्यक्रम ठरला. पहिल्या फेरीत चोराचा फोटो काढून आणायचा. दुसऱ्या फेरीत चोराला गाठून त्याच्याकडून श्वास काढून घायचे. आणि तिसऱ्या फेरीत चोराकडून घेतलेले श्वास दानपेटीत टाकायचे. मोहनकाकांच्या वयामुळे त्यांना एक चोर

पकडायच्या कार्यक्रमाला साधारणपणे सहा महिने लागत होते. ६०० वर्षानंतरच्या काळातील पोलीस मात्र चक्रावून गेले होते. एक मास्कवाला माणूस येऊन फोटो प्रदर्शित केलेल्या चोराला पकडण्यास मदत करत होता. आणि त्याचे सगळे श्वास एका दानपेटीत आणून टाकत होता. मोठ्या प्रमाणात श्वास दानपेटीत येऊन पडत असल्याने अनेकांना त्याचा उपयोग होत होता. त्यामुळे त्यांनी त्या मास्क घातलेल्या माणसाचा फोटो देखील सगळीकडे प्रदर्शित केला होता. त्याचे आभार मानायला सगळे उत्सुक होते परंतु तो काही कोणाला सापडत नव्हता.

पुढच्या वेळेस जेंव्हा मोहनकाका त्या काळात गेले, तेंव्हा त्यांना जाहिरात फलकावर त्यांचा मास्क घातलेला फोटो दिसला. त्यांच्याविषयी माहिती देणाऱ्यास बक्षीस जाहीर झाले होते. काकांना फिरताना जाणवत होते कि त्याचा तो फोटो दाखवताच लोकं त्याच्याविषयी चांगल्यागप्पा मारत होते. अनेक लोकं त्याचे आभार मानत होते. कारण काकांमुळे दानपेटीत आलेले श्वास त्यांना मिळाले होते. एकदा ते शोधत-शोधत दान केलेले श्वास वाटप करतात तेथे आले. तिथे एका मोठ्या फलकावर उपलब्ध असलेल्या श्वासाची संख्या दाखवत होते. तर तिथे श्वास घेण्यासाठी भली मोठी रांग लागलेली होती. त्यात विशेष करून लहान मुले होती, ज्यांचे श्वास संपत आले होते. काही प्रमाणात घरातील कर्ते पुरुष होते, ज्यांच्यावर घर अवलंबून होते. क्वचितच वृद्ध होते, ज्यांचे एखादे महत्वाचे राष्ट्रहिताचे काम शेवटच्या टप्प्यात आले होते आणि त्यांना ते काम पूर्ण करण्यासाठी अगदी थोडे जीवन हवे होते. आता काकांना बरे वाटू लागले कि त्यांचे ६० वर्षाचे आयुष्य ज्या काळामुळे वाढले होते त्या काळाची ते परतफेड करू शकत होते. त्यांना हेही कळाले कि दानपेटीत पडलेले श्वास शक्य तेवढ्या लवकर वापरावे लागतात. ४८ तासांपेक्षा जास्त काळ ते राहत नाही. अजून एक गोष्ट त्यांच्या लक्षात आले कि बाहेर गावचे लोकही या ठिकाणी श्वास घ्यायला येत होते. कारण काका चोराच्या फोटोवरून तो भारतात कुठेही असला तरी तेथे जाऊन त्याला पकडून त्याचे श्वास घेत असत. परंतु घेतलेले श्वास ते एकाच दानपेटीत टाकत होते. त्यामुळे सर्वात जास्त श्वास इथे उपलब्ध असतात हे लोकांना कळले होते.

काकांनी त्यांचे चोर पकडून द्यायचे सत्र असेच चालू ठेवले. १००-१२० च्या आसपास चोर काकांनी पकडून दिले होते. आता चोरांची संख्या कमी होऊ लागली होती. त्यांना असे कळले कि चोरांनी त्या मास्कवाल्याचा चांगलाच धसका घेतला होता. कारण चोरीच्या नादात स्वताचे श्वास गमवायची चोरांवर वेळ येत होती. त्यांच्या त्या मास्कची आता त्या काळात फॅशन आली होती. लहान मुले त्यांचे मास्क आवडीने घालताना त्यांना दिसत होते.

गेले काही दिवसात चोर संपल्यामुळे त्यांचे फोटो दाखवणे देखील बंद झाले होते. काका फक्त फोटो आहेत का हे पाहण्यासाठी चक्कर मारत होते. गेल्या सहा महिन्यात त्यांनी त्या काळात चक्कर देखील मारली नव्हती. त्यांचा दोनशेवा वाढदिवस साजरा झाल्यावर त्यांना वाटले एवढ्या दिवसात एखादा चोराचा फोटो आला असेल. म्हणून त्या वाढदिवसाच्या समारंभाच्या दुसऱ्या दिवशी काका त्या जगात आले. जाहिरात फलकासमोर बराच वेळ थांबले परंतु एकाही चोराचा फोटो आला नाही. ते श्वास वाटप केंद्राची काय स्थिती आहे हे पाहण्यासाठी तिथे गेले. तर तिथे ८-१० जणांची रांग होती. परंतु तिथे बोर्डवर श्वासांची उपलब्धता शून्य दाखवत होते. तरी ते सर्वजण आशेने रांगेत थांबले होते.

तेवढ्यात त्यांचे लक्ष रांगेत उभ्या असलेल्या एका ८ ते ९ वर्ष वयाच्या मुलाकडे गेले. त्यांना तो चेहरा कुठेतरी पाहिल्या सारखा वाटला. ते जवळ गेले आणि त्यांनी निरखून पहिले. तर तो त्यांच्याच लहानपणासारखा चेहरा होता. ते त्या मुलाच्या जवळ गेले व त्याला विचारले, “ बाळ, तुझे नाव काय?”

“माझे नाव मोहन पेंडसे”

“मोहन?”

“हो मोहन, माझा जन्म झाल्यावर माझे कमी श्वास पाहून माझ्या वडिलांनी माझे नाव मोहन ठेवले. माझे वडील सांगत होते कि त्यांचे खूप मागच्या पिढीत एक आजोबा होऊन गेले, जे दोनशे वर्ष जगले होते. माझे आयुष्यदेखील वाढावे या आशेनी त्यांनी माझे नाव मोहन ठेवले.”

“आता किती श्वास आहेत तुझ्याकडे?”

तेंव्हा तो म्हणाला, “ एखादा महिनाच राहिला आहे. गेले सहा महिने मी आईबरोबर सारखा इथे येतो आहे. परंतु मला श्वास मिळत नाहीत. एकतर बऱ्याच वेळा श्वासाच नसतात. आणि असले तरी संपलेले असतात.”

तेवढ्यात श्वास वाटप केंद्रातून एकजण बाहेर आला व म्हणाला, “ आज येथे श्वास नसल्याने वाटप होणार नाही.” त्यामुळे सगळे जायला निघाले.

“काळजी करू नकोस आज नक्की मिळेल तुला श्वास.” असे म्हणून मोहन काकांनी त्यांच्या नातवाची पापी घेतली आणि गेले. त्यांचे हे बोलणे ऐकूण तो मुलगा तेथेच थांबला.

काकांनी जवळच्या एका माणसाला विचारले, “जवळ श्वास दानपेटी आहे का?”

“या इमारतीच्या मागच्या बाजूला आहे.”

मोहनकाका लगेच इमारतीच्या मागच्या बाजूला गेले. त्यानी श्वास यंत्र लावून श्वास तपासले तर जवळजवळ ९५ कोटी श्वास त्यांच्याकडे होते. ते ती संख्या पाहून चकित झाले. मग त्यांच्या लक्षात आले. कि प्रत्येक चोराच्या एक कोटीपेक्षा लहान श्वाससंख्या ही त्यांच्याकडे साचत गेली होती. त्यांनी २ हजार म्हणजे जेमतेम दोन तास पुरेल एवढेच श्वास स्वतःजवळ ठेऊन उरलेले सगळे दान करून टाकले. आणि इमारतीच्या पुढच्या भागात, जिथे श्वास वाटप होत होते, तिथे आले. त्या छोट्या मोहनची आई त्याला घरी चल म्हणत होती. परंतु एका आजोबांनी त्याला श्वास मिळेल म्हणाल्यामुळे तो घरी जायला तयार नव्हता. तेवढ्यात वाटप केंद्रावर काकांनी दान केलेल्या श्वासाची संख्या उपलब्ध श्वास म्हणून दाखवली. त्यामुळे तो मुलगा पळत तिथे गेला. त्याची तपासणी झाली. तोपर्यंत कोणीही न आल्याने त्याला काकांनी दान केलेले सर्व श्वास मिळाले. तो मुलगा उड्या मारत बाहेर आला. तेंव्हा त्याने त्या आजोबाना पाहिले, ज्यांनी त्याला आज श्वास नक्की मिळेल असे सांगितले होते. तो पळतच आला आणि त्याने निरागसपणे काकांना मिठी मारली आणि म्हणाला, “ आजोबा मला भरपूर श्वास मिळाले. आता मी शंभर वर्ष जगणार....”

काकांनी पुन्हा त्याची पापी घेतली. तेवढ्यात त्या छोट्या मोहनचे लक्ष मोहन काकांच्या अंगठीकडे गेले. तो म्हणाला, “आजोबा, आमच्याकडे एक जुनी पेटी आहेना. त्यातही अगदी अशीच अंगठी आहे.”

काकांच्या लक्षात आले कि ती तीच पेटी आहे जिच्यात टाईम मशीन आहे. त्यांच्या पुढच्या पिढीने ती अजून जपुन ठेवली आहे. परंतु त्यांच्याकडून मंत्राचा कागद हरवल्याने त्या सगळया टाईम मशीनचा काही उपयोग नव्हता. त्यामुळे ते पुटपुटले, “त्याच्याबरोबर मंत्र असता तरच त्याचा उपयोग झाला असता”

छोट्या मोहनने विचारले, “काय? कसला मंत्र? मला काही म्हणालात?”

“काही नाही” असे म्हणत पुन्हा त्या मुलाची पापी घेऊन ते वर्तमानात परतले.

आता त्यांच्याकडे जेमतेम तास-दिडतास शिल्लक होते. त्यामुळे त्यांनी कितीही थकवा आला तरी टाईम मशीन आवरून ठेवायला सुरुवात केली. कारण आता झोपल्यावर ते उठणार

नव्हते. त्यांनी अंगठी, कॅलेंडर जागेवर ठेवले. बाणाचा व मंडईचा फोटो ठेवायला त्यांनी त्या छोट्या कप्प्यात हात घातला. तर त्यांना तिथे कसला तरी कागद लागला त्यानी तो बाहेर काढला तर तो मंत्राचा कागद होता. इतके दिवस ते फोटो कॅलेंडर बरोबरच ठेवत होते. त्यामुळे ह्या काप्प्याकडे कधी त्यांचे लक्षच गेले नव्हते. टाईम मशीन मिळाली त्या दिवशी त्यांच्याकडूनच बहुतेक तो त्या कप्प्यात ठेवला गेला होता. परंतु त्याच्याकडे आता योग्य माणूस शोधून टाईम मशीनबद्दल सांगायला वेळ नव्हता. त्यामुळे त्यांनी फक्त पेटीवर एक कागद लिहून ठेवला." ही पेटी खूप महत्वाची आहे, माझी आठवण म्हणून कायमची जपून ठेवा."

त्यानंतर त्यांना झोप आवरेना. ते झोपायला गेले. टाईम मशीनबद्दल कोणाला सांगू शकले नाही याची खंत होती. परंतु आपले उरलेले आयुष्य आपली नातवाला स्वतः भेटून देऊ शकलो आणि त्याला शतायू करू शकलो याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर होता. त्याच आनंदात ते झोपी गेले कधी ना उठण्यासाठी.

# कथा ३

# नशीब

साधारणपणे सकाळी नऊची वेळ होती. प्रभात रोड तसा अजून शांत होता. रस्त्यावर विशेष रहदारी नव्हती. एखाद दुसरा माणूसच रस्त्यावर दिसत होता. गल्ली क्रमांक दोन जवळील एका बंगल्याच्या बाहेर एक तरुण पडलेला होता. त्याच्या अंगावर काही जखमा दिसत होत्या. त्याचे कपडे धुळीने माखलेले दिसत होते. तोंडावर व कपाळावर काही रक्त साकळलेले दिसत होते. त्याला कोणीतरी चांगलेच मारलेले दिसत होते. ज्या बंगल्याच्या बाहेर तो तरुण पडला होता. त्या बंगल्यात कामाला असणाऱ्या घरकाम करणाऱ्या बाईने रस्त्यात पडलेल्या त्या तरुणाला पाहिले. ती एकदम जोरात ओरडली, “अग बाई! कोणीतरी मरून पडलेले दिसते आहे. बाईसाहेब ............ आपल्या बंगल्याबाहेर कोणीतरी मरून पडलं आहे.”

तिचा हा आवाज ऐकून रस्त्याच्या आजूबाजूचे काही लोक त्या माणसाजवळ गोळा व्हायला लागले. ती ओरडतच बंगल्यात पळाली. त्या कामवाल्या बाईने घरात जाऊन तिच्या मालकीण बाईला बाहेर जखमी अवस्थेत पडलेल्या तरुणाबद्दल सांगितले. त्या बंगल्याच्या मालकिणीने खिडकीतून बाहेर पाहिले तर तिथे काही माणसे गोळा झालेली दिसत होती. ती लगेच बाहेर आली. तिने पाहिले कि बाईने सांगितल्याप्रमाणे तिथे एक तरुण जखमी अवस्थेत पडलेला होता. तो तरुण चांगलाच जखमी झाला होता. तिला त्याची काहीही हालचाल दिसत नव्हती. तिला वाटले कदाचित तो तरुण मेला असेल. तिने पटकन घरात जाऊन डेक्कन पोलीस चौकीला फोन लावला.

पलीकडून आवाज आला, “हॅलो, डेक्कन पोलीस चौकी.”

“सर, मी प्रभात रोडच्या गल्ली क्र. दोन मधून बोलते आहे. आमच्या बंगल्याबाहेर एक तरुण पडलेला आहे. मला वाटत तो मेला आहे. तुम्ही ताबडतोब येता का?”

“केंव्हापासून पडला आहे? कुणी मारलं?”

“साहेब, आम्हाला काहीही माहिती नाही. आम्ही आताच पाहिले आहे. तुम्ही ताबडतोब या.”

“बर.... येतो...... तुमच्या बंगल्याचे नाव काय आहे?”

पोलिसांना तिने तिच्या बंगल्याचे नाव व पत्ता सांगितला. काही वेळातच पोलीस तिथे आले त्यांनी त्या तरुणाला नीट पाहिले. त्यांना लक्षात आले की त्या जखमी अवस्थेत पडलेल्या तरूणाचा श्वास अजून चालू आहे. त्यांनी ताबडतोब ॲम्ब्युलन्स बोलावली. त्यानंतर त्यांनी आजूबाजूला काही पुरावा अथवा काही खुणा मिळताहेत का ते पाहिले. ॲम्ब्युलन्स आल्यावर त्यांनी त्या तरुणाला दवाखान्यात हलविले. तिथे डॉक्टरांनी त्याच्यावर उपचार करायला सुरुवात केली.

पोलिसांनी त्याच्या मोबाईल व खिशातील वस्तूंच्या मदतीने त्या तरुणाची माहिती मिळवायला सुरुवात केली. त्यावरून त्या तरुणाचे नाव आनंद भिसे असल्याचे त्यांना कळाले. आनंदच्या मोबाईलमधून मिळालेल्या मोबाईल क्रमांकावरून पोलिसांनी त्याच्या मित्रांना आनंदची बातमी कळवली. मित्राकडे चौकशी करून पोलिसांनी त्याचे कोणी नातेवाईक आहेत का याचा शोध घ्यायला सुरुवात केली. परंतु त्यांना आनंदच्या नातेवाईकांबद्दल माहिती मिळाली नाही. खूप माहिती काढल्यावर त्यांना असे कळले की तो लहान असताना त्याची आई वारली होती. तेंव्हापासून तो होस्टेलमध्ये राहत होता. त्यांना हे ही कळले कि गेल्याच वर्षी त्याच्या वडिलांचा खून झाला होता. पोलिसांना वाटले त्या खुनाचा आणि आता आनंदवर झालेल्या हल्याचा काहीतरी संबंध असेल. म्हणून त्यांनी त्या केसची माहिती काढली. तेंव्हा त्यांना कळले कि आनंदच्या वडिलांवर हल्ला करणाऱ्या गुंड पकडले गेले आहेत. त्या गुंडांना आता शिक्षाही झाली होती. त्यामुळे त्या प्रकरणाचा आणि या हल्ल्याचा संबंध असण्याची शक्यता खूप कमी होती.

आनंदवर कोणी हल्ला केला असावा याचा शोध पोलीस घेऊ लागले. तो जिथे पडलेला सापडला होता तिथे आजूबाजूच्या लोकांकडे ते चौकशी करू लागले. परंतु त्यांना काहीही उपयुक्त माहिती मिळायला तयार नव्हती. एवढे जबरदस्त मारलेल्या आनंदचा साधा ओरडण्याचा आवाज कोणी ऐकला नव्हता. त्यामुळे पोलिसांना असे वाटू लागले कि कोणीतरी त्याला दुसऱ्या ठिकाणी मारहाण केली असेल व इथे आणून टाकले असावे. कुठून व कसे आणून टाकले हे शोधण्यासाठी पोलिसांनी आजूबाजूच्या रोडवरील सर्व सीसीटीव्ही तपासायला सुरुवात

केली. ते जवळपासच्या बंगल्याचे, हॉटेलचे, ऑफिसेसचे सीसीटीव्ही पाहू लागले. परंतु तेथेही त्यांना काहीही काही विशेष मिळायला तयार नव्हते.

आता त्यांना आनंद शुद्धीवर येण्याची वाट पाहण्याशिवाय पर्याय नव्हता. आनंद शुद्धीवर आल्यावरच खरे काय झाले व कोणी केले हे कळणार होते. तेंव्हाच त्यांना पुढील कारवाई करता येणार होती. आनंदचे काही मित्र बातमी कळताच हॉस्पिटलमध्ये त्याला भेटायला आले होते व आता त्याची काळजी घेत होते. पोलिसांनी त्यांना आनंद शुद्धीवर आल्यावर पोलीस चौकीत कळवायला सांगितले. साधारणपणे दोन ते तीन दिवसानंतर आनंद शुद्धीवर आला. पोलिसांनी सांगितल्यामुळे दवाखान्यातील कर्मचाऱ्यांनी व त्याच्या मित्रांनी ताबडतोब पोलिसांना कळवले. काहीतरी माहिती मिळेल या आशेने पोलीस ताबडतोब आले. त्यांनी डॉक्टरांची परवानगी घेऊन आनंदची चौकशी करायला सुरुवात केली. त्यांनी सुरुवातीला आनंदाला पार्श्वभूमी सांगायला सुरुवात केली, “तीन दिवसांपूर्वी तू काही लोकांना प्रभात रोडच्या गल्ली क्रमांक दोनच्या बाहेर पडलेला मिळाला. तेव्हा तो बेशुद्ध अवस्थेत होता. तुझ्या तेंव्हाच्या अवतारावरुन तुझी कोणाशी तरी मारामारी झाल्याचे दिसत होते. तुला चांगलाच मार लागला होता. त्यामुळे तुला शुद्धीवर यायला दोन-तीन दिवस लागले. अजूनही बऱ्याच जखमां व मुक्का मार दिसतो आहे. तुला कोणी मारले हे तुझ्या लक्षात आहे का? तू कोणाशी मारामारी केली होती का? किंवा तुला मारहाण करून तिथे कोणी आणून टाकले? काही तुला आठवत आहे का?”

“मला तिथे कोणीहि आणून टाकले नाही. मी तिथेच उभा होतो. आणि मला कोणीही मारले नाही.” आनंदने थोडे चिडतच उत्तर दिले.

पोलिसांना काही कळेना कि तो का चिडला. त्यांनी विचारले, “कोणी नाही? म्हणजे? तू मारणाऱ्याना ओळखत नाही का त्यांचे नाव सांगायला घाबरतो आहेस?”

आनंद म्हणाला, “तसे काहीही नाही.”

पोलीस त्याला म्हणाले, “घाबरू नकोस. आम्ही तुझ्या पाठीशी आहोत.”

आनंद एकदम म्हणाला, “तसे नाही हो! मला माझ्या वडीलांनीच मारले आहे. हे आमच्या घरातले भांडण आहे.”

पोलीस, डॉक्टर आणि तेथे असणारे आनंदचे मित्र हे उत्तर ऐकून एकदम चमकले. सगळयांनी एकदम डॉक्टरांकडे पाहिले. डॉक्टरांनी त्यांना बाहेर जाऊन बोलू असा इशारा केला.

पोलीस आणि आनंदचा एक मित्र डॉक्टरांबरोबर बाहेर गेले. पोलिसांनी सांगितल्यामुळे डॉक्टरांना हे माहिती होते कि आनंदच्या वडिलांचा गेल्या वर्षीच खून झाला होता. डॉक्टर पोलिसांना म्हणाले, “साहेब, कदाचित डोक्यावर मार लागल्यामुळे त्याला आता काहीही आठवत नसेल. किंवा त्याच्यावर काही मानसिक परिणाम झाला असेल त्यामुळे तो असा बोलतो असेल.” पोलिसांना देखील तसेच वाटले. त्यांनी डॉक्टरांना व आनंदच्या मित्राला सांगितले, “ जर तुम्हाला त्याच्या बोलण्यातून काहीही वेगळे कळले तर ताबडतोब मला कळवा.” पोलिसाने जाताना त्यांचा मोबाईल नं. त्यांना दिला. पोलिसांनी जाताना पुन्हा एकदा आनंदकडे जाऊन त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला, “जर तुला काही आठवले तर चौकीत येऊन सांग. आपण तुला मारणाऱ्यांना नक्की पकडू. कोणालाही घाबरू नकोस.”

आनंद एकदम जोराने ओरडला, “सांगितले ना तुम्हाला! माझ्या वडिलांनी मला मारले आहे आणि मला याबद्दल पोलिसात कोणतीही तक्रार करायची नाही.” त्याचे हे उत्तर ऐकून पोलिसांना, त्याच्या मित्रांना व डॉक्टरांना त्याची कीव आली. पोलीस आनंदच्या मित्रांना त्याची काळजी घ्यायला सांगुन तिथुन निघुन गेले.

आनंदच्या ह्या उत्तराने त्यांचे तिथे असणारे मित्रही चक्रावून गेले होते. एकतर तो सारखा मेलेल्या वडिलांनी मारले असे म्हणत होता. दुसरे म्हणजे तो वडिलांच्या बाबतीत खूपच सौम्य भाषेत बोलत होता. त्यांनी आनंदला नेहमी वडिलांबद्दल वेडेवाकडे व वाईट बोलताना ऐकले होते. त्यामुळे त्यांनाही हा एक धक्काच होता. वडिलांविषयी नेहमी वाईट बोलणारा आणि कुटुंबसंस्थेवर टीका करणारा असा हा आनंद एकदम एवढा कसा बदलला याचे त्यांनाही आश्चर्य वाटत होते.

**********

आनंद तसा लहान असल्यापासून वसतिगृहात राहत होता. वसतिगृहात राहूनच तो लहानाचा मोठा झाला होता. तो साधारण तिसरी किंवा चौथीत असताना त्याची आई देवाघरी गेली होती. त्यानंतर काही दिवस तो वडिलांबरोबर राहत होता. परंतु एके दिवशी वडिलांनी आनंदला वसतिगृहात ठेवायचा निर्णय घेतला. आणि तेंव्हापासून आनंद वसतीगृहातच रहायला लागला होता. तशी आर्थिकदृष्ट्या आनंदच्या घरची परिस्थिती चांगली होती. आनंदचे वडील

एका महाविद्यालयात प्रोफेसर होते. त्यांचा प्रभात रोडवर गल्ली क्र २ मध्ये एक बंगला होता. तरीही आनंदच्या वडिलांनी त्याला वसतिगृहात ठेवायचा निर्णय घेतला होता. वसतिगृहात असताना त्याला जाणवले की इतरांचे पालक नेहमी काहीतरी निमित्ताने त्यांच्या मुलांना भेटायला येत असत. परंतु त्याचे वडील त्याला वर्षातून दोन-तीन वेळाच भेटायला येत होते. ते आनंदला घरी घेऊन जायला सुद्धा जास्त उत्सुक नसायचे. खुप गरज असेल तेव्हाच ते त्याला घरी घेऊन जात असत. घरी गेल्यावर देखील बऱ्याच वेळा तो घरात एकटाच असत. जसा आनंद मोठा व्हायला लागला तसे त्याला हा फरक जास्त जाणवु लागला होता.

शाळेत असताना मुलांना शाळेत घेऊन येणारे पालक आनंद पाहत होता. त्या पालकांचे त्यांच्या मुलांशी होणारे संवाद तो ऐकत होता. तो मुलांच्या पालकांशी होणाऱ्या गप्पा व मस्ती पाहत होता. त्याला त्या सगळयांचा खुप हेवा वाटत होता. त्याला नेहमी वाटत होते की आपल्याबरोबर आपले बाबा असे का वागत नाही? नंतर नंतर त्याला असे वाटू लागले कि कदाचित वडिलांनी दुसरे लग्न केले असेल आणि त्यामुळे त्यांनी त्याला त्यांच्यापासून लांब ठेवले असेल. असे चित्रविचित्र विचार सारखे त्याच्या मनात येत होते. अशा विचारांमध्येच तो मोठा झाला होता. त्यामुळे ह्या भावना त्याच्या मनात दृढ होत गेल्या होत्या.

आनंदला कधीही पैशाची अथवा वस्तूची कुठलीही कमतरता जाणवली नव्हती. वसतीगृहाच्या संचालकांकडे नेहमी आनंदच्या खर्चासाठी भरपूर पैसे ठेवलेले असत. त्यातून आनंदला त्याच्या गरजेच्या वस्तू लगेच मिळत असत. आनंदला भौतिक सुखाची कधीही कमतरता पडली नाही. परंतु त्याला हवे होते मानसिक सुख. त्याला नेहमी वाटत होते कि कोणीतरी त्याला प्रेमाने जवळ घ्यावे. त्याच्याशी कोणीतरी खूप गप्पा माराव्यात. परंतु त्याला हे काही सुख मिळत नव्हते. त्याला भूक होती ती कुटुंबातल्या माणसाची. परंतु ती गरज काही कोणी पूर्ण करत नव्हते.

आनंद महाविद्यालयात जायला लागला. आता त्याच्या नावावर बँकेत खाते उघडले गेले. त्यात नेहमी त्याच्या खर्चासाठी भरपूर पैसे टाकलेले असत. परंतु रहायला मात्र तो मात्र वसतिगृहातच होता. आता पैसे हातात आल्याने तो त्याची भरपूर उधळपट्टी करू लागला होता. आता बाहेर खाणेपिणे, मित्रांना पार्टी देणे, नवीन कपडे-चपला-बूट इ. वस्तू विकत आणत राहणे, त्यांचा कंटाळा आला की त्या वस्तू कोणालातरी देऊन टाकणे. असे त्याचे जीवन चालले होते. त्यामुळे त्याच्या आजूबाजूला मित्रांचे कोंडाळ गोळा होऊ लागले होते. ते त्याच्याशी गोड बोलत. सतत दिवसरात्र त्याच्याबरोबर कोणीतरी असत. ते त्याची काळजी घेत असत. त्यामुळे आनंदला असे वाटू लागले की पैशाच्या जोरावर हे सर्व सुख मिळाले आहे. पैसे नसते तर हे काही आपल्याला

मिळाले नसते. त्यामुळे पैसा हेच त्याला सर्वकाही वाटू लागले होते. त्याचा कुटुंब, नातेसंबंध व प्रेम यावरचा विश्वास उडू लागला होता. इतरांना देखील तो नेहमी हेच सांगत होता व पटवून द्यायचा प्रयत्न करत असत. त्याच्यासमोर कोणीही आई, वडील, भावा-बहिणीची स्तुति केलेले त्याला आवडत नसे. त्यामुळे मित्रांना देखील त्याचा कुटुंबद्वेष चांगलाच लक्षात येत चालला होता.

आनंद महाविद्यालयात असताना त्याच्या वडिलांनी पुण्यातील घर विकले व ते पुण्याजवळील एका गावात जाऊन राहिले होते. महाविद्यालयीन शिक्षण संपल्यानंतर आपल्या मित्रांच्या आजूबाजूलाच राहता यावे यासाठी आनंदने पुण्यातच एक छोटे घर भाड्याने घेतले आणि तो तिथे राहू लागला. त्याच्या उधळया स्वभावामुळे त्याचे शिक्षण फक्त नावालाच पूर्ण झाले होते. विशेष असे काही प्राविण्य त्याने मिळवले नव्हते. नावाला पदवी व पदव्युत्तर शिक्षण झाले होते. त्यामुळे त्यानंतर काही चांगली नोकरी मिळेल अशी स्थिती नव्हती. या वयातही वडिलांकडून खात्यात पैसे येणे चालूच होते. त्यामुळे त्याच्या दररोजच्या गरजा भागत होत्या. पैशाची कमतरता जाणवत नव्हती. वेळ घालवण्यासाठी आनंदने मित्राबरोबर एक व्यवसाय सुरू केला होता. त्यातही आनंदचा सहभाग हा फक्त पैसा देण्यापुरताच होता.

एके दिवशी अचानक पहाटे चारच्या सुमारास त्याच्या दरवाज्यावर जोरात थाप पडली. एवढ्या पहाटे झोप मोडली म्हणून तो चिडला आणि त्याने जोरात ओरडून विचारले, “कोण आहे? काय पाहिजे?”. परतू बाहेरून त्याला काही उत्तर आले नाही. त्यामुळे तो पुन्हा झोपी गेला. काही वेळाने पुन्हा दरवाज्यावर दोन-तीन थापा पडल्या. सकाळी सकाळी झोप मोडल्याने तो खूप चिडला होता. तो तावातावाने उठून दाराजवळ आला. त्याने दार उघडले. परंतु त्याला दारात कोणीही दिसले नाही. तो पटकन दरवाजा बंद करू लागला. परंतु तेवढ्यात त्याचे लक्ष खाली दारात पडलेल्या एका माणसाकडे गेले. दरवाजाजवळ खाली एक माणूस जखमी अवस्थेत पडलेला होता. आनंदने त्याला उठविण्याचा प्रयत्न केला. तो माणूस आनंदच्या आधाराने कसाबसा उभा राहिला. आनंदच्या लगेच लक्षात आले की ते त्याचे वडील आहेत. वडिलांनी आत येत पटकन दरवाजा लावून घेतला आणि ते पुन्हा बेशुद्ध होऊन खाली पडले.

त्याने पाहिले कि त्यांच्या पाठीवर बरेच रक्त होते. आनंदला खरं त्यांच्याबद्दल मनात खूप राग होता. त्यामुळे काय करावे हे त्याला सुचेना. ते इथे का आले ते तरी विचारू या विचारातच आनंदने ग्लासभर पाणी आणले. आनंदने त्यांच्या तोंडावर थोडे पाणी मारले. त्यानंतर ते शुद्धीवर आले. ते कसेबसे सरकून भिंतीला टेकून बसले. त्यांनी आनंदच्या हातातील पाण्याचा ग्लास घेऊन पाणी पीले. नंतर त्यांनी खिशात हात घालून एक घड्याळासारखी वस्तू बाहेर

काढली. ती आनंदच्या हातात दिली आणि म्हणाले, “आनंद, ही खूप महत्वाची वस्तू आहे जपून ठेव.” आनंदने नीट पाहिले तर ते एक साधे घड्याळ होते. त्यानंतर त्याचे वडील त्याला म्हणाले, “तुझी आई गेल्यानंतर मी तुझ्याकडे लक्ष देवू शकलो नाही. याबद्दल मला क्षमा कर. मला वाटले नव्हते की ही मशीन तयार करण्यासाठी मला एवढी वर्षे लागतील. आता माझ्याकडे खूप कमी वेळ आहे त्यामुळे मी तुला थोडक्यात या विशेष मशीनबद्दल सांगतो. तुझ्या आईशिवाय आपण दोघेदेखील जगू शकत नव्हतो. तुझ्या आईला परत आणण्यासाठी मी ही टाईम मशीन तयार करायचे ठरवले. त्यासाठी मी मला पूर्णपणे झोकून दिले होते. त्यामुळेच मला तुझ्याकडे लक्ष देता आले नाही. काही दिवसापूर्वीच ही टाईम मशीन तयार झाली आहे. माझा डीएनए याचा पासवर्ड आहे. पासवर्ड नसेल तर हे एक साधे घड्याळ आहे. तू माझा मुलगा असल्यामुळे तुझा डीएनए देखील याला चालेल. हे मशीन हातात घालून तू हे ग्रे रंगाचे बटन दाबले कि तुला एक सुई टोचल्या सारखे होईल. तेंव्हा रक्ताचा नमुना घेऊन डीएनए पासवर्डशी जुळतो कि नाही हे तपासले जाते. जर ते जुळले तर हे मशीन टाईम मशीन म्हणून काम करायला लागते. यात एखादि वेळ, दिवस आणि जागेचे अक्षांश आणि रेखांश टाकून हिरव्या रंगाचे बटन दाबले कि ही मशीन तुला त्या काळात व त्या ठिकाणी घेऊन जाते. हे मशीन मोबाईलला जोडून एखाद्या व्यक्तीचा, तो जिवंत असलेल्या काळातील भूतकाळ अथवा भविष्यकाळ पाहता येतो. त्यासाठी तुझ्याकडे फ्रंट कॅमेरा असलेला मोबाईल असावा लागतो. जेंव्हा तू या टाईम मशीनवरील कनेक्ट हे बटन दाबतो. तेंव्हा ते तुझ्या डोळयांचे स्कॅन करते. तसेच ते स्वतःला तुझ्या जवळच्या मोबाईलशी जोडते. त्यानंतर मोबाईलही तुझे डोळे स्कॅन करून घेते. मोबाईलवरील डोळयांचे स्कॅन हे टाईम मशीन वरील डोळयांचे स्कॅनशी जुळल्यानंतर मोबाईलवर टाईम मशीन नावाचे एक ॲप्प लोड होते. ते ॲप्प उघडून त्यात एखाद्या व्यक्तीचा फोटो टाकला व काळ टाकला तर तो त्या व्यक्तीचे त्या काळातील जीवन या स्क्रीनवर दाखवते. परंतू ते फक्त तूच पाहू शकतो. जर मोबाईलसमोर दुसऱ्या कोणाचे डोळे आले तर ते एकदम थांबते.

माझ्या या शोधाची कुणकुण गुन्हेगारी जगतातील काही लोकांना लागली होती. बरेच वर्ष ते मला शोधत होते. त्यांना मला एक मुलगा आहे हे माहिती नाही. नाहीतर ते तुझ्या देखील मागे लागले असते. काल त्यांनी मला शोधून काढले व ते माझ्या मागे लागले आहेत. त्यामुळे मी घरातून पळून लपत फिरतो आहे. काही लोकांनी मला काल रात्री पाहिले व गोळी घातली. कसातरी वाचून मी तुझ्याकडे आलो आहे. आता या टाईम मशीनला तू वाईट लोकांपासून वाचव. मी तुला जास्त वेळ देवू शकलो नाही याबद्दल मला माफ कर. तुला इतरांपासून लपवून ठेवणे हाच माझा यामागचा हेतू होता.”

एवढे बोलून ते पुन्हा बेशुद्ध पडले. आनंदला आता लक्षात आले कि त्याच्या वडिलांना कोणीतरी गोळी घातली आहे. त्यामुळे त्याने ताबडतोब पोलिसांना फोन केला. पोलिसांनी आल्यानंतर अॅम्बुलसला बोलावले. परंतु दवाखान्यात पोहोचण्यापूर्वीच त्याच्या वडिलांचे निधन झाले. त्याला कळायला लागल्यापासून वडील त्याच्याशी पहिल्यांदाच एवढे बोलले होते. त्यांचे हे संशोधन हेच त्याला त्यांच्यापासून लांब ठेवायचे कारण होते हे त्याला कळले होते. आता त्यांच्या बाबतीतला त्याच्या मनातील कडवटपणा या संवादामुळे थोडा कमी झाला होता. वडिलांच्या जाण्याने त्याला दुःख झाले होते. पोलिसांनी सीसीटीव्हीच्या मदतीने त्याचे वडील कुठून आले होते त्या मार्गाचा शोध काढला. त्यावरून त्यांनी त्यांचे खुनी पकडले. परंतु आनंदने पोलिसांना त्यांनी दिलेल्या टाईम मशीनबद्दल सांगितले नव्हते. कारण त्याला स्वतःला त्यावर विश्वास नव्हता.

या सर्वातून सावरल्यानंतर आनंदने वडिलांनी दिलेल्या घड्याळ पाहिले ते खरे आहे का हे त्याला तपासायचे होते. त्याने वडिलांनी दिलेले ते घड्याळ म्हणजेच टाईम मशीन हातात घातले. ते साधारण घड्याळासारखेच दिसत होते. ते वेळ व तारीख दाखवत होते. वडिलांनी सांगितल्याप्रमाणे त्याने ग्रे रंगाचे बटन दाबले, तेंव्हा त्याला त्या घड्याळाखाली सुई टोचल्यासारखे झाले. म्हणजे ते आता त्याच्या रक्ताचा नमुना घेऊन डीएनए तपासत असणार हे आनंदाने ओळखले. काही वेळानंतर त्या घड्याळाच्या स्क्रीनवर “Time Machine is ready to serve” असा मेसेज आला. आता त्याला ते टाईम मशीन असल्याची खात्री झाली. आता त्याला ते टाईम मशीन त्याच्या मोबाईलला जोडून पाहायचे होते. त्याने घड्याळावर असणारे “connect” हे बटन दाबले. त्यानंतर त्या टाईम मशीनवर “Hold your eyes in front of me” असा मेसेज आला. आनंदने डोळे त्या घड्याळासमोर धरले. त्या टाईम मशीनने त्याचे डोळे स्कॅन केले व नंतर मोबाईलवर देखील तसाच मेसेज दिसला. त्याने डोळे मोबाईलसमोर धरले. त्यानंतर मोबाईलने देखील त्याचे डोळे स्कॅन केले. काही वेळानंतर मोबाईल मध्ये एक अॅप्प लोड होत असल्याचे त्याला दिसले. ते अॅप्प पूर्ण लोड झाल्यानंतर मोबाईलवर एक ‘TM’ नावाचा आयकॅान तयार झाल्याचे त्याला दिसला. त्याने तो आयकॅान दाबून टाईम मशीन अॅप्प उघडले. त्याला उत्सुकता होती ती वडिलांना समजून घेण्याची. वडिलांनी त्याला त्याच्यापासून लांब ठेवल्याचे नक्की कारण त्याला जाणून घ्यायचे होते. त्याला वडिलांच्या संबंधित घटना पहायच्या होत्या त्यामुळे त्याने त्या अॅप्पवर वडिलांचा फोटो टाकला. त्याला वसतीगृहात टाकले ते साल त्यावर टाकले.

त्या स्क्रीनवर एकदम जेमतेम सात-आठ वर्षांचा एक लहान मुलगा आणि त्याचे वडील दिसू लागले. आनंदच्या लक्षात आले की तो लहान मुलगा म्हणजे तोच आहे. त्याने त्या स्क्रीनवर पाहिले लहान आनंद व त्याचे वडील मस्ती करत होते, खेळत होते. त्याने त्यावेळेचा वडिलांचा पूर्ण दिनक्रम पहिला. त्याचे वडील त्याचे दात घासत होते. त्याला आंघोळ घालत होते. त्याला गोष्ट सांगून झोपवत होते. त्याला जेवण भरवत होते. त्याला शाळेसाठी तयार करून त्याला शाळेत सोडत होते. अशा प्रकारे आनंदची खूप खूप काळजी घेऊन त्याची सर्व कामे ते करत होते. परंतु आनंदला शाळेत सोडून आल्यावर ते आनंदच्या आईच्या फोटोसमोर बसून रहात असत. ते त्या फोटोशी बोलत बसत असत.

त्याने पाहिले कि असेच एक दिवशी ते आईच्या फोटोशी गप्पा मारत बसले होते. तेंव्हा एक वयस्कर व्यक्ती त्या खोलीत आली. तिने विचारले, “काय रे प्रभाकर! घराचे दार उघडेच होते कि रे! अरे घरात चोर घुसेल अशाने. आतून कडी वगैरे लावून घेत जा.”

त्यांच्या आवाजाने बाबा एकदम दचकून उठले आणि एका खुर्चीकडे हात करत म्हणाले.”राहूनच गेले. बसा ना काका.”

“ते राहू दे. मला आता येताना तुझ्या बोलण्याचा आवाज आला. कोणाशी गप्पा मारत होतास?”

खाली बघत बाबांनी उत्तर दिले, “कोणाशी नाही....”

“मी आलो होतो तेंव्हा तू शोभाच्या फोटोसमोर बसला होतास. तिच्याशी बोलत होतास का?”

“हो..... रिकामा होतो म्हणून सहज गप्पा मारत होतो तिच्याशी”

“हे बघ, मरण काही कोणाला चुकल नाही. आज ना उद्या आपणा सर्वांना मरण येणारच आहे. कोणाच्या जाण्याने आयुष्य काही थांबत नाही. आयुष्य हे पुढे चालूच राहते.”

“बरोबर आहे तुमचे.”

“त्यामुळे मलाही वाटते तुही आता हे सगळे मागे सोडून पुढे जावे.”

“म्हणजे.....”

“तु अजून वयाने बराच लहान आहेस. अजून खूप आयुष्य तुझ्यापुढे शिल्लक आहे. त्यामुळे मला असे वाटते कि तू दुसऱ्या लग्नाचा विचार करावास.”

“खरे सांगू काका. शोभाशिवाय दुसऱ्या कुणाचा मी विचारही करू शकत नाही.”

“अरे परंतु घरात आबाळ होते आहे. घर सांभाळायला कोणी तरी येईल. आनंदची व तुझी काळजी घ्यायला कोणीतरी मिळेल.”

“खरे सांगू काका. मला जास्त आनंदचीच काळजी वाटते. नवीन येणारी बायको कशी असेल काय माहिती. तिने जर आनंदकडे नीट लक्ष दिले नाही तर? मला तिला सोडून देता येईल का?”

“तसे नाही......... असतात काही मुली चांगल्या.”

“काही...... म्हणजे खात्री नाहीच ना? थोडी आबाळ होईल परंतु आनंदची काळजी तरी जमेल तशी घेतली जाईल.”

“बघ बाबा..... पूर्ण विचार कर. नंतर वेळ निघून गेली तर कोणी मुलीही देणार नाही. शांत बसून विचार कर.”

प्रभाकर कडून काहीही उत्तर आले नाही हे पाहून ते म्हणाले, “निघतो मी आता.”

“काका, खूप दिवसानंतर आलात. चहा घ्या ना......... करून आणतो मी.”

“राहू दे..... नंतर कधी तरी.” असे म्हणून ते गृहस्थ उठले व बाहेर निघून गेले. बाबा पुन्हा आईच्या फोटोसमोर जाऊन बसले तेवढ्यात बाहेरून आवाज आला, “आता तरी दार लावून घे रे, प्रभाकर”

“हो” म्हणून बाबा उठले व दार लावायला बाहेर गेले.

आनंद पुढे पाहत होता. त्याला जाणवले येणारे-जाणारे सर्व शेजारी व ओळखीची माणस बाबांना दुसरे लग्न करण्याचा सल्ला देत होते. परंतु त्यांचा प्रश्न एकच असे कि नवीन येणाऱ्या बायकोने आनंदची काळजी घेतली नाही तर पुन्हा मागे जाता येईल का? त्यांच्या या प्रश्नाला कोणाकडे उत्तर नव्हते. सगळेजण त्यांच्या या प्रश्नाने निरुत्तर होत होते. ते सगळे पाहून आनंदला प्रश्न पडला कि माझी एवढी काळजी होती तर वडिलांनी मला वसतिगृहात ठेवताना हा विचार का केला नाही?

आनंदला आता पुढे जाणून घ्यायची फार उत्सुकता निर्माण झाली होती. त्या उत्सुकतेपोटी तो पुढे पहात राहिला. त्याने पाहिले कि त्याचे वडील त्याला अंगाई गाऊन किंवा गोष्ट सांगून झोपवत होते. परंतु आनंदच्या लक्षात आले की छोटा आनंद सारखाच झोपेतून "आई" असे ओरडत उठून बसत असे. तसेच झोपेत तो आईशी गप्पा मारत असत. ते पाहून आनंदचे वडील उठून त्याच्या आईच्या फोटोसमोर बसून रडत असत. सारखे म्हणत असत, "शोभा, तू आम्हाला का सोडून गेलीस? तुझ्याशिवाय आम्ही दोघे कसे जगू?" असे बडबडत ते रात्रभर त्या फोटोसमोर बसून रहात. त्यामुळे त्यांच्या महाविद्यालयात जाण्यावरही परिणाम झाला होता. हे सर्व पाहत असताना आनंदच्या मोबाईलवर त्याच्या वडिलांनी त्याला वसतिगृहात ठेवण्यापूर्वीचा प्रसंग आला.

बाबा त्याला म्हणाले, "आनंद, तुला तुझी आई हवी आहे ना?"

"हो"

"मग बाळा मी आता तृझ्या आईला आणायला जाणार आहे. त्यामुळे तुला काही दिवस वसतीगृहात रहायला जावे लागणार आहे. काही दिवस तिथेच राहावे लागणार आहे."

आनंदने त्यांना विचारले, "परंतु बाबा, सगळेजण असे म्हणतात की आई देवाघरी गेली आहे आणि तिला आता परत आणता येणार नाही."

"मला एका मशीनबद्दल माहिती कळाली आहे. तिला टाईम मशीन असे म्हणतात. मी ती टाईम मशीन तयार करणार आहे. ती तयार झाली की आपल्याला तुझ्या आईला परत आणता येईल."

"ठीक आहे बाबा. जर तुम्ही आईला परत आणणार असाल तर मी कितीही दिवस वसतीगृहात रहायला तयार आहे."

"माझी टाईम मशीन तयार झाली आणि मी तुझ्या आईला परत आणले कि आपण तिघे पुन्हा एकत्र राहू."

आई येणार या आनंदामध्ये छोटा आनंद म्हणाला, "चालेल."

"शहाणा रे माझा बाळ." असे म्हणून बाबांनी त्याची पापी घेतली आणि त्याला वसतिगृहात टाकले.

आनंदच्या लक्षात आले की त्याच्या आईला परत आणण्यासाठी त्याचे बाबा टाईम मशीन तयार करण्याचा प्रयत्न करणार होते. त्या कामात स्वतःला झोकून देण्यासाठी व त्या काळात आनंदची तारांबळ होऊ नये म्हणून त्यांनी त्याला वसतिगृहात ठेवले होते. त्याला हे देखील लक्षात आले कि टाईम मशीनसारखी अशक्य वाटणारी गोष्ट त्यांनी तयारी केली केवळ आईवरील प्रेमापोटी. परंतु या कामात त्यांच्या आयुष्याची कित्येक वर्षे निघून गेली होती. हे सर्व प्रसंग पाहिल्यानंतर आनंदचा वडिलांवरील राग पूर्णपणे निघून गेला होता. आता त्याला वाटू लागले की आपण वडिलांना समजावून घ्यायला हवे होते. त्याने आजुबाजुला पाहीले होते कि जवळच्या माणसाच्या मृत्युनंतर त्याच्या नातेवाईकांचे जीवन अगदी आठ ते दहा दिवसात सुरळीत चालू होते. इथे मात्र जवळपास अठरा वर्ष झाली तरी त्याचे वडील त्या दुःखातून बाहेर आलेले नव्हते. त्याच्यामागे नक्कीच त्यांचे एकमेकांवरील घट्ट प्रेम हे असणार आहे असे त्याला वाटले. त्याने त्याच्या आईवडिलांची माहिती काढायचे ठरवले.

त्याला टाईम मशीन मधून त्यांच्या आयुष्याचे प्रसंग पाहणे शक्य होते. परंतु त्याला त्यांच्या आजूबाजूच्या लोकांकडून ती मिळवणे जास्त योग्य वाटले. वडिलांचे मित्र व सहकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार त्याला कळले की त्याचे वडील म्हणजे प्रभाकर व त्याची आई म्हणजे शोभा यांची एकमेकांशी ओळख महाविद्यालयातील शिक्षण घेत असताना झाली होती. त्याचे वडील प्रचंड हुशार आणि प्रतिभावान विद्यार्थी होते. परंतु त्यांचा जन्म एका खालच्या जातीत झाला होता. त्याची आई त्यांच्याच वर्गात शिकत होती. परंतु तिचा जन्म उच्च जातीत झाला होता. शोभा प्रभाकरच्या हुशारीने खूप प्रभावित झाली होती. त्यामुळे ती प्रभाकराच्या प्रेमात पडली होती. त्यांच्या दोघांच्या घरच्यांचा मात्र या प्रेमाला विरोध होता. परंतु घरच्यांच्या विरोधाला न जुमानता त्या दोघांनी लग्नाचा निर्णय घेतला होता. त्यांना वाटले लग्नानंतर किंवा एखादे मुल झाल्यानंतर सगळे सुरळीत होईल. परंतु दोघांच्या घरच्यांना त्यांचे लग्न मान्य नसल्याने लग्नानंतर त्यांनी दोघांशी पूर्णपणे संबंध तोडले होते. लग्नानंतरच्या प्रत्येक सुख:दु:खाना त्या दोघांनीच तोंड दिले होते. त्यांच्या घरचे कधीही त्यांच्या मदतीला आले नाही. अगदी शोभाचे बाळंतपण देखील प्रभाकरने एकट्याने केले होते. प्रभाकर डेंग्यूच्या तापाने पडून मरणाच्या दारापर्यंत गेला होता तेंव्हाही त्यांच्या नातेवाईकापैकी कोणीहि मदतीला आले नाही. ते दोघेच एकमेकांची काळजी घेत होते. त्यांचा एकमेकांवर प्रचंड विश्वास होता. एकमेकाविरुद्ध तिसऱ्याने कितीही काहीही सांगितले तरी त्यांचा त्यावर विश्वास बसत नव्हता. दोघे नेहमी एकमेकांना एकमेकांच्या कामात मदत करत असत. एकही दिवस एकमेकांशीवाय राहिले नव्हते. प्रभाकर त्याच्या महाविद्यालयाच्या कामानिमित्त बाहेरगावी जात असत. तेंव्हा देखील प्रभाकर

शोभाला बरोबर घेऊन जात असत. अशा प्रकारे ते एकमेकांचे अविभाज्य भाग झाले होते. हे सगळे कळल्यावर आनंदला कळले कि साहजिकच यामुळे ते एकमेकाशिवाय जगू शकत नव्हते. त्यामुळे आईच्या जाण्याने वडिलांची खूप वाईट अवस्था झाली होती हे आनंदाचा लक्षात आले.

हि सगळी माहिती काढताना आनंदला हे देखील कळाले होती कि त्याच्या आईला क्षयरोग झाला होता. त्या काळात क्षयरोगावरील उपचार उपलब्ध नव्हता. शोभा म्हणजेच आनंदाची आई त्यातच गेली होती. आता त्याच्याकडे वडिलांनी दिलेली टाईम मशीन होती. त्या टाईम मशीनच्या मदतीने त्याला आईला भेटायला जायची इच्छा झाली. परंतु त्यासाठी जायचे कुठे? कारण टाईम मशीनमध्ये ज्या ठिकाणी जायचे त्या ठिकाणाचे अक्षांश व रेखांश टाकावे लागतात. आईला भेटायचे म्हणजे त्यांच्या जुन्या घरीच जावे लागेल. त्याला ते घर आठवत होते. कारण तो महाविद्यालयात जायला लागेपर्यंत त्याचे वडील त्याच घरात रहात होते. त्यामुळे आनंद त्यांच्या प्रभात रोडच्या गल्ली क्र. दोन मधील बंगल्याबाहेर गेला. तो बंगला वडिलांनी दुसऱ्यांना विकला होता. त्यामुळे सध्या तिथे दुसरे कुटुंब रहात होते. आपण वेगळया काळात एखाद्या ठिकाणी जाणार म्हणजे अचानक प्रकट होणार. त्यामुळे कोणाला दिसणार नाही अशा ठिकाणी प्रकट झालेले केंव्हाही चांगले. त्यामुळे त्याने त्यांच्या बंगल्याजवळची नेहमी शांत असणारी जागा शोधली. त्या जागेचे अक्षांश आणि रेखांश घेतले आणि तो घरी परतला.

आता त्याच्या हातात सतत वडिलांनी दिलेले टाईम मशीन घातलेली असत. त्याचा उपयोग घड्याळ म्हणूनही होत होता. त्याने त्या टाईम मशीनवर आई वारली त्याच्या साधारणपणे सहा ते सात महिने पहिलेचा दिवस व सकाळची वेळ टाकली. ठिकाणाची माहिती भरताना त्याच्या जुन्या घराजवळील त्याने निवडलेल्या जागेचे अक्षांश आणि रेखांश टाकले. त्याची ही प्रत्यक्ष असे दुसऱ्या काळात जायची पहिलीच वेळ होती. त्यामुळे नक्की काय व कसे होते याची त्याला उत्सुकता होती शिवाय मनात भीती देखील होती. त्या काळात जाण्यासाठी त्याने हिरवे बटण दाबले. एका क्षणासाठी त्याच्या डोळयासमोर अंधार झाला. त्यानंतर त्याने स्वतःला त्याच्या जुन्या घराजवळील त्याने निवडलेल्या जागेत उभा असलेले पाहिले. त्याला खूप आश्चर्य वाटले आणि वडिलांच्या या टाईम मशीन निर्मितीचा अभिमान देखील वाटला. त्यानंतर तो चालत त्यांच्या बंगल्याजवळ आला. त्याने आता घरात जाण्याचे ठरवले. तेवढ्यात त्याच्या त्या बंगल्याच्या दरवाज्यातून एक स्कूटर बाहेर येताना दिसली. त्याने पाहिले ती स्कूटर त्याचे वडील चालवत होते आणि त्यांच्या मागे आई बसलेली होती. त्याला त्या दोघांना पाहून खूप आनंद झाला. त्याने ताबडतोब त्यांना आवाज दिला, " आई...... बाबा....." परंतु त्यांनी त्याच्याकडे लक्ष दिले नाही. मागे बसलेली त्याची आई बाबांना म्हणाली, "कोण आहे? वेडा

दिसतो बहुतेक.....". आनंदने त्यांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला. तेंव्हा त्यांनी गाडी जोरात पुढे नेली. त्याच वेळेस आनंदचे लक्ष त्या दोघांच्या मध्ये बसलेल्या साधारण सात वर्षांच्या मुलाकडे गेले. तो मुलगा दुसरा तिसरा कोणी नव्हता तर लहानपणीचा आनंदच होता. त्याला खूप वेगळेच वाटले. एकाच वेळेस छोटा आनंद व मोठा आनंद समोरासमोर होते. आनंदला लक्षात आले कि त्यांचा आनंद त्यांच्याकडे होता. आणि त्यांना आवाज देणारा हा आनंद एक पंचवीस वर्षांचा तरुण होता. त्यामुळे साहजिकच त्याला कोणी ओळख देणारच नव्हते.

आनंदला पहायचे होते की त्याच्या आईवर क्षयरोगाचे उपचार व्यवस्थितपणे झाले की नाही. जर ते व्यवस्थित झाले नसतील तर ते कश्याप्रकारे व्यवस्थित करता येऊ शकतील याच्यासाठी त्याला प्रयत्न करायचा होता. शक्य असल्यास आईला वर्तमानात घेऊन यायचा त्याचा विचार होता. परंतु त्याला आता त्याच्या टाईम मशीनच्या मर्यादा लक्षात येऊ लागल्या होत्या. तो पंचवीस वर्षाचा तरुण म्हणूनच भूतकाळात जाणार होता. साहजिकच त्यामुळे त्याच्या आई वडिलांसाठी तो एक तिऱ्हाईत मनुष्य असणार होता. त्यामुळे आईला वर्तमानकाळात आणण्यासाठी किंवा तिला मदत करण्यासाठी त्याला तिच्याशी आई या नात्याने बोलून चालणार नाही. तर त्याला तिच्याशी एक नवीन नाते किंवा ओळख निर्माण करावे लागणार होते. त्यामुळे त्याला आता भूतकाळात थांबून काही साध्य होणार नव्हते. म्हणून तो पुन्हा वर्तमानात परतला.

आईला प्रत्यक्ष भेटण्यासाठी तिचा दिनक्रम समजून घेणे गरजेचे होते. त्यामुळे प्रत्यक्ष त्या काळात जाण्यापेक्षा त्या काळातील गतिविधि पाहिल्यानंतर दिनक्रम समजुन घेणे सोपे जाणार होते. परंतु त्याच्याकडे आईचा फोटो नव्हता. त्यामुळे त्याचे बाबा शेवटच्या काळात ज्या घरात रहात होते त्या घरी तो गेला. तिथे त्याला आईचा फोटो मिळाला. त्याने तो फोटो मोबाईलवर घेतला. आता त्याला आईचा दिनक्रम पाहता येणार होता. सगळी कामे आवरून निवांत वेळात त्याने मोबाईलवरील टाईम मशीन ॲप्पवर आईचा फोटो टाकला व तो आईबाबांना बाहेर जाताना पाहून आल्याच्या दिवसाची तारीख व वेळ टाकली. त्याला दिसले घरातून बाहेर पडल्यानंतर त्यांनी आनंद म्हणजे छोट्या आनंदला शाळेत सोडले. त्यानंतर त्यांनी आईला कामावर सोडले. आई एका कार्यालयात कामाला होती. त्यानंतर बाबा स्वतः कामाला गेले. या काळात आई मागे बसू मध्येमध्ये खोकत होती. थोडे फास्ट फोरवर्ड करून त्याने पाहिले तेंव्हा त्याला कळले कि आईचे कार्यालय साधारण सहा वाजता सुटते. कामावरून सुटल्यानंतर आई घरी येताना मात्र बसने घरी आली होती. त्याने पुढचे दोन-तीन दिवस पाहिले तर दिनक्रम हा साधारणपणे असाच होता.

आनंदने बसस्टॉपवर आईशी ओळख करून घ्यायचे ठरवले. त्यासाठी त्याने बसस्टॉपचे ठिकाण नीट पाहिले. आईच्या कार्यालयाची इमारत व कार्यालय निट पाहिले. त्यानंतर त्याने गुगलवर ती इमारत शोधली. ती जागा स्वारगेटजवळ कुठे तरी होती. आनंद शोधत-शोधत त्या जागेजवळ पोहचला. आता त्या ठिकाणी बराच बदल झाला होता. त्याने त्या इमारतीच्या आजूबाजूची अशी जागा शोधली जिथे तो प्रकट झाल्यावर कोणाच्याही लक्षात येणार नाही. त्या जागेचे त्याने अक्षांश आणि रेखांश त्याने गूगल मॅपमध्ये पाहून लिहून घेतले.

त्याने दुसऱ्या दिवशी आईचे कार्यालय सुटायच्या १५ मी. पाहिलेची वेळ व काल जाऊन पाहून आलेल्या जागेचे अक्षांश रेखांश हातातील टाईम मशीनमध्ये टाकले. हिरवे बटन दाबल्यानंतर त्याच्या डोळयासमोर थोडा अंधार झाला व तो त्या काळात व त्या ठिकाणी पोहचला. आता तो आई कार्यालयातून केंव्हा बाहेर येते याची वाट पहात उभा राहिला. नेहमीच्या वेळेला आई कार्यालयाबाहेर आली. तिने रस्ता ओलांडला व ती बसस्टॉपवर जाऊन उभी राहिली. आनंददेखील आईच्या शेजारी जाऊन उभा राहिला. त्याला खूप वाईट वाटत होते. शेजारी आई असूनही त्याला आई म्हणून तिला हाक मारता येत नव्हती. तिच्याशी त्याला आई या नात्याने बोलता येत नव्हते. तो काय विषय काढून आईशी बोलायचे याचा विचार करत होता. तेंव्हा त्याची आई तोंडावर रुमाल ठेऊन खोकली. तोच धागा पकडून आनंदने बोलायला सुरुवात केली, “एक विचारू का? किती दिवस झाले खोकला येतो आहे?”

अनोळखी आवाज असल्याने आईने आनंदकडे पाहिले. व्यवस्थित कपडे घातलेला सुशिक्षित तरुण पाहून आईने उत्तर दिले, “झाले दीड महिना”

“दवाखान्यात दाखवले का? खोकला जास्त दिवस राहिलेला चांगला नसतो.”

“दाखवले आहे. औषधोपचार चालू आहेत.”

“वाईट मानू नका परंतु मला वाटते स्पेशालिस्टला दाखवलेले योग्य होईल.”

“आम्हालाही क्षयरोगाची शक्यता वाटते आहे. त्यामुळे स्पेशालिस्ट डॉक्टरांना दाखवले आहे. परंतु अजून तरी काही बरे वाटत नाही.” तेवढ्यात बस आलेली पाहून आई बोलायची थांबली व बसकडे गेली. त्यामुळे आनंदचे आई बरोबरचे बोलणे अर्धवटच राहिले. परंतु त्याला एक बरे वाटले कि अनोळखी म्हणून का होईना त्याला आईशी बोलता आले होते.

आनंद त्यानंतर कोणी पाहणार नाही अशा जागेवर जाऊन पुन्हा वर्तमानात परतला. आता त्याने क्षयरोगाची व त्यावरील उपचाराची माहिती काढायचे ठरवले. काही मित्रांकडून व त्यांच्या ओळखीच्या डॉक्टरांकडून माहिती काढल्यानंतर त्याला कळाले की आता क्षयरोगावर चांगले उपचार उपलब्ध आहेत. साधारणपणे सहा महिन्यांचा गोळ्यांचा कोर्स असतो. त्या उपचाराने रोग पूर्णपणे बरा होतो. त्याने ठरवले की ही औषधे आईला नेऊन द्यायची. परंतु आईनी ती औषधे घेतली नाही तर? त्यामुळे त्याने औषधे विकत घेण्यापूर्वी आईशी बोलायचे ठरवले.

त्याने दुसऱ्या दिवसाची आईचे कार्यालय सुटायच्या १५ मी. पहिलेची वेळ व कार्यालयाचे अक्षांश रेखांश हातातील टाईम मशीनमध्ये टाकले. आणि तो त्या काळात व त्या ठिकाणी पोहचला. कालप्रमाणे आई बसस्टॉपवर येऊन थांबल्यावर तिच्या शेजारी जाऊन थांबला. त्याने स्वतः आज बोलायला सुरुवात केली, “काल आपले बोलणे अर्धवटच राहिले.”

आईने प्रश्नार्थक नजरेने त्याच्याकडे पाहिले.

आनंद समजून सांगत म्हणाला, “ काल तुम्ही तुमच्या खोकल्याबद्दल सांगत होतात. क्षमा करा... तुम्हाला वाटेल मी तुमची जास्तच चौकशी करतो आहे.”

आई थोडी त्रस्त होत म्हणाली, “नाही... नाही. काही हरकत नाही.”

“माझ्या एका लांबच्या बहिणीला देखील असाच खोकला झाला होता. डॉक्टरांनी तिला क्षयरोग झाल्याचे सांगितले होते.”

आता मात्र आई बोलायला उत्सुक दिसली. तिने विचारले, “आता कशी आहे ती?”

“त्या डॉक्टरांनी तिला साधारणपणे सहा महिन्यांचा औषधाचा कोर्स दिला होता. तिने तो कोर्स पूर्ण केला आणि आता ती पूर्ण बरी झाली आहे.”

“मला त्या डॉक्टरांचा पत्ता देता का?”

“ती नागपूरला असते आणि तिने तिथल्याच एका डॉक्टरांकडून औषधे घेतली होती. ते क्षयरोगाचे स्पेशालिस्ट आहेत.”

“अरे बापरे... नागपूरला ?”

“तुम्हाला चालणार असेल तर मी तुमच्यासाठी ती औषधे मागवतो.”

"ते देतात का तसे?"

"तुम्हाला क्षयरोग झाला आहे असे डॉक्टरांनी नक्की सांगितले असेल तर ते देतात औषधे."

"हो, डॉक्टरांनी तसे सांगितले आहे. परंतु ते म्हणतात कि निश्चित असा उपचार आता उपलब्ध नाही. तुम्ही औषधे मागवली तरी चालेल. किती पैसे लागतील ते मला सांगा म्हणजे मी येताना ते घेऊन येईल."

"ठीक आहे..... आजच मी फोन करुन सांगतो औषधे पाठवायला. तीन ते चार दिवस लागतील यायला."

"चालेल.... काही हरकत नाही. तुम्ही कुठे कामाला आहात? नवीनच दिसता आहात बसस्टॉपवर?"

"दोन दिवसापूर्वीच मागच्या बँकेत नोकरीला लागलो आहे. ओहो........ माझे एक काम करायचे राहिले आहे. उद्या बोलू आपण." एवढे बोलून तो तेथून निघाला. कारण बँकेचे नाव, पद, नाव अशी जास्तीची चौकशी केली तर तर काय उत्तरे देणार असा त्याला प्रश्न पडला होता.

त्यानंतर आनंद ठरलेल्या जागेवर जाऊन वर्तमानात परत आला. तो स्वतःचे मेडिकल असलेल्या त्याच्या एका मित्राकडे गेला. त्याने त्याच्याकडून क्षयरोगाची औषधे विकत घेतली. औषधे नागपूरवरून मागवणार आहे असे सांगितल्यामुळे आता लगेच घेऊन जाणे योग्य दिसणार नाही. त्यामुळे आनंदने चार दिवस थांबायचे ठरवले. खरे म्हणजे तो चार दिवसानंतरची तारीख व वेळ टाकून तो आताच जाऊ शकला असता. परंतु त्याच्या हे लक्षात आले नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर त्याच्या ते लक्षात आले आणि तो स्वतःशीच हसला. त्याने चार दिवसानंतरची तारीख व आईचे कार्यालय सुटायच्या १५ मी. पहिलेची वेळ व कार्यालयाचे अक्षांश व रेखांश हातातील टाईम मशीनमध्ये टाकले. आणि तो त्या काळात व त्या ठिकाणी पोहचला. आता मात्र तो स्वतः पुढे जाऊन बसस्टॉपवर आईची वाट पाहत उभा राहिला. आईदेखील त्या औषधाची वाट पाहत असावी. कारण ती कार्यालयातून सुटल्यानंतर बसस्टॉपवर आली आणि थेट आनंदच्या जवळ आली. येताच तिने विचारले, "दोन-तीन दिवस दिसला नाहीत बसस्टॉपवर?"

"हो.... मला काही दिवसासाठी बँकेच्या दुसऱ्या शाखेत जायला सांगितले आहे."

"मग आज इथे कसे?"

"तुमची औषधे आली आहेत. ती द्यायला आलो आहे."

"अहो कशासाठी एवढा त्रास घेतला?"

"माझ्या घरातच हा रोग झाला असल्यामुळे मला या औषधाचे महत्व चांगलेच माहिती आहे. त्यामुळे मी तुमच्यासाठी आलो आहे असा विचार मुळीच करू नका. मी माझ्या समाधानासाठी इथे आलो आहे." असे म्हणत आनंदने एक औषधाचे पाकीट काढून आईला दिले आणि म्हणाला, " ही घ्या औषधे. यात ती कशी घ्यायचे आहेत हे लिहिलेले आहे."

आईने ती औषधे घेत विचारले, "याचे किती पैसे द्यायचे?"

आनंदची पैसे घ्यायची मुळीच इच्छा नव्हती. परंतु आता आपण आईच्या दृष्टीने अनोळखी व्यक्ती असल्याने त्याने नाईलाजाने सांगितले, "दोनशे रुपये. नंतर दिले तरी चालतील." असे म्हणून तो निघणार होता.

तेवढ्यात आई म्हणाली, " दोनशेच होय? मग आहेत माझ्याकडे. मला वाटले खूप महाग असतील." असे म्हणत तिने पर्स मधून दोनशे रुपये काढून त्याच्या हातात दिले. त्याने नाईलाजाने ते घेतले.

"मला काम आहे. मी निघतो आता. काही फरक पडला कि नाही ते सांगा नंतर"

"नक्की सांगेन." असे म्हणत आई बसकडे निघाली. कारण तिची बस आली होती.

त्यानंतर आनंद ठरलेल्या जागेवर जाऊन वर्तमानात परत आला. त्याला वाटले दिलेले औषध सहा महिने आईने घेतल्यावर ती वाचेल व ती वर्तमानात परत येईल. परंतु तसे काही झाले नाही त्यामुळे त्याला काही कळेना. आपण दिलेल्या औषधांचे नक्की काय झाले असा त्याला प्रश्न पडला होता.

आनंदने पुढे काय झाले हे मोबाईलवरील टाईम मशीन अॅप्पवर पहायला सुरुवात केली. आईने घरी गेल्यानंतर आणलेली औषधे बाबांना दाखवली. बाबांनी त्यावरील सर्व माहिती वाचली आणि आईला ती औषधे घ्यायला परवानगी दिली. आईने नियमितपणे औषध घ्यायला सुरुवात केली. हळूहळू तिच्या तब्येतीत सुधारणा होत होती. आनंदने थोड्या वेगाने म्हणजे फास्ट फोरवर्ड करून पहायला सुरुवात केली. नेहमीप्रमाणे दिनक्रम सुरळीत चालू होता. एकदम

मोबाईलच्या स्क्रीनवर अंधार झाला. आनंदला एकदम वडिलांचे बोलणे आठवले. ते म्हणाले होते कि जर ती व्यक्ती त्या काळात जिवंत असेल तरच तिचा भूतकाळ किंवा भविष्यकाळ दिसतो. स्क्रिनवर अंधार पाहून त्याला वाटले त्या वेळेला आई जिवंत नाही. त्याने लगेच थोडे मागे जावून त्या दिवशी काय झाले ते पहायला सुरुवात केली.

तो सुट्टीचा दिवस होता. त्यामुळे नेहमीच्या दिनक्रमाप्रमाणे आई व बाबा घराबाहेर पडले नव्हते. साधारणपणे सकाळी दहा वाजण्याच्या आसपास आई घरातून एकटीच बाहेर पडली. मुख्य रोडला आल्यांनतर तिने रिक्षा पकडली आणि ती रिक्षाने जिमखान्याजवळ आली. तिथे तिने भाजीवाल्यांकडून भाजी खरेदी केली. नंतर ती रस्ता ओलांडून रस्त्याच्या पलीकडे चालली होती. ती पलीकडच्या फुटपाथवर चढणार तेवढ्यात एक चारचाकी गाडी भरधाव वेगाने आली आणि फुटपाथ वर चढताना दिसली. ती गाडी आईचा जवळ आली आणि मोबाईलवरचे चित्र गेले. ते पाहुन आनंद खूप घाबरला. त्याच्या लक्षात आले वेगाने आलेल्या त्या चारचाकी गाडीने आईला उडवले व त्यात आई गेली. त्याने औषधे पोहचवून क्षयरोग पासून वाचवण्याचा प्रयत्न केला होता. परंतु पूर्ण बरी होण्यापूर्वी त्या गाडीने आईला उडविल्यामुळे आई गेली होती. त्यामुळे ती वर्तमानात परतली नव्हती.

आता आनंदने पुन्हा आईला तिथे जाऊन वाचवायचे ठरवले. त्याने ते दृश्य पुन्हा पुन्हा पाहून ते दृश्य नक्की कोणत्या ठिकाणाचे आहे हे समजून घेतले. त्यानंतर तो त्या ठिकाणी गेला. तिथे त्याला प्रकट होता येईल असे जवळपासचे ठिकाण त्याने शोधले. त्याने त्या ठिकाणाचे अक्षांश आणि रेखांश घेऊन तो घरी आला. आता तो पुन्हा आईला वाचवायला जायला सज्ज झाला.

टाईम मशीनवर त्याने अपघात व्हायच्या बरोबर अर्धा तास आधीची वेळ टाकली आणि त्याने निवडलेल्या ठिकाणाचे अक्षांश व रेखांश टाकले. हिरवे बटन दाबताच तो त्या ठिकाणी पोहोचला आता. त्यानंतर तो चालत आईने अपघातापुर्वी जेथून रस्ता ओलांडला त्या ठिकाणाच्या जवळ येऊन थांबला. तो तिथे आई यायची वाट पहात उभा राहिला. जेव्हा त्याला आई दिसली तेव्हा तो तिच्याजवळ गेला आणि म्हणाला, “आई कशी आहेस?” मध्येच थांबून त्याने जीभ चावली व तो म्हणाला, “कशा आहात?”

आई म्हणाली, “तुम्ही दिसला नाहीत बरेच दिवस बसस्टॉपवर.”

“आता माझी बदली आमच्या बँकेच्या दुसऱ्या शाखेमध्ये मध्ये झाली आहे. त्यामुळे तिकडे येण्याचा संबंध येत नाही.”

“आमच्या घरी कधी येता आहात? आमच्या ह्यांनी बोलावले आहे तुम्हाला भेटायला.”

“नक्की येईन. औषध काय म्हणतायेत? चालू आहेत ना?”

“हो... अगदी नियमित चालू आहेत”

“काही फरक जाणवतो आहे का?”

“बराच फरक जाणवतो आहे”

आनंद जाणून बुजुन बोलण्यात वेळ घालवत होता परंतु त्याची आई बोलता बोलता रस्ता क्रॉस करायला लागली होती. तेवढ्यात एक चारचाकी गाडी भरधाव वेगाने आली. आनंदाने ताबडतोब आईला धरून बाजूला सरकवले. ती गाडी आईच्या अगदी जवळून फुटपाथ वर चढली व दोन जणांना उडवून एका खांबाला धडक देऊन थांबली. ते पाहून आनंदची आई प्रचंड घाबरली. तिच्या श्वासाचा वेग भीतीमुळे खूप वाढला. तिच्या छातीत धडधड व्हायला लागले. मरण डोळयासमोरून जाताना पाहिल्याने ती पटकन आहे तिथेच खाली बसली. आनंदने तिला धरून बाजूला बसवले. तोपर्यंत आजूबाजूचे लोक तिथे जमा झाले होते. आनंदने एकाकडून पाणी घेऊन आईला पाजले. थोड्या वेळानंतर आई शांत झाली होती. ज्या दोघांना गाडीने उडवले होते त्यांना बऱ्यापैकी लागले होते. काही वेळातच तिथे पोलिस आले. त्यांनी अम्बुलंस बोलावून जखमींना दवाखान्यात हलवले. त्याने तिथे असणाऱ्या लोकांकडे थोडी चौकशी केली. काय झाले? कसे झाले? हे विचारून नोंद करून घेतली. त्यानंतर आनंदने आईला विचारले, “चला मी तुम्हाला घरी सोडतो.”

“नको, मी जाते. मला फक्त रिक्षा करून दिली तर बरे होईल.”

त्यानंतर आनंदने एका रिक्षाला हात दाखवून ती थांबवली. त्यात त्याने आईला बसवले. आईची रिक्षा निघून गेल्यानंतर आनंद त्याने प्रकट होण्यासाठी निवडलेल्या ठिकाणी आला आणि वर्तमानात परतला. त्याने आईला वाचवले याचा त्याला आनंद झाला होता. शिवाय पुन्हा एकदा आईला भेटल्याचा आनंदही त्याला झाला होता.

आता आईला अपघातातून वाचवल्यामुळे आता तरी आई आपल्याबरोबर वर्तमानात असेल अथवा येईल अशी त्याला आशा होती. परंतु तसे काहीच झाले नाही. त्यामुळे तो विचार करत बसला. त्याला काही कळेना त्याने आईसाठी क्षयरोगाची औषधे दिली. आईला एका अपघातातून वाचविले तरीही ती वर्तमानात आली नव्हती. आनंदाने मोबाईलवर

अपघातानंतरचा भूतकाळ पहायचे ठरवले. त्यासाठी त्याने मोबाईलच्या टाईम मशीन अॅपवर आईचा फोटो घेतला व अपघातानंतरचा दिवस टाकला. परंतु त्याला काहीही दिसायला तयार नव्हते. दोन मिनिटे तो चक्रावून गेला. मग त्याच्या लक्षात आले त्याच्या हातात टाईम मशीन नव्हते.

त्याने ताबडतोब हातात टाईम मशीन घातले. टाईम मशीन मोडमध्ये जाण्यासाठी त्याने ग्रे रंगाचे बटन दाबले. त्याबरोबर त्याला सुई टोचल्यासारखे झाले. त्याचा डीएनए जुळवून झाल्यांनतर ते टाईम मशीन मोबाईलला जोडले गेले. त्याने पुन्हा एकदा आईचा फोटो व अपघाताच्या दुसऱ्या दिवसाची तारीख टाकली. आता अपघातानंतरचा दुसरा दिवस दिसू लागला. त्यात त्याला विशेष काही दिसत नव्हते. नेहमीप्रमाणे ऑफिसला जाणे व घरी येणे चालू होते. त्यामुळे त्याने पुन्हा वेगाने काळ पुढे सरकवत पहायला सुरुवात केली. पाहता पाहता एकदम पुन्हा अंधार झाला. त्याला लगेच लक्षात आले कि पुन्हा काही तरी झाले आहे. त्याने लगेच काळ वाढविणे थांबवले आणि थोडे मागे जाऊन हळूहळू पाहू लागला. तर तो दिवस आई वारली त्याच्या साधारण साडेतीन महिने अगोदरचा होता. त्याने तो दिवस नीट पहायला सुरुवात केली. नेहमीप्रमाणे आई आणि वडील छोट्या आनंदला घेऊन घरातून निघाले. त्यांनी त्याला शाळेत सोडले. नंतर बाबांनी आईला कामावर सोडल्याचे दिसत होते. दुपारनंतर आईच्या कार्यालयाच्या भागात जोरदार पाऊस सुरु झाला होता. हळूहळू पावसाने चांगलाच जोर धरला होता. रस्त्यावर पाणी साठू लागल्यामुळे बसेस कमी वेगाने धावत होत्या. बसला यायला वेळ लागत असल्याने बसस्टॉपवर बरीच गर्दी झाली होती. पाऊस थांबायची वाट बघत आई कार्यालयातच थांबली होती. शेवटी साधारणपणे साडेसहा वाजता ती ऑफिसमधून बाहेर आली. आईने बाहेर आल्यावर बॅगेतील छोटी छत्री बाहेर काढली. ती छत्री उघडून डोक्यावर धरत ती बसस्टॉपवर आली. तर तिथे खूप गर्दी होती. त्यामुळे ती बसस्टॉपच्या बाहेरच छत्री घेऊन बसची वाट बघत उभी राहिली. पावसाबरोबरच वाराही जोराने वाहत होता. त्यामुळे छत्री सारखी उडत होती. जास्त काळ तसे उभे राहणे शक्य नसल्याने आईने जवळच्या झाडाखाली जाऊन थांबायचे ठरवले. छत्री सांभाळत आई त्या झाडाखाली गेली. झाडाचा घेर मोठा असल्याने वारा कमी लागत होता. परंतु झाडांच्या पानांचे पाणी ओघळून पडत होते त्यामुळे छत्री उघडून थांबावे लागत होते. आई झाडाखाली बसची वाट बघत उभी होती. तेवढ्यात वीज चमकल्याचा मोठा आवाज झाला. त्यापाठोपाठ दुसरा मोठा आवाज झाला आणि आई उभे असलेले झाड उन्मळून पडले. तेवढ्यात मोबाईलच्या स्क्रीनवर अंधार झाला. आनंदच्या लक्षात यायला वेळ लागला नाही की झाडावर वीज पडल्यामुळे झाड उन्मळून पडले व त्याने आईचा बळी गेला.

आनंद वेगवेगळया प्रकारे मदत करून आईला वाचवण्याचा प्रयत्न करत होता आणि दैव अनेक प्रकाराने तिला त्याच्यापासून हिसकावून घेत होता. त्याने पुन्हा या प्रसंगातून आईला वाचवायचे ठरवले. यासाठी त्याने गडबडीत टाईम मशीनवर त्या घटनेच्या १५ मी. पहिलेची वेळ टाकली. कार्यालयाच्या जवळच्या ठिकाणाचा अक्षांश आणि रेखांश टाकले. हिरवे बटन दाबताच तो त्या काळात पोहचला. तिथे गेल्यावर त्याला लक्षात आले कि तिथे जोराचा पाऊस चालू आहे. तो लगेच वर्तमानात परत आला आणि त्याने अंगात पावसाचे रेनकोट घातला. परंतु टाईम मशिनमध्ये यापूर्वीच्या काळाचे देखील घड्याळ चालू होते. त्यामुळे त्याने ती वेळ निवडली व तो त्या काळात पुन्हा गेला. या सगळयात दहा मिनिटे निघून गेले होते. तोपर्यंत त्याची आई त्या झाडाखाली जाऊन उभी राहिलेली होती. आनंद पळत पळत रस्ता क्रॉस करेपर्यंत मोठी वीज कडाडली. तो आवाज ऐकून तो मोठ्याने आईला उद्देशून ओरडला, “पावसाळयात झाडाखाली थांबू नका.” त्याचे हे म्हणणे ऐकताच आई ताबडतोब झाडापासून दूर जायला निघाली. परंतु तोपर्यंत दुसरा मोठा आवाज होऊन झाड कोसळले होते. आनंद झाडाजवळ आला तोपर्यंत इतरही बरेचजण तिथे गोळा झाले होते. जवळ जाऊन पाहिल्यावर त्याला लक्षात आले कि त्याचा आवाज ऐकून आई झाडापासून दूर जायला निघाल्याने ती मुख्य बुंधाखाली सापडली नव्हती. ती फक्त झाडाच्या छोट्या छोट्या फांद्याखाली अडकली होती. परंतु झाड पडल्यामुळे ती अत्यंत घाबरली होती. तीचा श्वास वेगाने चालू होता. आनंदने इतर लोकांच्या मदतीने कशातरी फांद्या बाजूला केल्या आणि आईला बाहेर काढले. बाहेर आली तरी आई अजूनही घाबरलेली होती. तिला काही ठिकाणी खरचटले होते. परंतु कुठेही मोठी जखम झाली नव्हती. त्याने रस्त्याकडेच्या एका दुकानाच्या छताखाली तिला नेऊन बसवले. तोपर्यंत ती गांगरलेल्या अवस्थेतच होती.

छताखाली उभे राहिल्यानंतर काही वेळाने आई बऱ्यापैकी स्थिर होऊन शांत झाली. तिने जेव्हा आनंदकडे पाहिले तेंव्हा ती चकित झाली आणि विचारले, “तुम्ही?” आनंदला काय सांगावे काही कळेना. मग त्याला आठवले त्याने मागे इथल्या एका बँकेत नोकरीला असल्याचे सांगितले होते त्याने लगेच उत्तर दिले, “बँकेत काम होते म्हणून इकडे आलो होतो.”

तिला हे उत्तर काही रुचले नाही तिने विचारले, “मला क्षमा करा मी क्षयरोगाने आजारी आहे हे कळताच त्या क्षणी तुम्ही मला औषधे आणून दिलीत. मागील महिन्यात मी गाडीखाली जाता जाता वाचले. त्यावेळेस देखील तुम्ही तिथे हजर होता. आता देखील मी झाडाखाली सापडणारच होते तर इथेही तुम्ही हजर झालात आणि मगाशी आवाज देऊन तुम्हीच मला झाडाखाली थांबू नका म्हणून सांगितले ना?”

आनंद म्हणाला, “हो”

ती म्हणाली, “तुमच्या आवाजामुळेच मी बाजूला जायला निघाली त्यामुळेच मी वाचली नाही तर आज माझं काही खरं नव्हतं.”

आनंद आता मात्र काही बोलला नाही.

आई म्हणाली, “ अगदी देवासारखे धावून आला तुम्ही. त्याबद्दल मी तुमची खूप खूप आभारी आहे.”

“तुम्ही इथेच थांबा मी रिक्षा घेऊन येतो.” एवढे बोलून आनंद रिक्षा आणायला निघून गेला. आई काय म्हणते आहे हे ऐकायला तो तिथे थांबला नाही. काही वेळात तो रिक्षा घेऊन तिथे आला. त्याने आईला रिक्षात बसवले आणि रिक्षा निघून गेल्यानंतर आनंद वर्तमानात परतला.

त्याला वाटत होते कि आपण भूतकाळात जाऊन आईला वाचवतो आहे. त्यामुळे ती वर्तमानात आपल्याबरोबर नक्कीच असेल. परंतु तसे काही होत नव्हते आता तो देखील जिद्दीला पेटला होता. त्यांनी काही करून आईला प्रत्येक संकटातून वाचवायचे ठरवले होते. आईला झाडाखाली जाताना वाचवण्याच्या गडबडीत आनंदला देखील पाऊस लागला होता. त्यामुळे त्याला थोडा ताप सर्दी झाली होती. त्याने काही दिवस आराम करायचे ठरवले. त्यानंतर त्याने पुन्हा भूतकाळात जाऊन आई वर्तमानात का आली नाही हे पहायचे ठरविले. त्याने पुन्हा झाड पडल्याच्या प्रसंगानंतरचा काळ पहायला सुरुवात केली. पुन्हा काही विशेष जाणवेना म्हणून तो वेगाने पुढे जाऊ लागला. त्याच्या स्क्रीनवर पुन्हा एकदा अंधार आला. त्याने ताबडतोब तिथे काळ बदलणे थांबवले. आणि तो दिवस बारकाईने पहायला सुरुवात केली.

नेहमीप्रमाणेच दिनक्रम सुरु झाला होता. वडिलांनी आनंदला शाळेत सोडल्यानंतर आईला ऑफिसमध्ये सोडले होते. आई ऑफिसच्या इमारतीमधील तिच्या ऑफिसमध्ये लिफ्टने आली. ऑफिसमधील वातावरण पाहून असे वाटत होते कि कोणाचा तरी वाढदिवस असावा. सगळेजण ऑफिसमध्ये आल्यानंतर एका केबिनमध्ये जाऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा देत होते. आल्यानंतर आई देखील त्या केबिनमध्ये गेली व तिथे बसणाऱ्या साहेबांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन आली होती. ती व्यक्ती कदाचित ऑफिसची प्रमुख असावी. कारण त्यांचा वाढदिवस असल्यामुळे ऑफिसमधील वातावरण हलकेफुलके होते. सगळेजण पार्टीच्या मूडमध्ये होते. जेवणाच्या मधल्या सुट्टीमध्ये पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. बाहेरून कोल्डड्रिंक,

पिझ्झा व केक मागविला होता. त्या सुट्टीत सगळेजण एकत्र आल्यानंतर ज्यांचा वाढदिवस होता त्या मॅनेजरने केक कापला. त्यानंतर तो केक सर्व जणांना वाटला गेला. त्यानंतर सर्वांनी पिझ्झा, कोल्डड्रिंक घेतले. सगळे एकत्र बसून खात खात गप्पा मारत बसले होते. तेवढ्यात आईच्या टेबलवरचा फोन खणखणला. आई फोन घ्यायला जायला निघाली. जाताना हातात होता तो पिझ्झ्याचा तुकडा तसाच तिने हातात ठेवला होता. फोनवर बोलता बोलता तिने पिझ्झ्याचा एक तुकडा तोंडात घेतला. बोलताना घास घेतल्यामुळे तो तुकडा आईच्या घशात जाऊन अडकला. तिला आता श्वास घेता येईना व कोणाला आवाजही देता येईना. सगळेजण पार्टीत गुंग असल्यामुळे कुणाचेही तिकडे लक्ष गेले नव्हते. तेवढ्यात मोबाईलच्या स्क्रीनवर अंधार झाला. आनंदला वाटले कि घास घशात अडकल्यामुळे आईला श्वास घेता आला नाही व त्यामुळे तिचा मृत्यू झाला.

आनंदने लगेच तिथे जाऊन आईला वाचवायचे ठरवले. परंतु वाचवायचे कसे याचा तो विचार करू लागला. एकतर आईला फोनवर बोलताना घास घेण्यापासून थांबवणे हा एक उपाय होऊ शकतो किंवा घास घशात अडकल्यावर पाठीत थाप देऊन घास काढायला मदत करणे हा एक पर्याय असू शकतो. त्याने ताबडतोब त्या घटनेच्या साधारणपणे पंधरा मिनिटे आधीची वेळ टाकली. ऑफिसच्या बिल्डिंगचे अक्षांश व रेखांश हातातील टाईम मशीनवर टाकले. हिरवे बटन दाबल्यानंतर तो ऑफिसच्या इमारतीजवळ पोहोचला. तो ताबडतोब ऑफिसच्या इमारतीमध्ये गेला. तो लिफ्टजवळ येऊन थांबला. आई लिफ्टमधून ऑफिसमध्ये जाताना त्याने पाहिलेली होते. परंतु ती कोणत्या मजल्यावर जाते हे त्याला माहिती नव्हते. त्यामुळे तो जिन्यानेच वर जायला निघाला. त्याने आईचे ऑफिस कसे दिसते हे स्क्रीनवर पाहिले होते. त्यामुळे तो प्रत्येक मजल्यावर तसे ऑफिस शोधत चालला होता. त्यामुळे जायला उशीर होऊ लागला होता. पहिला मजला पाहून झाला. दुसरा मजलाहि पाहून झाला. तिसरा मजल्यावर पोहचल्यावर त्याला आईचे ऑफिस दिसले. त्यालाही जाणवले कि त्याला उशीर झाला आहे त्यामुळे तो पळतच ऑफिसकडे गेला. आईचा बसायचा बॉक्स हा ऑफिसच्या काचेतून दिसेल असा होता. ऑफिसच्या काचेतून पाहतो तर त्याला दिसले आई फोनवर बोलताना घास घेत होते. तो त्या काचेजवळ पोहचेपर्यंत तिने घास घेतला आणि तो घास घशात अडकला होता. आईची अस्वस्थता पाहून आनंद पटकन ऑफिसचे दार उघडून आत गेला आणि आईच्या पाठीत थाप दिली. त्या थापेमुळे तिच्या घशातील घास निघायला मदत झाली. परंतु या प्रकाराने आई खूप घाबरली होती, तिचा श्वास जोराने व्हायला लागला होता.

आईच्या श्वासाच्या आवाजामुळे ऑफिसचा इतर स्टाफ तिथे आला. आनंदला लक्षात आले कि आपण इथे जास्त वेळ थांबणे योग्य नाही. त्यामुळे तो तेथून लगेच पटकन बाहेर

निघून गेला. जवळ आल्यानंतर काही जणांनी तिला पाणी प्यायला दिले. थोडे सावरल्यानंतर तिने विचारले कि तिच्या पाठीत थाप मारुन घास काढायला मदत कोणी केली? या प्रश्नाने सगळे एकमेकांकडे पहायला लागले कारण त्यांच्यापैकी कोणीही तिच्या पाठीत थाप मारलेली नव्हती. तेवढ्यात एकजण म्हणाला, "मी तुमच्याकडे येताना एकाला ऑफिसच्या बाहेर जाताना पाहिले. कदाचित त्यानेच आत येऊन पाठीत थाप मारली असावी." त्यावर आई म्हणाली, " त्याने जर पाठीत थाप मारली नसती तर आज माझे काही खरे नव्हते. मला त्यांचे आभार मानायला पाहिजे." एवढे बोलून आई त्या व्यक्तीला पाहायला ऑफिसच्या बाहेर आली. त्याबरोबर ज्याने आनंदला बाहेर जाताना पाहिले तो देखील बाहेर आला. प्रत्येक मजल्यावरून इमारतीचा जिना व तळमजल्यावरील पोर्च अगदी स्पष्ट दिसेल अशी इमारतीची रचना होती. बाहेर आल्यानंतर तिने व बरोबरच्या माणसाने आजूबाजूला पाहिले. परंतु कोणीही दिसेना. म्हणून त्यांनी जिन्याकडे पाहिले. तर त्या माणसाला पहिल्या मजल्यावरील पायऱ्या उतरून मधल्या पोर्चमध्ये जाताना आनंद दिसला. त्याने आनंदच्या आईला आनंदकडे बोट दाखवून सांगितले, "बहुतेक तो माणूस होता." आईने नीट निरखून पाहिले. तिला लक्षात आले कि ती व्यक्ती म्हणजे नेहमीच तिला वाचवायला येणारा माणूस आहे. परंतु खाली पळत जाऊन त्याच्याशी बोलणे शक्य नव्हते. कारण तोपर्यंत आनंद इमारतीतून बाहेर पडला होता. आता मात्र आई विचार करायला लागली. प्रत्येक वेळेस संकटात सापडल्यानंतर हा माणूस वाचवायला येतो हा काही योगायोग नक्कीच नाही. आईने आतापर्यंत साधे त्याचे नावही विचारले नव्हते. त्या माणसाच्या विचारातच आई ऑफिसमध्ये आत आली.

आता मात्र त्या माणसाने वाचवले याबद्दल तिला त्याचे आभार मानण्या ऐवजी भीती वाटू लागली. हा माणूस तिच्या ऑफिसमध्ये येऊन तिला वाचवतो म्हणजे हा माणूस सतत तिच्या मागावर असला पाहिजे. कधी एकदा घरी जाऊन नवऱ्याला सगळे सांगते असे तिला झाले होते. ती संध्याकाळी घरी आली. घरातील सर्व कामे तिने भरभर आवरली. आनंदला झोपी लावले. नंतर नवऱ्याजवळ येऊन बसली आणि त्याला सांगू लागली, "अहो, आज मी पुन्हा मरता मरता वाचले."

प्रभाकरने घाबरतच विचारले, "काय झाले?"

"अहो आज ऑफिसमध्ये आमच्या नायर साहेबांचा वाढदिवस होता. त्यामुळे जेवणाच्या वेळात एक छोटी पार्टी ठेवली होती. सगळे पार्टीत गुंग होते. त्याच वेळेस मला एक

फोन आला. मी हातातील पिझ्झा घेऊनच फोनवर बोलायला गेली. बोलता बोलता मी तुकडा तोंडात टाकला आणि तो माझ्या घशात जाऊन अडकला. मला श्वाससुद्धा घेता येत नव्हता.”

“मग कोण आलं मदतीला? जरा जपून खात जा...”

“मदतीला एकजण आला, त्याने पाठीत थाप मारली. त्यामुळे अडकलेला घास निघाला.”

“बरे झाले वेळेवर आला मदतीला. कोण होत?”

“अहो, तो आमच्या ऑफिसमधला नव्हता. ऑफिसमधले सगळे जण पार्टी गुंग होते.”

“मग? कोण आला होता?”

“अहो तोच माणूस....”

“कोण?”

“अहो, जो मी गाडीखाली जाताना व मी झाडाखाली सापडताना मदतीला आला होता. तोच तो माणूस होता.”

“तो तिथे कसा आला? तू तर म्हणाली होतीस की तो तुमच्या इमारतीपासून दोन इमारतीनंतरच्या बँकेत कामाला आहे.”

“मलाही तेच कळत नाही. मी झाडाखाली जाताना तिथे पोहचला. मला गाडी उडवायला आली तेंव्हा तिथे आला. गाडीची घटना तर ऑफिसजवळ झाली नव्हती. मला काहीतरी विचित्रच वाटायला लागले आहे.”

“त्यात काय विचित्र वाटण्यासारखे? योगायोग असेल.”

“योगायोग नाही वाटत.... मला वाटत तो माझा पाठलाग करत असावा.”

प्रभाकर तिला चिडवत म्हणाला, “ शक्य आहे........ कारण तू आहेस तशी सुंदर..”

ती चिडत म्हणाली, “उगच काही बडबडू नका....... इथे मला भीती वाटायला लागली आहे.”

“त्यात काय घाबरण्यासारखे आहे?”

थोडा वेळ थांबत विचार करत ती म्हणाली, “हि गोष्ट माझ्या लक्षात पहिले कशी आली नाही?”

“कोणती?”

“मी गाडीखाली जाताना किंवा झाडापासून मला वाचवल्यानंतर त्या माणसाने मला रिक्षात बसवून दिले होते.”

“मग त्याचे काय?”

“दोन्ही वेळेस मी रिक्षावाल्याला कुठे जायचे हे सांगितलेच नव्हते. तरी दोन्ही वेळेस रिक्षावाल्यानी मला बरोबर घराजवळ आणून सोडले.”

आता मात्र प्रभाकरच्या चेहऱ्याचा रंग उडाला.

“अहो... तुम्हाला आठवते का काही महिन्यापूर्वी एकजण आपल्या बंगल्याबाहेर उभा होता. तो आपल्याला आवाज देऊ लागला तेंव्हा आपण वेगाने पुढे निघून गेलो होतो.”

“हो”

“मला वाटते तो हाच माणूस असावा.”

प्रभाकर घाबरला, “काय सांगते?”

“मला वाटते तो माझ्यावर पाळत ठेवुन आहे.. मला आता खूप भिती वाटायला लागली आहे.”

“अरे बापरे! हे सगळे विचित्रच आहे.”

“मला वाटते आपण पोलीसात तक्रार करू या?”

“काय सांगणार आपण? तसे पाहिले तर वरून वरून तो तुला मदत करतो आहे असेच दिसते आहे. एवढी मदत करून आपल्याला साधे त्याचे नावही माहिती नाही. त्यामुळे प्रथम आपण त्याची माहिती काढण्याचा प्रयत्न करू या. तुला तो परत दिसला तर आरडाओरडा करून लोकांना गोळा कर व सर्वांसमोर त्याला जाब विचार. मी बरोबर असलो तर पाहतोच काय करायचं ते. चांगलाच चोप दिला पाहिजे त्याला.”

पुढील आठवडाभर शोभा त्या जवळील बँकेत जाऊन आनंदला शोधण्याचा प्रयत्न करत होती. तिने तेथील कर्मचाऱ्यांना आनंदाचे वर्णन करून देखील विचारून पाहिले. परंतु तसे कोणीही तिथे काम करत नसल्याचे कळले. तिने विचारून पाहिले कि मागील काही महिन्यात नवीन जॉईन झालेली व आता दुसऱ्या ब्रंचमध्ये बदली झालेली अशी कोणी व्यक्ती आहे का? परंतु मागील कित्येक वर्षात त्या बॅंकेत नवीन भरती व बदली झालेले कोणीही नव्हते. आता तिच्या लक्षात आले कि त्याने सर्व माहिती खोटी सांगितली होती. त्यामुळे तिने आता पुन्हा दिसला तर त्याच्याशी न बोलण्याचे ठरवले. शिवाय तिने खबरदारी म्हणून ही गोष्ट तिच्या ऑफिसमध्ये देखील सांगून ठेवली.

घशातील अडकलेला घास काढायला मदत करून आनंद वर्तमानात परत आला. आतापर्यंत त्याने आईला तीन वेळा वाचवले तरीही आई काही वर्तमानात येत नव्हती. असे का होते याच विचारात तो होता. एकदा तो असाच बाहेर फिरत असताना त्याने ज्याच्याकडून क्षयरोगाची औषधे घेतली तो मित्र त्याला भेटला. सुरुवातीला त्याने इकडची तिकडची गोष्टी केल्या. नंतर त्याने विचारेल, " अरे मी तुला ती क्षयरोगाची औषधे दिली होती त्याचे काय झाले?"

"काय झाले म्हणजे? ज्यांना हवी होती त्यांना दिले आहेत.."

"असे नाही रे.... उरलेली औषधे आली आहेत आता माझ्याकडे."

आनंद एकदम चकित झाला व त्याला विचारले, "उरलेली औषधे?"

मित्राने त्याला समजवायला सुरुवात केली, "अरे, त्या औषधाचा सहा महिन्यांचा कोर्स असतो."

आनंदने मध्येच त्याला तोडले, "ते माहिती आहे मला...."

"त्यातील पहिल्या चार महिन्या औषधे मी तुला दिली होती. ती संपली की पुढच्या दोन महिन्याची औषधे घेऊन जा असे मी सांगितले होते."

"मला तू असे काही मला म्हणाल्याचे आठवत नाही."

"मला वाटलेच होते. कारण औषधे घेतेल्यावर तू माझे लक्ष देऊन ऐकलेच नव्हते. काही हरकत नाही. अजून चार महिने व्हायचे आहेत. केंव्हाही माझ्याकडे ये आणि घेऊन जा?"

"ठीक आहे." एवढे बोलून आनंद विचारात गर्क झाला. तो मित्र त्याला जातो म्हणून निघून गेल्याचे त्याच्या लक्षात देखील आले नाही.

पहिले औषधे देऊन फक्त महिना झाला होता. त्यामुळे आता पुढच्या दोन महिन्याचे औषधे द्यायला जायला किमान दोन महिने थांबावे लागणार होते. साधारणपणे दीड महिने वाट पाहिल्यानंतर आनंद त्या मित्राकडे गेला आणि पुढील दोन महिन्याची औषधे घेऊन आला. आता त्यांनी ती औषधे आईला नेऊन द्यायचे ठरवले. साधारणपणे पहिले औषध दिल्यानंतर साडेतीन महिन्याची तारीख त्याने टाईम मशीनवर टाकली. शिवाय ठिकाणाची माहिती टाकताना ऑफिसच्या जवळील जागेचे अक्षांश व रेखांश त्याने टाईम मशीनवर टाकले. आणि हिरवे बटन दाबताच डोळयावर थोडी अंधारी येऊन तो त्या ठिकाणी पोहचला. तो आईच्या ऑफिसच्या इमारतीबाहेर तिची वाट पाहत थांबला. काही वेळानंतर आई ऑफिसमधून बाहेर पडायला लागली तेव्हा तिचे लक्ष रस्त्यावर उभ्या असलेल्या आनंदकडे गेले. ती परत ऑफिसमध्ये गेली व तेथील सगळयांना सांगितले की तिचा पाठलाग करणारा माणूस खाली उभा आहे. ऑफिसमधील दोघे तिघे पळत खाली आले व आनंद पकडून मारू लागले. हे मारताना ते तोंडाने काहीतरी म्हणत होते. आनंदने कसे तरी स्वतःची सुटका करून घेतली व तो पळत सुटला. पळताना त्याच्या लक्षात आले कि तो भूतकाळात आलो आहे. त्याने ताबडतोब टाईम मशीनवरील रिटर्न बॅंकचे बटन दाबले व तो वर्तमानात परत आला. पाठलाग करणाऱ्यांना वळणावर आल्यानंतर आनंद कुठे गेला ते कळलेच नाही. त्यामुळे ते ऑफिसमध्ये परतले व झालेले सर्व आनंदच्या आईला सांगितले.

आनंदला काय झाले आणि सगळे मिळून त्याला का मारत होते हे कळायला तयार नव्हते. त्याने टाईम मशिनवर नक्की काय झाले ते सविस्तर पहायचे ठरवले. त्याने मोबाईलवरील टाईम मशीन ॲप्पवर आईचा फोटो टाकला व साधारण या घटनेच्या १० मी. पहिलेची वेळ टाकली. त्याला दिसू लागले कि आई तिच्या ऑफिसमधून बाहेर येऊन खाली यायला लागली आहे. त्याची आईं पहिल्या मजल्यावरून खाली उतरताना रस्त्यावरील कोणाला तरी तिने पाहिले. त्यानंतर ती पुन्हा ऑफिसमध्ये गेली व सगळयांना सांगितले कि तिचा पाठलाग करणारा माणूस खाली रस्त्यावर उभा आहे. त्यानंतर ऑफिसमधील काहीजण आई बरोबर खाली आले. खाली आल्यानंतर आईने त्या माणसाकडे बोट करताच ते सगळे त्या माणसाला मारायला धावले. आता आनंदच्या लक्षात आले की त्याच्या आईने त्याच्या सारख्या सारख्या मदतीला जाण्याचा वेगळाच अर्थ काढला आहे. कारण त्याचे आताचे वय व तिचे तेंव्हाचे वय सारखे असल्याने ही सर्व गडबड झाली होती. शिवाय तो तिला भविष्यात शोध लागलेल्या टाईम मशीनबद्दल तिला काही सांगू

शकत नव्हता. कारण ते कोणाला पटणारे नव्हते. त्याला आईला शेवटच्या दोन महिन्याची क्षयाची औषधे द्यायची होती. परंतु तो आता ऑफिसजवळ जाऊ शकत नव्हता.

काय करावे याचा तो विचार करत होता. त्याला वाटले आईच्या घरी गेलो तर कदाचित काही तरी दुसरे कारण सांगून गैरसमज दूर करता येईल. तसेच औषधेहि देता येतील. त्यामुळे त्याने घरी जायचे ठरवले. त्याने टाईन मशीनवर पुढचा दिवस व सकाळी साडेआठची वेळ व घराच्या जवळच्या ठिकाणाचे अक्षांश आणि रेखांश टाकले. हिरवे बटन दाबल्यानंतर तो घराजवळील प्रकट व्हायच्या जागेवर पोहचला. त्यानंतर तो भरभर त्यांच्या बंगल्याबाहेर जाऊन थांबला. तो आत जाऊन काय बोलायचे याचा विचार करत उभा राहिला.

त्याच वेळेस आईने त्याला गच्चीतून पाहिले. ती धावतच घरात आली. तिने प्रभाकरला आवाज दिला, “ अहो, ऐकलत का?”

“काय झालं?”

“अहो तो माणूस आपल्या बंगल्याबाहेर उभा आहे.”

“आता मात्र कहरच झाला. काल एवढा चोप दिला तरी हा घरापर्यंत आला. आता मी त्याच्याकडे बघतोच...”

असे म्हणून प्रभाकर हातात मोठे लाकूड घेऊन बाहेर आला. आनंदकडे येत येत मोठ्याने विचारले, “ काय रे! कालचा मार कमी पडला का? आता पार माझ्या बायकोचा पाठलाग करत घरापर्यंत आलास”

त्यांचे ते बोलणे ऐकून आजूबाजूचे काही लोक गोळा झाले. त्यांनी आनंदला पकडले. प्रभाकरने लोकांना सांगितले कि हा गेले ३-४ महिने बायकोचा पाठलाग करतो आहे. हे ऐकताच जमलेल्या लोकांनी आनंदला मारायला सुरुवात केली. एकाने प्रभाकरच्या हातातील लाकूड घेऊन त्याला मारायला सुरुवात केली. आनंद ओरडून सांगत होता, “मी औषध द्यायला आलो आहे.” परंतु कोणीही त्याचे बोलणे ऐकत नव्हते. खूप मार खाल्यानंतर आनंद बेशुद्ध पडला. शुद्ध आली तेव्हा तो एकटाच तिथे पडला होता. त्याने कसे तरी वर्तमानात परत यायचे बटन दाबले आणि पुन्हा तो बेशुद्ध पडला.

***********

त्या बंगल्यातील घरकाम करणाऱ्या बाईने आनंदला रस्त्यावर पडलेले पाहिले. त्यानंतर पोलीस आले आणि आनंदवर उपचार झाले. तो सगळयांना एकच सांगत होता कि त्याच्या वडिलांनी त्याला मारले.........

काही दिवसानंतर आनंदने वडील त्याच्या घरी येऊन त्याला टाईम मशीन दिली ती घटना पुन्हा पहायचे ठरवले. त्याने मोबाईलवरील टाईम मशीन ॲप्पवर तो दिवस आणि वडिलांचा फोटो टाकला. त्याने वेळ न टाकल्यामुळे त्या दिवसाच्या रात्रीच्या बारा वाजल्यापासूनचे प्रसंग त्याला दिसायला लागले. त्याचे वडील लपत लपत चालले होते. मध्येच एखाद्या गाडीमागे लपत होते. मध्येच एखाद्या टपरीमागे लपत होते. प्रत्येक वेळेस ते मागे वळून पहात होते. असेच ते जात असताना एका सुनसान रस्त्यावरून ते जात असताना त्यांना मागून येणाऱ्या काही लोकांनी गोळी घातली. त्यानंतर एकदम त्याच्या स्क्रीनवर अंधार झाला. त्याला काही कळायला तयार नव्हते. कारण वडिलांनी त्याला घरी येऊन टाईम मशीन दिली होती. म्हणजे ते गोळी घातल्यानंतर जिवंत होते हे त्याला माहिती होते. त्यामुळे तो ती अंधारी स्क्रीन पाहत राहिला. काही वेळानंतर ती अंधारी स्क्रीन गेली आणि वडील एका छोट्या बोळीत लपलेले दिसले.

आता त्याच्या लक्षात आले वडिलांनी या मशीनमध्ये जिवंत व्यक्ती गृहीत धरताना मशीनला सर्वसाधारण माणसाच्या श्वासाचा वेगच जिवंतपणाचे लक्षण म्हणून टाकलेले असावे. त्यामुळे जेंव्हा एखादा माणूस घाबरतो व त्याचा श्वासाचा वेग हा सर्वसाधारण माणसापेक्षा वेगळा होतो, तेंव्हा ही मशीन त्या काळात नाही हे गृहीत धरत असावी व स्क्रीनवर अंधार दाखवत असणार.

आता त्याला आईच्या बाबतीत त्याचा झालेला घोळ त्याच्या लक्षात आला. त्याच्या लक्षात आले कि तो आता आईला काहीही मदत करू शकत नाही. कारण त्या काळातील सर्वांचा त्याच्याबद्दल गैरसमज झाला आहे. त्यामुळे आहे तो भूतकाळ स्वीकारण्याशिवाय त्याच्यासमोर पर्याय नव्हता. शिवाय भूतकाळात जाऊन त्यात बदल करता येत नाही हे त्याला कळले होते.

**ई साहित्य प्रतिष्ठान** दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची तेरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची,डॉ. स्मिता दामले यांची पाच, डॉ. वृषाली जोशी यांची तीन अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक "स्वांतःसुखाय" लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या "साहित्यरत्नांचिया खाणीं" मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, सूरज गाताडे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत

अध्यक्ष, ई साहित्य प्रतिष्ठान

साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com